**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**मौजे पाभरे (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील काळभैरव पंचक्रोशी हिंदू देवस्थान मंडळाच्या जागेबाबत**

**(१) * ३७५९७ श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाभरे (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील श्री.काळभैरव पंचक्रोशी हिंदू देवस्थान मंडळाच्या सरकारी जमीन नावावर होण्यासाठी तहसीलदार म्हसळा यांनी जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे दिनांक १८ मे, २००६ रोजी प्रस्ताव सादर केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी रायगड यांनी या प्रस्तावावर कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे कोणती ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (१) होय.

(2) व (3) तहसिलदार, म्हसळा यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर केलेला प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने प्रकरणी योग्य ती चौकशी करून परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यासंबंधी जिल्हाधिकारी, रायगड यांनी तहसिलदार, म्हसळा यांना सूचना दिल्या आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : या प्रश्नाच्या बाबतीत 18 मे, 2006ला तहसीलदार म्हसळा यांनी जिल्हाधिका-यांना कळविले आहे. हे प्रकरण 3 वर्षापासून प्रलंबित आहे. ही होळी लावण्याची जागा आहे. ग्रामस्थांची ट्रस्ट असून 7/12वर जमिनीची तशी नोंद आहे. तेव्हा ही जागा ट्रस्टच्या नावावर करण्यासाठी शासन जिल्हाधिका-यांना ताबडतोबीने आदेश देईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : मौजे पाभरे, ता. म्हसळा, जिल्हा रायगड या ठिकाणचा हा प्रश्न आहे. श्री काळभैरव पंचक्रोशी हिंदू देवस्थान मंडळाने या संदर्भात पहिल्यांदा ट्रस्टकडे अशा प्रकारची जागा मिळावी अशी विनंती केली होती. त्यांनी शासनाकडे किंवा महसूल विभागाकडे असा अर्ज केलेला नव्हता. ट्रस्टकडे अशा प्रकारचा अर्ज केला होता. ट्रस्टकडे अर्ज केल्यानंतर 7/12च्या नोंदीमध्ये सरकारी देऊळ अशी नोंद होती म्हणून तो अर्ज ट्रस्टने तहसिलदारांकडे पाठविला. तहसीलदार स्वतः त्या ठिकाणी गेले आणि श्री काळभैरव पंचक्रोशी हिंदू देवस्थान मंडळ यांच्याकडून संपूर्ण प्रस्ताव घेतला आणि तो जिल्हाधिका-यांकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. आपल्या नियमानुसार आणि कायद्यानुसार प्रस्तावाची छाननी करुन या संदर्भात योग्य तो निर्णय ताबडतोबीने घेतला जाईल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 37597...)

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मंत्री महोदय या बाबतीत निश्चित कालावधीत निर्णय घेतील काय ? त्याठिकाणी गावठाण विस्तार आहे. तेथे अतिक्रमण होईल. म्हसळा तालुक्यामध्ये हिंदु आणि मुस्लिमांच्या वस्त्या आहेत. दोन्ही समाजाने ठरवून या जागेचे वाटप केलेले आहे. तेव्हा ही जागा 6 महिन्याच्या आत श्री काळभैरव पंचक्रोशी हिंदु देवस्थानाच्या नावावर होण्याच्या दृष्टीने माननीय मंत्री महोदय संबंधितांना आदेश देतील काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : चॅरिटी कमिशनर यांनी मागणी केल्यानंतर हा प्रस्ताव खरे तर आम्ही केला. जेव्हा सुरुवातीला हा प्रस्ताव सादर झाला त्यावेळी त्यामध्ये ब-याच त्रुटी होत्या. 7/12मध्ये फेरफार होती, जागेचा नकाशा नव्हता, ट्रस्टच्या नोंदीचे कागदपत्र नव्हते, ट्रस्टचे उद्दिष्ट नमूद केलेले नव्हते. प्रस्ताव अपूर्ण होता. हा अपूर्ण प्रस्ताव ताबडतोबीने पूर्ण करुन जिल्हाधिका-यांकडे पाठविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. महसूल खात्याच्या नियमानुसार जो काही कालावधी लागतो त्या कालावधीच्या आत संबंधित नियमानुसार आणि कायद्यानुसार या संबंधातील निर्णय घेण्यात येईल.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सरकारी जागा ट्रस्टला देण्याच्या संदर्भात काही नियम आहेत काय ? तसेच या प्रकरणी अनर्जित रक्कम घेतली जाणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी अनर्जित रकमेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. ही सरकारी जमीन असून ती ट्रस्टला देण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. त्यामुळे अनर्जित रक्कम घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई बँकेने सुमारे १७२ कोटी रूपये खरेदीमुल्य असलेले रोखे विकलेल्या व्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(२) * ४१५६५ ॲड. अनिल परब , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दीपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई बँकेने अनेक साखर कारखान्याना दिलेली कर्जे अद्याप वसूल न झाल्याने तसेच मध्यप्रदेश औद्योगिक विकास मंडळाला दिलेले सुमारे १०० कोटी रूपयांचे कर्ज जवळपास बुडित खात्यात गेल्याने बँकेला मोठा फटका बसल्यामुळे मुंबई बँकेने दिनांक २३ जानेवारी, २००७ ते २३ मार्च, २००७ या कालावधीत सुमारे १७२ कोटी रूपये खरेदीमूल्य असलेले शासकीय रोखे विकलेल्या व्यवहारात बँकेला ६.६० कोटी रूपये तोटा झाल्याचा आरोप बँकेच्या सात संचालकांनी करून याप्रकरणी सखोल चौकशी होऊन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याच्या मागणीचे एक निवेदन मा. मुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री, मा. सहकार राज्यमंत्री, सहकार आयुक्त आणि सहकार निबंधक आदीकडे माहे डिसेंबर, २००७ मध्ये वा त्या सुमारास सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले आहे,

(३) तद्नुसार याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

डॉ.पतंगराव कदम : (१) होय.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

(३) चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्यात येईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, सदर प्रकरण फार मोठा आर्थिक घोटाळयाचे आहे. मुंबई बँकेच्या संचालकांनी जवळ जवळ १०० कोटी रुपयांचे कर्ज दिलेले आहे ते कर्ज बुडीत खात्यात गेलेले आहे. हे कर्ज वसूल करण्यासाठी मुंबई बँकेने रोखे विकले, त्यात देखील 6 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. यासंदर्भात आम्ही प्रथम क्रमांकाचा लेखी प्रश्न विचारला आहे, त्या प्रश्नास शासनाने "होय" असे उत्तर दिले आहे. डिसेंबर महिन्यामध्ये सात संचालकांनी माननीय

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41565...

ॲड. अनिल परब...

मुख्यमंत्र्यांना या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी अशा प्रकारचे निवेदन दिले आहे. प्रश्न क्रमांक दोनच्या लेखी उत्तरात शासनाने असे नमूद केले आहे की, सदर प्रकरणी चौकशी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत आणि चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई करण्यात येईल. सदर प्रकरणासंदर्भात संचालकांनी निवेदन देऊन तीन, चार महिन्यांचा कालावधी होऊन गेला आहे. परंतु या प्रकरणी अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही. या प्रकरणी चौकशी करण्याच्या सूचना कोणाला दिल्या आहेत ? सदर प्रकरणाची चौकशी किती दिवसात पूर्ण करण्यात येईल ? या प्रकरणी चौकशी करण्यास विलंब का लागला ? या आर्थिक घोटाळा प्रकरणाची चौकशी आर्थिक गुन्हे विभागामार्फत करण्यात येईल काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मुंबई बँकेचे प्रकरण हे काही पहिल्यांदाच या ठिकाणी चर्चेला आलेले नाही. गेल्या दोन वर्षापूर्वी नागपूर अधिवेशनात मुंबई बँकेतील आर्थिक घोटाळयाच्या अनुषंगाने चर्चा झाली आहे. त्या चर्चेच्या वेळी मुंबई बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करण्यासंबंधीचा मी निर्णय जाहीर केला होता. परंतु त्या निर्णयास हायकोर्टाने स्थगिती दिली आहे. या बँकेची कलम 88 खाली चौकशी झाली आहे. आता या बँकेत नवीन सात संचालक आले, त्या संचालकांनी पहिल्यांदा बँकेच्या व्यवहाराला मान्यता दिली. परंतु नंतर त्यांना बैठकीचे मिनिटस् प्राप्त झाले, त्यानंतर त्यांनी त्या व्यवहारांना विरोध केला आणि त्या अनुषंगाने तक्रार केली आहे की, साखर कारखान्यांना कर्ज दिलेले आहे, ते कर्ज कन्सोर्शियमखाली दिलेले आहे. त्या कर्जास सरकारची हमी आहे. म्हणून त्या कर्जास काही अडचण नाही. परंतु सदरहू बँकेने मध्यप्रदेश औद्योगिक विकास मंडळाला 100 कोटी रुपयांचे कर्ज दिलेले आहे. मध्यप्रदेश औद्योगिक विकास महामंडळाला जे कर्ज दिले ते गैर आहे आणि तो खरा महत्वाचा प्रश्न आहे आणि त्याबाबतीत नवीन संचालकांनी आक्षेप घेतलेला आहे. याबाबतीत शासनाने ॲक्शन घेतली होती. सदरहू बँकेत आर्थिक घोटाळा झाला असल्याने तेथील संचालक मंडळ बरखास्त करण्यात करावे अशा प्रकारचा जो निर्णय दिला गेला आहे, त्या निर्णयास हायकोर्टाने स्थगिती दिलेली आहे, त्यामुळे ॲक्शन घेण्याची कार्यवाही थांबली. सदरहू प्रकरणाची चौकशी आर्थिक गुन्हे विभागाकडे देण्यास काहीही हरकत नाही.

3...



ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 12:05

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मध्यप्रदेश औद्योगिक विकास मंडळाला 100 कोटी रुपयांचे कर्ज मुंबई बँकेने दिले आहेत त्यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी काहीही खुलासा केलेला नाही. सात संचालकांनी देखील या बँकेच्या व्यवहारासंबंधी तक्रार केली आहे हे माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. त्या संचालकांनी बँकेच्या पूर्वीच्या व्यवहारावर सहया केल्या आहेत ही बाब देखील मान्य केली आहे. सदरहू सात संचालकांनी केलेल्या तक्रारीसंदर्भात शासनाची काय भूमिका आहे ? मध्यप्रदेश औद्योगिक मंडळास 100 कोटी रुपयांचे कर्ज मुंबई बँकेने दिले आहे त्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे ? या प्रकरणाची आर्थिक गुन्हे विभागाकडून निश्चित कालावधीत चौकशी करण्यात येईल काय ?

डॉ. पतंगराव कदम : या प्रकरणाची निश्चित कालावधीत चौकशी करण्यात येईल. चौकशी किती कालावधीत पूर्ण करावयाची हा त्यांचा अधिकार आहे. ऑर्डर देण्याचे शासनाचे काम आहे यासंबंधीचे आदेश शासनाकडून एका महिन्याच्या आत देण्यात येतील.

श्री. मधुकर चव्हाण : मुंबई बँकेचा प्रश्न मागील दोन वर्षापूर्वी उपस्थित झाला होता या संबंधीची माहिती माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिली आहे. मुंबई बँकेने मध्यप्रदेश औद्योगिक मंडळास 100 कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. या बँकेत ज्या लोकांनी ठेवी ठेवल्या होत्या, ते ठेवीदार देशोधडीला लागले आहेत. अशा पध्दतीने गैरव्यवहार करणा-या संचालक मंडळाची आर्थिक गुन्हे विभागाकडून चौकशी करा आणि गैरव्यवहार करणा-या संचालकांना जेलमध्ये का टाकत नाहीत? सहकारी बँकेत कार्यकारी संचालकांची नियुक्ती करावयाची असेल तर सहकार आयुक्त आणि सहकार सचिव यांच्या अध्यक्षतेखाली वेगवेगळया दोन समित्यांची स्थापना केलेली आहे, त्यांची मान्यता घेऊनच कार्यकारी संचालकांना नेमावयाचे असते. परंतु मुंबई बँकेत या समित्यांची मान्यता न घेता बेकादेशीरपणे श्री. पितळे यांची कार्यकारी संचालक या पदी नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. पितळे यांची नियुक्ती बेकायदेशीरपणे करण्यात आली आहे ही गोष्ट खरी आहे काय, केली असल्यास त्याबाबतीत कोणती कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे ? तसेच या प्रकरणाची आर्थिक गुन्हे विभागाकडून निश्चित कालावधीत चौकशी करण्यात येईल काय ?

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : मुंबई बँक प्रकरणासंदर्भात कलम ८८ खाली चौकशी झाली आहे. सदरहू चौकशी झाल्यानंतर ऑडीटरने आपला ऑडीट रिपोर्ट दिला आहे. सदर प्रकरणी संचालक निर्दोष आहेत असा ऑडीटरच्या लेखी रिपोर्ट आल्यामुळे पुढची कायदेशीर चौकशी करणे कठीण गेले.

यानंतर श्री. कानडे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ KTG/ 12:10

ता.प्र.क्र.41565 पुढे सुरु....

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, प्रत्येक बँकेला एसएलआर डिपॉझीट ठेवावे लागतात. आरबीआयच्या नियमाप्रमाणे 25 टक्के गव्हरमेंट सिक्युरिटीमध्ये एसएलआर डिपॉझीट प्रत्येक बँकेने ठेवावे असे आरबीआयचे आदेश आहेत. त्यानुसार या बँके गव्हरमेंट सिक्युरिटी एसएलआर डिपॉझ ीट म्हणून ठेवली. गव्हरमेंट सिक्युरिटीमध्ये ट्रेडींग केल्यानंतर बँकेला तोटा झाला. आता बँकेच्या स्टॅडींग कमिटया झालेल्या आहेत. गव्हर्मेंट सिक्युरिटीमध्ये एसएलआर डिपॉझीट ठेवले पाहिजेत असा आग्रह आरबीआयने धरु नये अशी विनंती शासन आरबीआयला करणार आहे काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, यासंबंधी एक टास्क फोर्स तयार करण्यात आला आहे. यामध्ये राज्य शासनाचे दोन अधिकारी, स्टेट फेडरेशनचा एक अधिकारी, नॅशनल फेडरेशनचा आणि आरबीआयचे प्रतिनिधी आहेत. त्यांना जरुर सूचना करु. आरबीआयकडून ज्या सूचना येतात जे प्रश्न येतात त्याची या फोर्समध्ये चर्चा होते आणि निर्णय होतात. सन्माननीय सदस्य डॉ. पवार यांनी जी सूचना केली आहे त्यानुसार टास्क फोर्सपुढे हा विषय घेण्याबाबत अधिकाऱ्यांना सूचना देऊ.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. परब यांनी प्रश्न विचारल्याप्रमाणे मध्यप्रदेश एमआयडीसीला 100 कोटी रुपयांच्या ठेवी या बँकेने दिलेल्या आहेत. कर्जरोखे घेतलेले नाहीत. राज्याच्या बाहेर ठेवी ठेवण्याचा बँकेला अधिकार नाही. बँकेच्या संचालक मंडळाने बाहेरच्या राज्यामध्ये ठेवी ठेवण्याचा निर्णय घेतला त्यावेळी जिल्हा उपनिबंधक त्याठिकाणी हजर होते काय आणि त्यांनी या निर्णयाला विरोध केला काय ? त्यानंतर तीन महिन्यांनी एमओयु संदर्भात झालेल्या बैठकीमध्ये ठेवी दिल्यानंतर सहनिबंधक आणि आयुक्त(सहकार) यांनी कारवाई करण्याच्या नोटीसा दिल्या होत्या का?

डॉ. पतंगराव कदम :सभापती महोदय, या सगळया प्रकरणाची चौकशी झालेली आहे. यासंबंधीची चर्चा झाल्यानंतर बँकेचे बोर्ड बरखास्त केले होते. हायकोर्टामध्ये बँकेने अपिल दाखल केले. मध्यप्रदेश एमआयडीसीला ठेवी देण्यात आल्या त्या सरकारच्या मान्यतेशिवाय ठेवण्यात आल्या होत्या.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41565 पुढे सुरु...

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय,प्रश्नाला उत्तर देताना फरक पडला. कर्ज नाही ठेवी आहेत असे उत्तर देणे आवश्यक होते. ठेवी ठेवल्या आहेत त्याबाबत उत्तर पाहिजे होते. ठेवी ठेवल्या आहेत ते महामंडळ आहे.मंडळ आहे. खाजगी संस्था नाही. सरकारकडे सुध्दा त्याची जबाबदारी येते. मध्यप्रदेश सरकारकडे याबाबतीत काही पत्रव्यवहार केलेला आहे काय ? तसेच या पैशाची रिकव्हरी करण्याच्या संदर्भात गुन्हे अन्वेषण शाखेकडून चौकशी करण्याचे आदेश किती दिवसात देण्यात येतील ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत चौकशीचे आदेश दिले जातील आणि या सर्व प्रकरणाची चौकशी करु.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांना यासंबंधीचे निवेदन प्राप्त झाल्यानंतर आजपर्यंत या निवेदनाबाबत कोणती चौकशी करण्यात आली आणि चौकशीचा अहवाल आला आहे काय ?

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41565...........

डॉ.पतंगराव कदम : निवेदन आल्यानंतर संबंधित खात्याकडून ते बँकेकडे पाठविण्यात आले. बँकेने जॉईंट रजिस्ट्रारकडे पाठविले. जॉईंट रजिस्ट्रारने डेप्युटी रजिस्ट्रारकडे पाठविल्यानंतर डेप्युटी रजिस्ट्रारने चौकशी सुरु केली. हा प्रोसीजरचा भाग आहे. या ठिकाणी जो महत्वाचा विषय मांडला त्याचे मी उत्तर दिले आहे. आर्थिक गुन्हे विभागाकडून याची चौकशी करण्यासाठी एका महिन्याच्या आत आदेश दिले जातील आणि लवकरात लवकर चौकशी होण्यासाठी मुदत घालून दिली जाईल.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नागपूर मधील पारशिवनी तालुक्यातील वनक्षेत्रात राजस्थानाच्या बुंदि जिल्ह्यातील गुराखी गाईसह डेरेदाखल झाल्याबाबत**

**(३) * ३७६८० श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मधील पारशिवनी तालुक्यातील वनक्षेत्रात राजस्थानाच्या बुंदि जिल्ह्यातील गुराखी सुमारे ५००० गाईसह डेरेदाखल झाले असून येथील आरक्षित वनपरिक्षेत्रातील अधिकारी-कर्मचारी यांच्या दुर्लक्ष्यामुळे प्रचंड प्रमाणात जंगलतोड, वनचराई, वन्य प्राण्यांची शिकार होत असून अवैध चराईमुळे हिरवा चारा, दुर्मिळ वनौषधी, जलाशय यांचे अपरिमित नुकसान होत आहे, ही गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.बबनराव पाचपुते** : (१),(२) व (३) नागपूर वनविभागातील पारशिवनी वनपरिक्षेत्रात माहे नोव्हेंबर, २००७ मध्ये राजस्थानी लोक गुरांसह आले असता, क्षेत्रिय वनअधिकारी / कर्मचारी आणि वनसंरक्षण समितीने त्यांना वेळीच हाकलून लावले आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे वनांचे नुकसान झालेले नाही.

श्री. सय्यद जामा :सभापति महोदय, नागपुर में पारशिवनी तालुका के वन क्षेत्र में राजस्थान के बुंदी जिले के लोग अपने जानवरों को लेकर आ जाते हैं जिसकी वजह से स्थानीय लोगों को परेशानी का सामना करना पड़ता है और गांव के जानवरों को खाने के लिए चारा नहीं मिलता. चूंकि आपने उत्तर में लिखा है कि किसी प्रकार का नुकसान नहीं हुआ है. लेकिन वास्तविकता यह है कि वन अधिकारियों द्वारा उन लोगों को भगा देने के बाद वे दूसरे गांव में चले जाते है, दूसरे गांव से भगा देने के बाद वे तीसरे गांव में चले जाते हैं. इसलिए मैं यह जानना चाहता हूं कि क्या मंत्री जी इस मामले की जांच रिपोर्ट सदन के पटल पर रखेंगे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही सर्व जनावरे राजस्थानातील बुंदी जिल्हयातून महाराष्ट्र राज्यात येत असतात. त्याठिकाणी लोक जमतात व जनावरे विकत घेतात आणि दलाल लोक नागपूर आणि कामठी भागामध्ये ती जनावरे विकावयास येतात. दरवर्षी जनावरे विकण्यासाठी या मार्गाने येतात, रस्त्यावरुन चालत येताना जिथे जागा मोकळी असेल तिथे थांबतात. त्यांच्यावर लक्ष ठेवले जाते. येण्याचा मार्ग एकच आहे. पूर्वी देखील अशा घटना घडलेल्या आहेत. साधारणपणे मुक्काम केला जातो त्याठिकाणच्या आजूबाजूच्या जंगलामध्ये जनावरांना चरण्यासाठी

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सोडून दिले जाते. त्यावर बंधन आणले आहे. दोन ते पाच हजार जनावरांचा कळप असतो. काही जनावरे विकली जातात, काही जनावरे तशीच सोडून दिली जातात. परंतु यावर शासनाचे पूर्ण लक्ष आहे. या माध्यमातून वनांचे नुकसान होण्याचे टाळले आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, जे उत्तर देण्यात आले आहे त्या उत्तरावर माननीय कार्यक्षम वनमंत्र्यांचा विश्वास आहे काय? कोणत्याही प्रकारे वनांचे नुकसान झालेले नाही असे म्हटले आहे. हजारोंच्या संख्येने जनावरे येतात हे मंत्रीमहोदयांनी मान्य केले आहे. त्या परिसरातील गरीब आदिवासी शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले आहे. त्यांना नुकसानभरपाई देण्यात आली आहे काय? कोणत्या दिवशी जनावरे आणली गेली होती आणि त्यांना कधी हुसकावून लावण्यात आले याच्या तारखा मंत्रीमहोदय सभागृहाला सांगतील काय? या संदर्भात राजस्थान सरकारला कळविण्यात आले आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, राजस्थान राज्यातील बुंदी जिल्हयातून दलाल लोक जनावरे घेऊन येतात. ही जनावरे महाराष्ट्रात विक्रीसाठी आणली जातात. चरण्यासाठी जनावरे आणली जात नाहीत. काही जनावरांची विक्री केल्यानंतर उर्वरित जनावरे तिथेच सोडून दिली जातात ही वस्तुस्थिती आहे. पारशिवनी तालुक्यातून हा रस्ता जातो. तेथे वनाची जमीन आहे. तेथे जनावरांना थांबविले जाते. ही जनावरे तेथील गायरान जमिनीवर चरण्यासाठी जातात. येण्याजाण्याचा मार्ग ठरलेला आहे. त्या मार्गावर शासनाचे लक्ष आहे. वनांचे नुकसान होऊ न देणे हे शासनाचे काम आहे. शासन तेथील वनांचे नुकसान होऊ देणार नाही.

--------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे गोठणे, (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील प्रकल्पाअंतर्गत विस्थापित ९२ कुटूंबाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४) * ३८६४८ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. सुधाकर गणगणे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गोठणे, (ता.संगमेश्वर, जि. रत्नागिरी) हे गांव चांदोली अभयारण्य प्रकल्पाअंतर्गत विस्थापीत झाले असून सुमारे ९२ कुटूंबाचे अद्याप पुनर्वसन झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २००७ रोजी वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावांचे पुनर्वसन लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१), (२) व (३) होय. हे खरे आहे.

सदर प्रकल्प हा कार्यकारी अभियंता वारणा कालवा विभाग क्र.१ इस्लामपूर यांचेमार्फत चालू होता. आता सदर प्रकल्प हा कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, चिपळूण यांचेकडे नागरी सुविधांसाठी वर्ग करणेत आलेला आहे. पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, 92 कुटुंबे विस्थापित झाली, त्यांचे अजूनही पुनर्वसन न होण्याचे कारण काय आहे? या कुटुंबांचे लवकरात लवकर पुनर्वसन करण्याबाबत व त्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कारवाई करण्यात येत आहे?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, चांदोली अभयारण्य प्रकल्पामुळे 22 गावे विस्थापित होत असून त्यापैकी मौजे गोठणे हे एक गाव आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, 92 कुटुंबांचे पुनर्वसन केव्हा होणार आहे?

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38648....... डॉ. राजेंद्र शिंगणे.....

महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, गोठणे गावाच्या पुनर्वसनासाठी आम्ही दोन गावठाणे निर्माण केली असून त्यातील पहिले गावठाण कोल्हापूरमधील दानोली येथे असून एकूण 7 भूखंड आहेत त्यापैकी 56 लोकांना भूखंड वाटलेले आहेत आणि दुसरे गावठाण हातीस ता. संगमेश्वर येथे जवळपास 121 भूखंड पुनर्वसनासाठी तयार केले आहेत. सन्माननीय सदस्यांनी 92 लोकांच्या पुनर्वसनाबाबत प्रश्न विचारला आहे. त्या लोकांना मौ. हातीस, ता. संगमेश्वर येथील 121 भूखंडापैकी काही भूखंड देऊन पुनर्वसनाचे काम पूर्ण केले आहे.

--------------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती जिल्ह्यात जिल्हापरिषद आरोग्य विभागात अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र देऊन नोकरी मिळविल्याबाबत**

**(5) * 37630 श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती जिल्ह्यात जिल्हापरिषद आरोग्य विभागात अनुसूचित जमातीचे बनावट प्रमाणपत्र देऊन श्री. गोहत्रे व काळे यांनी अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर नोकरी मिळवली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आरोग्य विभागात अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देऊन नोकरी लागल्यानंतर सहा महिन्यात या कर्मचाऱ्याची जात प्रमाण पडताळणी समितीकडून तपासणी करुन घेतली आहे काय,

(3) असल्यास, जातीचे प्रमाणपत्र तपासणी समितीकडून (आदिवासी) त्याबाबत कोणता दाखला देण्यात आला व तद्नुसार दोषी आढळून येणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, सदर प्रकरणी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकरिता : (1), (2), (3) व (4) नाही. तथापि, श्री.एस.जी.गोहत्रे यांची दिनांक 22.3.1977 व श्री.एस.डी.काळे यांची दिनांक 23.05.1984 रोजी लसटोचक या पदावर शाळा सोडल्याच्या दाखल्यावरुन (जात-धनगर) नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यावेळी जात समिती गठित करण्यात आलेली नसल्यामुळे जात पडताळणी करण्यात आलेली नव्हती. मात्र दिनांक 13.3.2008 अन्वये संबंधीतांना जात प्रमाणपत्र पडताळणी करुन सादर करण्यांसदर्भात कळविण्यात आलेले आहे.

श्री. संजय दत्त : महोदय, उत्तरात माहिती दिल्याप्रमाणे दि. 13.3.2008 रोजी प्रश्न दाखल केल्यानंतर जात पडताळणी करुन प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. परंतु सन 1984 पासून आजपर्यंत जात पडताळणी करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांनी यासंबंधीची कारवाई का केली नाही?

श्री. रणजित कांबळे : महोदय, श्री. गोहत्रे आणि श्री. काळे या दोघांची नियुक्ती अनुक्रमे सन 1977 आणि सन 1984 मध्ये झाली होती. त्या काळात कास्ट सर्टिफिकेट पडताळणी करण्यासंबंधीची पध्दत नव्हती तर केवळ लिव्हींग सर्टिफिकेटवर नोकरी देत होते. त्यानंतर त्यांनी एस.डी.ओ. च्या माध्यमातून कास्ट सर्टिफिकेट काढून कार्यालयाला सादर केले आणि सन 2000 नंतर ही व्हॅलिडिटीची सिस्टीम सुरु झाली आहे. दोन तीन वर्षे कास्ट व्हेरिफिकेशनला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे .......... ता.प्र.क्र. 37630 ........

उशिर झालेला आहे, कारण व्हॅलिडिटीसाठी वेटिंग असते हे आपल्याला माहीत आहे. तरी देखील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले की, आपण कास्ट सर्टिफिकेट व्हॅलिडिटीची प्रोसिजर करुन ते व्हॅलिडीटी सर्टिफिकेट सादर करावे आणि जोपर्यंत ते प्रमाणपत्र आपण सादर करीत नाहीत तोपर्यंत आपल्याला पदोन्नतीचा फायदा मिळणार नाही.

श्री. विक्रम काळे : महोदय, या कर्मचाऱ्यांची जात पडताळणी होऊन जर त्या अहवालात त्यांनी सादर केलेली प्रमाणपत्रे चुकीची आढळून आली तर त्यांना कामावरुन कमी करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन 1995 पूर्वी ज्यांची नियुक्ती झाली आहे त्यांना यातून रिलीफ देण्यासंबंधी सन 2004 मध्ये शासनाने जी.आर. काढलेला आहे. त्यामुळे त्यांनी सादर केलेले प्रमाणपत्र जरी इनव्हॅलिड झाले तरी त्यांची नियुक्ती झाली त्याच पदावर ते काम करतील, त्यांना कामावरुन कमी करण्याचा प्रश्नच नाही.

श्री. रामनाथ मोते : या दोन कर्मचाऱ्यांची मूळ नेमणूक ही धनगर जातीच्या आधारावर करण्यात आली की, खुल्या प्रवर्गातून करण्यात आली आहे ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, या दोन्ही कर्मचाऱ्यांची मूळ नेमणूक ही खुल्या प्रवर्गातूनच झालेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 37630** .......

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, कास्ट व्हॅलिडिटी का खतरा अनुसूचित जाति और अनुसूचित जनजाति के लोगों पर भी है. मंत्री महोदय ने कहा कि जब तक कास्ट सर्टिफिकेट की जांच-पड़ताल नहीं हो जाती तब तक पदोन्नति देने में दिक्कत आती है. लेकिन जो कर्मचारी ओपन प्रवर्ग में 1997 में नौकरी में नियुक्त हुए थे, उनको पदोन्नति देने में कोई अड़चन नहीं होनी चाहिए.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या कर्मचा-यांची नियुक्ती खुल्या प्रवर्गातून झाली होती. या कर्मचा-यांची पदोन्नती खुल्या प्रवर्गातून होत असेल तर अडचण येणार नाही. जेव्हा हे कर्मचारी जातीचा फायदा घेऊन पदोन्नतीचा लाभ घेण्याचा प्रयत्न करतील तेव्हाच कास्ट व्हॅलिडीटीचा प्रश्न निर्माण होईल.

--------------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वेंगुर्ले तालुक्यातील (जि.सिंधुदूर्ग) मोचेमाड खाडीत अवैध वाळू उपसा सुरु असल्यामुळे बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याबाबत**

**(६) * ३८३३८ श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ले तालुक्यातील (जि.सिंधुदूर्ग) मोचेमाड खाडीत अवैध वाळू उपसा सुरु असल्यामुळे बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्या करिता : (१), (२) व (३) वेंगुर्ले तालुक्यातील मोचेमाड खाडीतील ७ रेतीगटात रितसर लिलाव झाला असून त्याव्यतिरिक्त अनधिकृत वाळू उत्खननाच्या ७ प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. मात्र मोचेमाड खाडीत मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळू उपसा झाल्यामुळे बागायतीचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले नाही.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, वेंगुर्ला खाडीतून अवैध वाळू उपसा होत असल्या प्रकरणी तहसिलदार, वेंगुर्ला यांना कधी समजले? मोचीमाड खाडीतून किती वाळूचा उपसा झालेला आहे? सात लोकांनी जी अनाधिकृत वाळू उपसली त्यामध्ये रॉयल्टीचे किती नुकसान झ ाालेले आहे व संबंधितांवर काय कारवाई करण्यात आलेली आहे?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मोचेमाड खाडीतील अनधिकृत रेती उत्खननाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डने 70 रेती गट प्रमाणित केले होते. 70 रेती गटापैकी 41 गट लिलावासाठी राखून ठेवण्यात आले होते व 41 पैकी फक्त 7 रेतीगटांचेच लिलाव मंजूर केले होते. 7 अनाधिकृत वाळू उत्खननाच्या प्रकरणी रॉयल्टीचे नुकसान झाले होते त्या 7 लोकांकडून 1,85,600/- रु. इतक्या दंडाची रक्कम वसूल केलेली आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपणास ज्ञात आहे की, या विषयावर जेव्हा चर्चा झ ााली होती तेव्हा मी आपल्याकडे सुध्दा वाळू सम्राट तयार झालेले आहे असे सांगितले होते. आता वाळूच्या धंद्यातून खून पडत आहेत. पुणे, नगर जिल्हयात वाळूच्या संदर्भात खून झालेले आहेत. तसेच सावित्री नदी, वसिष्टी नदीच्या पात्रात सुध्दा मोठया प्रमाणात वाळूचा उपसा होत असतो.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 38338** .......

श्री. अरविंद सावंत....

पाणी टिकणार नाही एवढया मोठया प्रमाणात वाळूचा उपसा होत असल्यामुळे कालांतराने महाराष्ट्रात भयानक परिस्थिती ओढवण्याची शक्यता आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, मोची माड या ठिकाणी आपण कोणा-कोणाला परवाना दिले होते, त्यांची नावे काय आहेत, त्यांच्या कंपनीची नावे काय आहेत व या परवाना धारकांना किती वाळू उपसण्याचा परवाना देण्यात आला होता, तसेच या ठिकाणी किती अनाधिकृत वाळू उपसण्यात आली होती व त्यांच्याकडून किती दंड आकारण्यात आलेला आहे?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मोची माड खाडीतील रेती उपसण्यासाठी 7 रेती गटाचे लिलाव मंजूर केले होते त्या सातही लोकांची माहिती माझ्याकडे आहे. यामध्ये रेती गट "ड" 3-3 लिलावाची रक्कम 2,20,900 अशी होती. यासंदर्भात बरीच माहिती असल्यामुळे मी ही सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो. 10 लोकांनी अवैध रित्या वाळूचा उपसा केला किंवा अवैध उत्खनन केले त्यांची नावे सुध्दा माझ्याकडे आहेत. यामध्ये सर्वश्री बाबू गोंडू गावडे, पांडुरंग कृष्णा धुरी, रविंद्र रामचंद्र गावडे, विल्सन सन्तान फर्नांडीस, गफ्फूर इद्रिस खान, दीपक ज्ञानदेव चोपडेकर, विजय चिपकर, जेरॉन फर्नांडिस, एस.एन.ठाकूर असून यांनी नैनीचाड, अन्सुर, अरवली या ठिकाणावरून रेतीचे अवैध उत्खनन केले होते या 10 लोकांकडून आपण 1,85,000/- रुपये दंड अवैध रेती उत्खननाच्या बाबतीत वसूल केलेला आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, ज्यांना परवाने दिले ते रेतीचे उत्खनन करीत आहेत तसेच ज्यांना परवाने दिले नाहीत ते सुध्दा अनाधिकृतपणे रेती उत्खननाचे काम करीत आहेत. एवढया मोठया प्रमाणात रेतीचे उत्खनन होत असतांना आपण फक्त 7 लोकांनाच पकडले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, अधिकृत परवाने धारक आणि अनाधिकृत परवाने धारक हे हातात हात घालून सगळी कामे करतात व शासनाचा 50 टक्के महसूल बुडवतात.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38338 श्री.मधुकर सरपोतदार..

हे खरे आहे काय ? अनधिकृत वाळू उपसण्याचे काम होणार नाही आणि शासनाच्या महसूलाचे उत्पन्न बुडणार नाही यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ? त्याचबरोबर मघाशी सन्माननीय मंत्री महोदयांनी ज्या व्यक्तींची नावे वाचून दाखवली होती त्या व्यक्ती कोणत्या ठिकाणी राहतात आणि त्यांचा नेहमीचा व्यवसाय कोणता आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी मघाशी या व्यक्तींची नावे वाचून दाखवली होती त्यावेळी त्यांच्या गावांचा देखील उल्लेख केला होता. या सर्व व्यक्ती नैची, आड,अनूसर ,अरवली म्हापण या चार पाच गावात राहणारी आहेत आणि त्यांनी अवैधरीत्या वाळूचे उत्खनन केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी दुसरा महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे की, अवैधरीत्या वाळूचे उत्खनन होत आहे ते थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे ? या संदर्भात मी त्यांना सांगू इच्छितो की, अवैधरीत्या वाळूचे उत्खनन होऊ नये म्हणून महसूल विभागाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्या मार्फत अनेक प्रकारच्या योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत ,.अवैधरीत्या वाळूची वाहतूक होऊ नये यासाठी तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार यांचे एक फिरते पथक तयार करण्यात आले असून या पथकाकडून तपासणी केली जाते व वेळोवेळी धाडी घालण्यात येतात . तसेच अवैध वाहतूक होत असलेले ट्रक्स किंवा इतर वाहने जप्त केली जातात. तरी देखील काही ठिकाणी अवैधरीत्या वाळूचे उत्खनन आणि वाहतूक होते ही गोष्ट मी मान्य करतो. या ठिकाणी रेती गट ठरवून देण्यात आलेले आहेत आणि 70 रेती गट प्रमाणित करण्यात आलेले आहेत. त्यापैकी फक्त 7 रेती गटातून वाळूचे उत्खनन करण्यास परवानगी देण्यात आली आहे. बाकीच्या रेती गटातील ग्रामपंचायतीकडून, ग्रामस्थांकडून , शेतक-यांकडून तक्रारी करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे तेथील वाळूचे गट प्रमाणित करण्यात आलेले असले तरी त्याठिकाणी लिलाव करण्यात आलेले नाहीत. प्रमाणित झालेल्या परंतु लिलाव न झालेल्या वाळू गटातून देखील मोठया प्रमाणावर वाळूचे उत्खनन होत असते ही वस्तुस्थिती आहे . अनेक लोकांचा विरोध असल्यामुळे वाळू उत्खननासाठी परवानगी दिली जात नाही. येथून पुढच्या काळात या संदर्भात अजून काही कडक कारवाई करता येईल काय या संदर्भात जिल्हाधिका-यांना सांगून ही यंत्रणा अधिक बळकट करण्यासाठी काही करता येईल या दृष्टीने शासन निश्चितपणे विचार करील.

03-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) G 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 338338....

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना असे सांगितले की, "वाळूचा उपसा झाल्यानंतर बागायतीचे कोणतेही नुकसान होत नाही". मी त्यांना सांगू इच्छितो की, नदीच्या पात्रातून मोठया प्रमाणावर वाळूचा उपसा झाल्यावर खडक लागल्यानंतर पाणी पाझरत नाही. त्यामुळे नदीच्या काठची जी गावे आहेत त्या गावातील विहिरींना पाणी राहत नाही. तेव्हा वाळू उत्खनन होऊ नये म्हणून मोठया प्रमाणावर विरोध होत आहे.वाळूला सोन्यासारखा भाव मिळत असल्यामुळे वाळूसाठी मारामा-या आणि खून व्हावयास लागले आहेत. मागच्या महिन्यापूर्वी नगर जिल्हयात मुळा नदीच्या पात्रातील वाळूच्या उत्खननासंबंधात दोन खून झाले होते. या संदर्भात मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, माझ्या भागातील एका गावाच्या नदीपात्रातून वाळूचे उत्खनन करण्यासाठी लिलाव केला होता परंतु वाळू उचलण्यात येऊ नये म्हणून त्या परिसरातील चार पाच गावातील लोकांनी विरोध केला होता .महिलानी आणि मुलांनी रस्त्यावर येऊन आंदोलन केले होते. तेव्हा त्या ठिकाणची वाळू उचलून न्यावी यासाठी सरकारी अधिका-यांनी पोलीस यंत्रणा बोलावली होती आणि 100-200 पोलीस रायफली घेऊन तेथे आले होते.तेव्हा वाळूचे उत्खनन होऊ नये यासाठी एखाद्या गावातील लोकांनीशेतक-यांनी विरोध केला असेल तर तेथील लिलाव देखील रद्द करण्यात येणार आहे काय

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे., त्या संदर्भात मी सुरुवातीलाच माझ्या उत्तरात असे सांगितले आहे की, त्या ठिकाणी 70 गट प्रमाणित करण्यात आले होते परंतु 7 ठिकाणी वाळू काढण्याची परवानगी देण्यात आली होती. त्या ठिकाणी वाळू काढण्यासाठी शेतकऱ्यांचा ग्रामस्थांचा विरोध होता.सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी सांगितल्याप्रमाणे वाळूचे उत्खनन केल्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या योजनेतील पाणी कमी होत असते. आजूबाजूला जर बागायती शेती असेल तर वाळूचा उपसा झाल्यामुळे त्या भागातील पाणी कमी झाल्यामुळे या बागा सुकतात व शेतीचे नुकसान होत असते. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी सागितलेली सूचना मी मान्य करतो आणि रेती गटाचा लिलाव झाला असेल आणि लिलाव झाल्यानंतरसुध्दा आमच्या भागातील वाळू काढण्यात येऊ नये व हा लिलाव मान्य करु नये असा ग्रामपंचायतीने ठराव केला तर त्या संदर्भात तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील आणि हा लिलावसुध्दा रद्द केला जाईल.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38338 ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी आताच सांगितले की, ग्रामस्थांनी विरोध केला तर तेथील रेती उपसा बंद केला जाईल. पण आता सरकारने अशा प्रकारचे रेतीगट तयार केलेले आहेत आणि जिल्ह्यांमध्ये त्याचा लिलाव करून ठेकेदारांना दिले आहेत व त्या त्या ठिकाणी वाळू ठेकेदारांची तेथे दादागिरी सुरू आहे. यामध्ये फार मोठे रॅकेट या रेती उपसणाऱ्यांचे तयार झालेले आहे. सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, त्यांच्याच जिल्ह्यात, ते ज्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत त्या जिल्ह्यात पिंपळगाव येथे नदीचे पात्र रिझर्व्ह होते. त्या ठिकाणी वाळू उपसा करण्यास काही ग्रामस्थांनी विरोध केला, त्यासंबंधात तक्रारी केल्या असता वाळू उपशाचा ठेका घेणाऱ्या ठैकेदाराने त्या ग्रामस्थांना खून करण्याची धमकी दिली आणि वाळूचा उपसा सुरू ठेवला. या बाबत सर्व संबंधितांकडे, कलेक्टरकडे वगैरेही तक्रारी झाल्या परंतु अजूनपर्यंत त्याबाबत काहीही कारवाई करण्यात आलेली नाही. तेथे वाळू उपसणाऱ्यांचे मोठे रॅकेट झालेले आहे आणि त्यांच्यामुळे बांधकामाचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे जिल्ह्याजिल्ह्यामध्ये भरारी पथके निर्माण करून ज्या ठिकाणी आपण रिझर्वेशन ठेवले आहे, तेथे गावाचा विरोध असेल तर तेथील वाळू उपसा आपण रोखणार काय ? तसेच भरारी पथकाची निर्मिती करणार काय ? सभापती महोदय, मी जे उदाहरण दिले त्या पिंपळगाव येथील रिझर्व्हेशनमधील नदीतील रेती काढली जात असल्याच्या कॅसेट देखील तक्रारदारांनी कलेक्टर वगैरेंना दिल्या आहेत. तरी देखील त्या अधिकाऱ्याने कोणतीही कारवाई त्या संबंधात केली नाही त्याबद्दल चौकशी करून संबंधितांवर आपण कारवाई करणार काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी सांगितले ते उदाहरण माझ्याच जिल्ह्यातील आहे. त्यामुळे निश्चितपणे त्यांनी कलेक्टरकडे ज्या तक्रारी दिलेल्या आहेत, रिझर्व्हेशन असलेल्या भागातील अवैध वाळू उत्खनन झाले असेल तर त्याबाबत ताबडतोब चौकशी केली जाईल आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. तसेच भरारी पथकाबद्दल मी अगोदरच सांगितले आहे की, या संदर्भात आपण भरारी पथके नेमलेली आहेत. केवळ त्यांना अधिक सक्षम करण्याची गरज आहे इतकेच. तेव्हा अशा प्रकारे अवैधरित्या वाळू उत्खननाच्या तसेच वाहतुकीच्या घटना घडत असतात त्यावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने भरारी

...... एच 2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. शिंगणे (पुढे चालू...) ता.प्र.क्र.38338 ....

पथकांच्याबाबतीत देखील शासन कारवाई करील आणि ग्रामस्थांनी ठराव करून विरोध नोंदविला असेल तर, सन्माननीय सदस्य श्री.गडाख आणि श्री. फुंडकर यांनी आताच सांगितल्याप्रमाणे, वाळू उत्खननाचे झालेले लिलाव देखील रद्द केले जातील.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये विशेष उल्लेखाच्या माध्यमातून वाशी खाडीमध्ये रेतीचे मोठ्या प्रमाणात उत्खनन होत असल्याबद्दलचा विशेष उल्लेख मी येथे मांडला होता. तेव्हा आता यानिमित्ताने मी आपल्या एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, त्या बाबतीत ताबडतोब जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाई केली तर आम्हालाही न्याय मिळेल. यासाठीमाननीयमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची एक बैठक घेऊन त्यांना सांगितले तर मला वाटते महिनाभरामध्ये या बाबत कारवाई होऊन या गोष्टींना आळा बसेल एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. धन्यवाद.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आता माननीय राज्यमंत्र्यांनी आपल्या उत्तरात सांगितले की,ग्रामपंचायतीने ठराव दिला तर वाळू उपशाचे झालेले लिलाव देखील रद्द केले जातील. परंतु आताच येथे सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले की, या व्यवहारांतून रेती सम्राट निर्माण झालेले आहेत. त्यामुळे या साऱ्या व्यवहारामध्ये राजकीय दबाव इतका आहे की, अशा प्रकरणात तक्रार करण्यास कोणी धजावतनाही ही वस्तुस्थिती आपण मान्य करणार काय ? दुसरे म्हणजे अशा प्रकारे जे रेती गट आपण दिलेले आहेत त्यांचे पुन: सर्वेक्षणकरून तेथे जमिनीची धूप किती झालेली आहे वगैरे बाबी पाहून तेथे वाळू उपसा करणे योग्य आहे की नाही हे पाहूनच आपण याचे लिलाव देणार का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, रेतीगटाचे लिलाव करीत असताना ही सगळी प्रोसेस पार पाडूनच आपण लिलाव करीत असतो. त्यापूर्वी मेरीटाईम बोर्डाची तसेच अन्य संबंधित विभागांची देखील मान्यता घेतली जाते. त्यात जीएसडीए वगैरे सगळ्यांची संमती घेऊनच रेती गटाचे लिलाव आपण करीत असतो. या रेती गटाच्या माध्यमातून 441 कोटीचा महसूल आपल्याला मिळत असतो. ....

( यानंतर श्री. सरफरे ....आय 1 ..

अधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38338...

डॉ. राजेंद्र शिंगणे...

हा महसूल मिळत असल्यामुळे माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे राजकीय दबावाखाली अनेक ठिकाणी लोक तक्रार करीत नाहीत. माझ्या माहितीप्रमाणे ज्या गावांमध्ये अशाप्रकारे रेतीच्या गटाचा लिलाव होतो, तो झाल्यानंतर पिण्याच्या पाण्याला बाधा येत असेल, शेतीचे, फळबागांचे, रस्त्यांचे नुकसान होत असेल अशा ठिकाणी ग्रामपंचायतीचे सरपंच किंवा ग्रामस्थ तक्रार करतात. अशा तक्रारींची दखल घेऊन योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आता सांगितले की, ग्रामपंचायतीने ठराव केला आणि सरकारला कळविले तर शासन तो लिलाव रद्द करील. नेवासा ग्रामपंचायतीने तेथील वाळू उचलू नये याकरिता ठराव करुन जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला. त्यानंतर अहमदनगर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच आणि सदस्यांनी वाळू उचलायला विरोध केला म्हणून तुमचे सदस्यत्व रद्द कां करु नये अशाप्रकारची नोटीस त्यांना दिली. तेव्हा ही नोटीस मागे घेण्याबाबत आपण अहमदनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देणार काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नेवासा ग्रामपंचायतीने केलेली तक्रार तपासून घेण्यात येईल. आणि जर तेथील वाळू उचलण्यास विरोध केला म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना नोटीस दिली असेल तर जिल्हाधिकाऱ्यांना ती नोटीस मागे घेण्याबाबत सूचना देण्यात येतील.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील नापिकी व कर्जबाजारीपणामुळे बाधित झालेल्या शतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत**

**(७) * ३७६६६ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजन तेली , श्री.अरुण गुजराथी , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , श्री.परशुराम उपरकर , डॉ. दिपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. सुरेश जेथलिया , श्री. किसनचंद तनवाणी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नापिकी व कर्जबाजारीपणा यामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची योजना केंद्र शासनाने नुकतीच जाहिर केलेली असून त्याचा महाराष्ट्र राज्यातील बाधित शेतकऱ्यांना लाभ होणार आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची माहिती राज्य शासनाने केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन घेतली आहे काय, असल्यास या योजनेचे स्वरुप काय आहे व त्याच लाभ राज्यातील साधारणत: किती शेतकऱ्यांना होण्याची शक्यता आहे,

(३) उक्त योजनेची अंमलबजावणी केव्हा पासून सुरु होणार आहे व ती किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे आणि त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) केंद्र शासनातर्फे धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

(२) व (३) केंद्र शासनाच्या निर्णयाचा तपशील जाहीर झाल्यावर कोणते बदल आवश्यक आहेत ह्या संबंधी राज्य शासनाच्या स्तरावर विचार करण्यात येईल.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, कर्जमाफीसंबंधीचे केंद्र सरकारचे धोरण जेव्हा केव्हा स्पष्ट होईल तेव्हा होईल. त्यावेळी राज्य शासन त्या कर्जमाफीमधील आपला वाटा उचलणार आहे काय? असल्यास, तो किती असेल? दुसरा प्रश्न असा की, बिगर शेती पतसंस्था, खाजगी सावकार यांच्याकडून घेतलेले कर्ज, पाईपलाईन, इलेक्ट्रीक मोटर वगैरेसाठी शुगर डेव्हलपमेंट फंडमधून घेतलेले कर्ज माफ करण्यासंदर्भात राज्य सरकार स्वतंत्र पातळीवर कर्जमाफी देण्याबाबत विचार करणार काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, केंद्र सरकारने अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये अतिशय महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक असा निर्णय घेतला आहे. अर्थसंकल्पामध्ये निर्णय घेतल्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

ता.प्र.क्र. ३७६६६...

डॉ.पतंगराव कदम.........

पुढील प्रक्रियेची पध्दत माननीय सदस्यांना माहीत आहे. त्यामुळे अर्थसंकल्प मांडतांना घेण्यात आलेल्या निर्णयावर संसदेमध्ये चर्चा होईल व त्यानंतर अंतिम निर्णय होईल. माननीय केंद्रीय अर्थमंत्र्यांनी साधारणपणे ६० हजार कोटींचा अंदाज व्यक्त केला आहे. अशाप्रकारचा निर्णय झ ाल्यानंतर राज्यातील सर्व डी.डी.आर. आणि जॉईंट रजिस्ट्रार यांची बैठक घेण्यात आली. आणि राज्यामध्ये एकूण कर्जमाफीच्या प्रकरणांची स्थिती काय असेल याची तपासणी करण्यात आली. ही तपासणी टेंटेटीव्ह अशाप्रकारची करण्यात आली. तेव्हा जोपर्यंत केंद्र सरकारकडून आदेश येत नाहीत....

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:45

ता.प्र.क्र.37666 . . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे, तो आपण समजून घ्यावा. माननीय मंत्री महोदय नक्की उत्तर देतील अशी अपेक्षा आहे.त्यांनी मघाशी असे सांगितले की, आमच्याकडे अजून केंद्र शासनाकडून एक्झॅक्ट ऑर्डर यावयाची आहे.ती येईपर्यंत टेन्टेटीव्ह. . एवढे बोलून ते थांबले. पण आमचे असे म्हणणे आहे की, ती ऑर्डर येईपर्यंत टेन्टेटीव्ह म्हणजे तात्पुरत्या स्वरुपामध्ये शासन काय करणार आहे ते त्यांनी सांगावे.

**सभापती** : माननीय मंत्री महोदय अचूक उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यांना जर मध्येच कोणी उप प्रश्न विचारला तर माननीय मंत्री महोदयांची पंचाईत होते.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, याठिकाणी कोणीही कितीही उपद्रव केला तरी त्याचा माझ्यावर काहीही उपयोग होणार नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, टेन्टेटीव्ह आणि एक्झॅक्ट याचा अर्थ काय आहे ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी याचा अर्थ समजावून सांगतो. सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

**सभापती** : टेन्टेटीव्ह म्हणजे अंदाजित स्वरुपामध्ये आणि एक्झॅक्ट म्हणजे निश्चित स्वरुपामध्ये. आज त्यांनी असे सांगितले आहे की, सध्या आम्ही यासंबंधात आकडेवारी गोळा करीत आहोत. ही माहिती गोळा झाल्यानंतर निश्चित कळू शकेल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ही आकडेवारी गोळा केली आहे. त्यांनी 60 हजार कोटीच्या बाबतीत उल्लेख केलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरातून जे ध्वनित होत आहे, त्याची माहिती पाहिजे. केंद्र शासनाकडून ऑर्डर येईपर्यंत टेन्टेटीव्ह स्वरुपामध्ये, म्हणजे नक्की काय करीत आहात हे आम्हाला सांगावे.

**सभापती** : याठिकाणी माननीय सहकार मंत्र्यांनी असे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे की, केंद्र शासनाने ही क्रांतीकारी योजना जाहीर केलेली आहे. त्या अनुषंगाने राज्याला किती फायदा होईल याकरता . . . .

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आम्ही याची तपासणी सुरु केलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, अजून निश्चित झालेले नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37666 . . . . .

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, अगोदर माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. महाराष्ट्रात साधारणपणे 5 एकरापर्यंत असलेले 43 लाख 42 हजार शेतकरी समाविष्ट होतील.तसेच साधारणपणे महाराष्ट्रामध्ये 10, 246 कोटी रुपयांची कर्जमाफी होईल. त्यामध्ये सर्व को-ऑपरेटीव्ह संस्था समाविष्ट होतील. माननीय अर्थमंत्र्यांनी महोदयांनी असे सांगितले की, "All Co-operative Institutions." हे शब्द आहेत. आम्ही याचा अर्थ असा काढलेला आहे की, यात राज्य बँक, भू-विकास बँक, जिल्हा बँक, पत संस्था, अर्बन बँक, नागरी बँक आणि राष्ट्रीयकृत बँक आहेत. या पध्दतीने आपण महाराष्ट्रातील आकडेवारी तयार केलेली आहे आणि केंद्र शासनाला तशी माहिती कळविलेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी जो स्पेसिफीक प्रश्न विचारलेला आहे, तो बरोबर आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "नापिकी व कर्जबाजारीपणा यामुळे बाधित झ ाालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची योजना केंद्र शासनाने नुकतीच जाहीर केलेली असून त्याचा महाराष्ट्र राज्यातील बाधित शेतकऱ्यांना लाभ होणार आहे हे खरे आहे काय ?" त्याबाबत असे म्हटलेले आहे की, आम्हाला केंद्र शासनाकडून कळलेले नाही. तर माझा प्रश्न असा आहे की, शासनाला हे कधी कळणार आहे ? त्यावर माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आमचे अज्ञान आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी प्रश्न विचारीत आहे. माननीय मंत्री महोदय असे म्हणाले की, . . . .

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आमचे अज्ञान नाही. तर तुमचे प्रोसीजरच्या बाबतीत अज्ञान आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमचे अज्ञान आहे, तुमचे नाही. आम्ही तुमच्या ज्ञानाबद्दल काहीच बोलत नाही. पण ते पुढे एवढे गंभीर बोलले आहेत की, त्यांनी आणि आम्ही सदनामध्ये बसूच नये अशी परिस्थिती आहे. पण आमच्यातील प्रेमामुळे काही बोलत नाही. मात्र माननीय मंत्री महोदय हे बरोबर बोलत नाहीत. केंद्र शासनाने अर्थसंकल्पिय प्रोसीजरमध्ये धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे आणि जे आम्हाला काही कळत नाही हे त्यांना माहिती आहे....

. . . .जे-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याला किती कालावधी लागेल ? त्यानंतर आमच्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मुक्त श्वास घेण्यासाठी राज्य शासन कधी सवलत देणार आहे ? हा विषय आहे, तो माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला समजावून सांगावा.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आता 15 एप्रिल 2008 पासून परत लोकसभेचे अधिवेशन सुरु होत आहे. मग लोकसभेने याला मंजूरी दिल्यानंतर महाराष्ट्र राज्याकडे प्रत्यक्षात ऑर्डर येईल. तसेच माननीय पंतप्रधान आणि माननीय अर्थमंत्र्यांनी लोकसभेमध्ये जाहीर केलेले आहे की, आम्ही यासंबंधातील कार्यवाही जूनपर्यंत करु.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर झाल्यानंतर, केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे गाईड लाईन्स् आलेल्या आहेत काय ? कर्जमाफीचे निश्चित स्वरुप काय आहे ?

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37666 ...

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, गाईडलाईन्सच्या संदर्भात, राज्य शासनाला अद्यापी माहिती प्राप्त झालेली नाही. को ऑप इंस्टिटयूशन्सला कर्ज कसे द्यावे याची अद्ययावत लेखी माहिती अजून राज्य शासनास प्राप्त झालेली नाही. 31 मार्च ऐवजी ही मुदत डिसेंबर पर्यंत वाढविण्यात येणार आहे अशी चर्चा सुरु आहे. परंतु त्या संदर्भात लेखी ऑर्डर जोपर्यंत शासनास प्राप्त होत नाही तोपर्यंत माहिती देता येणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केंद्र शासनाने कर्ज माफी करण्याची घोषणा केली आहे. केंद्र शासन 60 हजार कोटी रुपयांची कर्ज माफी करणार आहे. 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यासाठी तरतूद कशा पद्धतीने करण्यात आली आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जून महिन्यापूर्वी शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यास सुरुवात झालेली आहे. आता सोसायटयांचे एनसी स्टेटमेंट करण्यास सुरुवात झालेली आहे. आता एप्रिल महिना उजाडलेला आहे. तरी देखील कर्ज माफीच्या संदर्भात केंद्र शासनाकडून कोणतेही पत्र आलेले नाही. केंद्र शासनाने 31 मार्च 2007 ही डेडलाईन ठरविलेली आहे. विदर्भातील 6 जिल्हयांना पॅकेज दिले होते. त्या जिल्हयातील शेतकऱ्यांच्या कर्जाचे व्याज माफ करुन त्या कर्जाचे पुनर्गठन करण्यात आले होते. त्या शेतकऱ्यांना जून महिन्यामध्ये पुन्हा कर्ज दिले होते. त्यामुळे ही मुदत न वाढविल्यास विदर्भातील बरेचसे शेतकरी या योजनेत बसणार नाहीत. ज्या विदर्भामध्ये 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. खरे तर विदर्भातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यामुळे सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ होणार आहे. असे असताना त्या जिल्हयातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळाला नाही तर या योजनेचा काहीच उपयोग होणार नाही. विदर्भातील शेतकरी या योजनेपासून वंचित राहणार आहेत. त्यांना या पॅकेजचा काहीही उपयोग होणार नाही. म्हणून माझी शासनास विनंती आहे की, त्यांनी पूर्वी दिनांक 31 मार्च, 2007 पर्यंत जी डेडलाईन ठरविलेली होती, ती वाढवावी. तसेच ही तारीख केंद्र शासनाला देखील कळवावी.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय देखील या संदर्भात समाधानी नाहीत. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी असे स्टेटमेंट केले होते की, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांना मर्यादा वाढवून दिली पाहिजे. या संदर्भात राज्य शासनाने, केंद्र शासनाकडे काही प्रस्ताव पाठविलेला आहे काय, तसेच या प्रस्तावास केंद्र शासनाने काय प्रतिक्रिया दिलेली आहे ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा व कायम दुष्काळी भागामधील शेतकऱ्यांना कर्जमाफीची मुदत डिसेंबर पर्यंत वाढविण्याची मागणी केलेली आहे. ही मागणी तत्वत: मान्य झालेली आहे. डिसेंबर 2007 पर्यंत ही मुदत वाढविण्यात येईल.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, शासनाने ही मागणी केंद्र शासनाने केव्हा केलेली आहे ?

**सभापती** : प्रा. बी.टी. देशमुख यांना आपणास प्रश्न विचारण्याची नंतर संधी देण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विदर्भातील 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे. तेथील शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नसेल तर या कर्जमाफीचा काहीही उपयोग होणार नाही. पूर्वी 31 मार्च 2007 ही तारीख ठरविलेली होती. त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्याकरिता, ही मुदत वाढविण्याची आवश्यकता आहे. राज्य शासनाने मुदतवाढ करण्याची मागणी केंद्र शासनाकडे केव्हा केली आहे व ही मागणी केंद्र शासनाने केव्हा मान्य केलेली आहे असा प्रश्न सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी मघाशी विचारला होता.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, केंद्रीय कृषी मंत्र्यांनी सहकार सचिवाची एक बैठक घेतली होती त्या बैठकीच्या वेळी या संदर्भात चर्चा झाली होती. त्यावेळी सहकार सचिवांनी महाराष्ट्राच्या वतीने पूर्वी ठरविलेली मुदत वाढवून डिसेंबर पर्यंत केली पाहिजे अशी मागणी केली होती. ही मागणी तत्वत: मान्य होण्याची शक्यता आहे अशी माहिती सहकार सचिवांनी दिलेली आहे.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय माननीय मंत्री महोदय, डॉ. पतंगराव कदम यांनी उत्तर देताना वाक्य बदलले आहे. ही कोणती पद्धत आहे ? माझे असे स्पष्ट म्हणणे आहे की, त्यांना वाक्य बदलण्याची संधी देण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करुया का ? त्यांनी येथे वाकय बदलले आहे. पूर्वी त्यांनी म्हटले होते की, मुदत वाढविण्याची विनंती केलेली आहे व ती मागणी तत्वत: मान्य झालेली आहे. हा प्रश्न शेतकऱ्यांच्या जीवनमरणाशी संबंधित आहे. म्हणून या संदर्भात मी प्रश्न विचारला होता की, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केव्हा तत्वत: विनंती केली

..3..

व ती विनंती केव्हा मान्य झालेली आहे असे मी माननीय मंत्री महोदयांना विचारले होते. परंतु माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना त्यांचे वाक्य बदलले. हे बरोबर नाही. हे अन्यायकारक आहे. या सभागृहामध्ये जनतेला न्याय मिळाला पाहिजे. म्हणून माझा स्पेसिफिक असा प्रश्न आहे की, मुदतवाढीची विनंती केंद्र शासनाकडे केव्हा केली व ती विनंती केद्र शासनाने केव्हा मान्य केली ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, हा संपूर्ण विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. या संबंधीचे सर्व धोरणात्मक निर्णय हे केंद्र शासनाने घेतलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37666 ....... डॉ. पतंगराव कदम .....

शासनाची प्रोसीजर आपणा सर्वांना माहीत आहे. जोपर्यंत शासनाकडे लेखी आदेश येत नाहीत तोपर्यंत बैठका, सूचना सातत्याने चालू असतात. आम्ही सुध्दा यासंबंधी सूचना केलेल्या आहेत. डी.पी.ए.पी. एरिया यामध्ये आला पाहिजे, विदर्भ आणि मराठवाड्यात 15 एकरपर्यंत हे मान्य झाले पाहिजे अशा सूचना केलेल्या आहेत.

प्रा. बी. टी. देशमुख : माननीय मंत्रिमहोदय, उत्तर टाळत आहेत.

डॉ. पतंगराव कदम : मी उत्तर टाळलेले नाही. बैठकीमध्ये आम्ही मागणी केलेली आहे आणि अशी माहिती मिळाली आहे की, डिसेंबरपर्यंत मुदत वाढण्याची शक्यता आहे. परंतु जोपर्यंत हातात पत्र येत नाही तोपर्यंत आम्ही 'शक्यतो' असेच सांगणार.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी पहिल्यांदा असे सांगितले की, तत्वत: मान्य केलेले आहे आणि आता ते वाक्य बदलत आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एका एका मिनिटात माननीय मंत्रिमहोदय वाक्य बदलत आहेत.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, पहिल्यांदा सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या प्रश्नाला उत्तर देत असताना आपण असे सांगितले की याबाबतीत डिसेंबर पर्यंत मुदत मागितलेली आहे आणि ती मान्य झालेली आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी प्रश्न विचारल्यानंतर आपण असे सांगितले की, राज्यांच्या सहकार सचिवांची बैठक मागच्या आठवड्यात दिल्लीला झाली त्यावेळी राज्याच्या सहकार सचिवांनी या पध्दतीची मागणी केली आणि ती मागणी मान्य होण्याची शक्यता आहे. याबाबतीत आपण पुन्हा एकदा निश्चित सांगावे. याबाबतीतील आपली मागणी मान्य झाली आहे काय आणि डिसेंबर पर्यंत मुदत वाढविली आहे काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, या कर्जमाफीच्या धोरणाबद्दल अनंत प्रश्न आहेत...

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

ता. प्र. क्र. 37666 .......

प्रा. बी. टी. देशमुख : माननीय सभापती महोदयांनी जे विचारले तेवढेच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, ज्या सूचना केलेल्या आहेत त्याचे उत्तर अजून आमच्याकडे आलेले नाही. आमच्या सूचना आम्ही केलेल्या आहेत. त्याचे उत्तर आल्यानंतर त्यासंबंधीचे उत्तर आम्ही देऊ. हा सगळा विषय केंद्र शासनाचा आहे. हे राज्याचे धोरण नाही.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आपण विचारलेल्या प्रश्नाला सुध्दा माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले नाही.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, या कर्जमाफीच्या संदर्भात मी माननीय सहकार मंत्र्यांना प्रश्न विचारतो. केंद्र शासनाने जी कर्जमुक्ती केलेली आहे त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. विरोधकांच्या.....

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, हे बरोबर नाही.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात )

**सभापती** : मी सन्माननीय सहकार मंत्र्यांना सांगू इच्छितो की, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने याबाबतीमध्ये केंद्र सरकारकडे प्रयत्न करुन 31 डिसेंबर पर्यंत अशा पध्दतीची मुदत मिळेल असा आपण प्रयत्न करावा आणि याबाबतीत आपण स्पष्ट सांगावे.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात )

**सभापती** : माननीय सहकारमंत्री डॉ. पतंगराव कदम यांना आणखी काही सांगावयाचे आहे काय ?

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37666.....

( सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलत असतात व विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये एकत्र जमून घोषणा देत असतात. )

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

( सभागृहात घोषणा सुरुच असतात )

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर जाऊन बसावे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने सन्माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या परीने उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. (अडथळा) मी हा प्रश्न राखून ठेवू शकणार नाही.

सभागृहात गोंधळाचे वातावरण असल्यामुळे सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.01 ते 1.16 पर्यंत स्थगित झाली. )

------

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. त्यानंतर सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य देखील जोरजोराने घोषणा देत असतात.)

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये उपस्थित करण्यात आलेला प्रश्न हा शेतक-यांच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न असल्यामुळे मी त्या प्रश्नाच्या चर्चेसाठी 20 मिनिटे वेळ दिला. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी जे जे प्रश्न विचारले त्या प्रश्नांना माननीय मंत्री महोदयांनी उत्तरे दिलेली आहेत. आता दोन्ही बाजूकडून घोषणा दिल्या जात आहेत. अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज अर्धा-तासाकरिता तहकूब करीत आहे.

(दुपारी 1.19 ते 1.49 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 15 मिनिटासाठी तहकूब करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.51 ते 2.07 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------------

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

श्री. विक्रम काळे (समिती सदस्य) : सभापती महोदय, शुक्रवार दिनांक 4 एप्रिल 2008 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीयठराव व पुर:स्थापनार्थ असलेले एक विधेयक यास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार,दिनांक 3 एप्रिल 2008 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. श्री. अनिल परब, वि.प.स. यांचे एक अशासकीय विधेयक पुर:स्थापनार्थ आहे. त्यास 5 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 145 मिनिटांचा वेळ खालीलप्रमाणे अशासकीय ठरावांना देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

**<u>अशासकीय विधेयक :-</u>**

सन 2008 चे वि.प.वि.क्र.7 श्री. अनिल परब,वि.प.स. 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(1) ठराव क्रमांक 123 -श्री. विक्रम काळे,वि.प.स. 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(2) ठराव क्रमांक 23 - श्री. दिवाकर रावते,वि.प.स. 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव**

(1) ठराव क्रमांक 108 - श्री. कपिल पाटील, वि.प.स. 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(2) ठराव क्रमांक 45 - श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(3) ठराव क्रमांक 53 - श्री. केशवराव मानकर, वि.प.स. 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही

यापैकी कोणत्याही ठरावांचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

**उपसभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. विक्रम काळे (समिती सदस्य) : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत,सर्वश्री अनिल परब, अरविंद सावंत यांनी " सिंधुदूर्ग जिल्हयातील शिक्षण विभागाने सादील खर्चातून माधव कदम लिखित 300 रु. किंमतीचे पुस्तक प्रत्येक शाळेने खरेदी करण्याचे लेखी व तोंडी आदेश देणे,कोकणात नाथ पै, मधु दंडवते, भाई सावंत, जयानंद मठकर इ.थोर विचारवंत झालेले असताना त्यांच्या लिखाणाबाबत मात्र अशी भूमिका न घेणे, त्यामुळे विद्यार्थी व पालकात निर्माण झालेला असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी " वानखेडे स्टेडियमलगतचा 21,882 चौ.वार क्षेत्रफळचा भूखंड हॉकी या खेळाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दिनांक 31 मे 1968 च्या शासन निर्णयाद्वारे लिजवर मुंबई हॉकी असोसिएशन या संस्थेस वितरीत करण्यात येणे, सदरहू लिजचे नूतनीकरण न केल्यामुळे हॉकी प्रेमींमध्ये पसरलेला असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, रामनाथ मोते, श्रीकांत जोशी, संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी " मुंबई महापालिकेच्या महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेतील शिक्षकेचा विनयभंग केल्याप्रकरणी पोलिसांनी शिक्षकांस अटक करणे, सदर शिक्षकास दारुचे व्यसन असून त्याला तात्काळ निलंबित करण्याची शिक्षक व पालकांची असलेली मागणी " या विषयाबर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते यांनी " कोकण किनारपट्टीवरील प्रवासी वाहतूक करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना रत्नागिरी किंवा सिंधुदूर्ग येथे प्रशिक्षणाची सोय नसणे,त्यांना रत्नागिरी किंवा सिंधुदूर्गमध्ये प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्याची मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.......3



SSK/ SBT/ KTG/ 14:05

**उपसभापती** ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर,प्रतापराव सोनवणे यांनी "अनक खाजगी अनुदानित शाळा शासनाकडून वेतनेतर अनुदान घेत असून शासनाचे आदेश पायदळी तुडवून कर्मचाऱ्यांना त्रास देत असणे,नागनाथ विद्यालय, मोहोळ,जि.सोलापूर येथील शाळेतील सेवानिवृत्त शिक्षकांचे निवृत्तीवेतन प्रस्ताव 4 वर्षे होऊनही पाठविलेले नसणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "राज्य शासनाने डिसेंबर 2005 मध्ये 1075 कोटी रुपयांचे विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना धोषित केलेले पॅकेज आणि जून 2006 मध्ये पंतप्रधान पॅकेज घोषित होऊनही शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण वाढलेले असणे, विदर्भातील शेतकऱ्यांना 7/12 कोरा करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाकडून मिळालेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य शासनाने त्यामध्ये अतिरिक्त निधीची तरतूद करुन शेतकऱ्यांना कर्जमुक्ती करण्यासाठी घ्यावयाचा धोरणात्मक निर्णय " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील, जयंत पाटील यांनी " दिनांक 2.4.08 रोजी पुणे येथील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयावर हल्ला करुन तेथील कार्यकर्त्यांना भारतीय जनता युवा मोर्चाचे व हिंदू गर्जना या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केलेली जबर मारहाण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी " पुण्याच्या बी.जे.वैद्यकीय महाविद्यालयाच्या 171 विद्यार्थ्यांना 50 टक्केपेक्षा कमी गुण मिळाल्याचे कारण पुढे करुन त्यांना परिक्षेस बसण्यास 11 महिन्यांनंतर अपात्र करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

......4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "गावात दारुबंदी करण्यासाठी 25 टक्के महिलांनी केलेल्या सहया पडताळून पाहण्याची तसेच ग्रामसभेने केलेल्या ठरावाची चित्रफित सादर करण्याची घातलेली अट " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ताकारी,म्हैसाळ व टेंभू या योजनांना निधी देऊन त्या पूर्ण करणे

**मु. शी.** : ताकारी,म्हैसाळ व टेंभू या योजनांना निधी देऊन त्या पूर्ण करणे याबाबत श्री प्रकाश शेंडगे, प्रा. शरद पाटील वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री प्रकाश शेंडगे, प्रा. शरद पाटील यांनी "ताकारी, म्हैसाळ व टेंभू या योजनांना निधी देऊन त्या पूर्ण करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, सांगली जिल्ह्यातील जत, कवठे-महांकाळ, तासगांव, खानापूर-आटपाडी आणि सांगोला या दुष्काळग्रस्त भागाला वरदायी ठरलेल्या ताकारी, म्हैसाळ आणि टेंभू या तिन्ही योजनांचे काम सन 1984 मध्ये सुरु झाले. आज 25 वर्षांच्या काळात या भागातील दुष्काळी जनता तसेच तेथील शेतकऱ्यांची एक पिढी उद्ध्वस्त झाली आहे. अजूनही या योजना कधी पूर्ण होणार याचे उत्तर शासनाकडे नाही. या योजनेसाठी जवळपास 4225 कोटीची आवश्यकता अजूनही आहे आणि या वर्षी सुध्दा पुरेसा निधी मिळेल हे सांगता येत नाही. मागील अधिवेशनात 16 हजार कोटीचे कर्ज काढून राज्यातील सिंचनाचा संपूर्ण अनुशेष दूर करणार असे शासनाने सांगितले होते. परंतु अद्यापही या प्रकल्पांसाठी निधीची पुरेशी तरतूद होत नाही. त्यामुळे सांगली जिल्ह्यात 86 आत्महत्त्या झालेल्या आहेत तसेच जिल्ह्यातील लोक जगण्यासाठी बाहेर पडत आहेत. म्हणून माझी अशी विनंती आहे की, या राज्यावर 1.50 लाख इतके कर्ज आहेच आणखी 16 हजार कोटीचे कर्ज काढून जर हा प्रश्न मिळत असेल तर तो मिटवावा. कारण पश्चिम महाराष्ट्रातील हा सांगली जिल्हा असला तरी आमचे ठराविक तालुके कोणत्या जन्माचे पाप फेडत आहेत, हेच समजत नाही. म्हणून या योजनांसाठी पुरेपूर निधीची तरतूद करुन त्या योजना पूर्ण करणार काय ?

प्रा. रामराजे नाईक-निंबाळकर : महोदय, टेंभू प्रकल्पाला खरे तर सन 1996 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. ताकारी आणि म्हैसाळ या दोन योजना ज्याला आपण कृष्णा-कोयना लिफ्ट योजना म्हणतो त्या योजना सन 1984 पासून सुरु आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे या तिन्ही योजना अशा आहेत की, ज्यांचे फ्लो इरिगेशननुसार पाणी जाऊ शकत नसल्याने 300-400 मीटरपर्यंत आपण पाणी लिफ्ट केले आहे. परंतु आज परिस्थिती अशी आहे की, यासंदर्भात जो लवादाचा निर्णय येणे बाकी आहे तो अद्याप आला नसून सन 2009 पर्यंत कदाचित तो निर्णय प्राप्त होईल आणि कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अंतर्गत 52 टीएमसी एवढया पाण्याचे जे स्टोअरेज राहिलेले आहे त्याला कॉन्शन डिसीजन घेऊन प्राधान्याने पैसा उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. जरी या योजना प्रलंबित राहिल्याचे म्हटले तरी गेल्या चार वर्षात सेंट्रल वॉटर कमिशन आणि नियाजन मंडळाकडे मागणी करुन व त्या मागणीचा पाठपुरावा करुन अंतिम टप्प्यात या योजनांची मंजुरी आलेली आहे. ज्या क्षणी ह्या मान्यता आपल्याला मिळतील त्या क्षणात अेआयबीपी अंतर्गत पैसे उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

यानंतर श्री. सुंबरे ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य प्रा. पाटील यांना या निवेदनावर प्रश्न विचारण्यास परवानगी देतो. परंतु त्याचबरोबर मी सदनाला सांगू इच्छितो की, आपल्याकडे 16-16 निवेदने आलेली आहेत. ती सर्व घ्यायची म्हटले तर प्रत्येक निवेदनावर एखादाच प्रश्न विचारण्यास मी परवानगी देणार आहे. आपण सर्वांनी कृपया सहकार्य करावे ही विनंती.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, दुष्काळी भागाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. या ठिकाणी निधीच्या संदर्भात मंत्री महोदयांनी जी माहिती दिली त्याविषयी मी असे विचारू इच्छितो की, मध्यंतरीच्या काळात 16 हजार कोटीचे रोखे काढून राज्यातील सर्व प्रलंबित प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल अशी घोषणा राज्य सरकारने केली होती. तेव्हा मी या संदर्भात आपल्याला असा प्रश्न विचारू इच्छितो की, हे 16 हजार कोटीचे रोखे काढून, निधी उभा करून कृष्णा खोऱ्यातील, विदर्भ आणि मराठवाड्यातील देखील जे अपूर्ण प्रकल्प असतील त्यांना निधी त्वरित उपलब्ध करून दिला जाईल काय ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, 16 हजार कोटीचे आश्वासन दिले होते ही वस्तुस्थिती आहे. परंतु मी अत्यंत नम्रतेने सांगू इच्छितो की, या वर्षी राज्याच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच कदाचित, सहा हजार कोटीची तरतूद जलसंपदा खात्यासाठी झालेली आहे. त्यामुळे कर्जरोखे अथवा बजेटमधून या वर्षी सहा हजार, पुढील वर्षी देखील कमीत कमी सहा हजार असे करून आपण राज्यातील या योजना पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न करू. परंतु या संदर्भातील वस्तुस्थिती अशी आहे की, कृष्णा खोरे विकास महामंडळाने आगामी दोन वर्षात स्टोरेजला जे प्राधान्य दिलेले आहे त्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न चालू आहेत. ज्या क्षणाला हा अतिरिक्त निधी उपलब्ध होईल तेव्हा ही टेंभू आणि ताकारी-म्हैसाळ योजनेला प्राधान्याने पैसा उपलब्ध करून देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

***

...... आर 2 ...

**पृ. शी**. : मुंबईतील अंधेरी पूर्व येथील एमव्हीएलयू कॉलेज व चिनॉय कॉलेज बंद करण्याचा संस्थेने घेतलेला निर्णय.

**मु. शी**. : मुंबईतील अंधेरी पूर्व येथील एमव्हीएलयू कॉलेज व चिनॉय कॉलेज बंद करण्याचा संस्थेने घेतलेला निर्णय याबाबत डॉ.दीपक सावंत, ॲड.अनिल परब, श्री.अरविंद सावंत व श्री.परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, ॲड.अनिल परब, श्री.अरविंद सावंत, श्री.परशुराम उपरकर यांनी "मुंबईतील अंधेरी पूर्व येथील एमव्हीएलयू कॉलेज व चिनॉय कॉलेज बंद करण्याचा संस्थेने घेतलेला निर्णय." विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.... आर 3 ... ... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खालील मा. शालेय शिक्षण मंत्र्यांच्या निवेदनानंतर...)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाच्या विषय या निवेदनाद्वारे आपल्यापुढे आलेला आहे त्यामुळे मी प्रथमत: आपल्या निदर्शनास आणून देतो की, आपण स्वत: देखील या निवेदनासंबंधातील विषयावर फार मोठा पुढाकार घेतला होता. तसेच आपण स्वत: या कॉलेजांना व्हिजिट करण्याचे देखील ठरविले होते. पण तो प्रश्न तिकडे थांबला म्हणून आपण ती व्हिजिट रोखून धरली होती. माननीय मंत्री महोदय देखील या चिनॉय कॉलेजला भेट देण्यास येणार होते. सभापती महोदय, आणखी एक गोष्ट मला या संदर्भात आपल्याला सांगितली पाहिजे की,आजच्या वर्तमानपत्रामध्ये याच संदर्भात एक बातमी आली आहे आणि त्यात माननीय राज्यमंत्री श्री.शेट्टी यांचाही उल्लेख आहे. त्या बातमीमध्ये असे म्हटलेले आहे की, या प्रश्नावर काहीच भाष्य न करता राजकीय पक्षाचे नेते मूग गिळून बसले आहेत. शिवसेना, भारतीय जनता पक्ष, कॉंग्रेस, मनसे आदी पक्षांची नेते मंडळी अगोदर आमच्याबरोबर आंदोलनात होती पण आता ती आमच्याबरोबर नाहीत. सभापती महोदय, लोकांचा या संबंधात एक वाईट समज होतो आहे आणि यातून एक वाईट मेसेज जाऊ लागला आहे. म्हणूनच आपण या विषयावर दोन-तीन प्रश्न विचारण्यास कृपया परवानगी द्यावी ही विनंती आहे.

सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, या संस्थेने त्यांच्या 48 शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना काढून टाकले आहे. माझ्या हातात त्यांना त्यासंबंधात दिलेली नोटीस आहे,ती मी आपल्याला वाचून दाखवितो. त्यात म्हटले आहे की, "We are constrained to terminate your services with effect from 26th February, 2008 in lieu of notice contemplated under Standard Code Rules. We offer to pay you salary of Rs. 38,907 for the Notice period of three months." एवढी एकच नोटीस देऊन त्या सगळ्या 44 कर्मचाऱ्यांना घरी जा म्हणून सांगितले गेले आहे. हा त्यांच्यावर फार मोठा अन्याय केलेला आहे. त्या संबंधात शासन येथे उत्तर देते आहे की, केवळ कर्मचाऱ्यांना अतिरिक्त ठेवून इतर महाविद्यालयांमध्ये समावेशन करण्याचा प्रश्न असल्याने या प्रकरणी सदर कर्मचाऱ्यांच्या सहमतीने या कर्मचाऱ्यांनी अन्य महाविद्यालयात समावेशनास सहमती दिल्यास त्यांचे समावेशन नियमानुसार अन्य महाविद्यालयांमध्ये करता येऊ शकते. म्हणजे यामध्ये शासनाने कोणतीही हमी घेतलेली नाही. या संस्थेला करोडो रूपयांची जागा विकण्यास परवानगी शासनाने दिली आहे. हे

...... आर 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

44 वर्षापासूनचे महाविद्यालय आहे. तेव्हा त्यातील या 48 लोकांना, ते तसे गरीब कर्मचारी आहेत, त्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आपण सेवेत सामावून घेण्यासाठी कंपल्शन करणार का ? आणि ते सेवेत राहतील याची जबाबदारी शासन घेणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या संस्थेची एक सिनिअर आणि एक ज्युनिअर अशी दोन कॉलेजेस आहेत आणि तीही विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली आहेत. 2003 साली या विद्यापीठाने या संस्थेबद्दल अनेक तक्रारी आल्या म्हणून एक लोकल इन्क्वायरी कमिटी नेमली होती. कॉलेजमध्ये शैक्षणिक काम चांगले चालू नाही, 1994-92 च्या कायद्याप्रमाणे प्रशासक नियुक्तीचा अहवाल हा आपल्या शिक्षण खात्याने बजावला, त्यासाठी विद्यापीठाची मान्यता घेतली. परंतु ही संस्था उच्च न्यायालयात गेली आणि कोर्टाला सांगितले की, या प्रकरणात आमची बाजू ऐकून घेतली जावी. तेव्हा कोर्टाने सांगितले की, यांचीही बाजू ऐकून घेतली जावी. आता विद्यापीठाने नेमलेली जी लोकल एन्क्वायरी कमिटी आहे ती दोन वेळा या कॉलेजांमध्ये गेली. पण मॅनेजमेंट सहकार्य करीत नाही, प्रिन्सिपॉल हजर राहत नाहीत असा अनुभव त्या समितीला आला आहे. म्हणून आता शेवटची संधी या संस्थेला, उच्च न्यायालयाचा मान राखावा म्हणून समितीने दिली आणि 4.4.2008 रोजी ही समिती पुन्हा एकदा त्या कॉलेजला भेट देण्यास जाणार आहे. पण त्या वेळेसही समितीला पुन्हा तोच अनुभव आला तर त्या संस्थेच्या ज्युनिअर कॉलेजला एक प्रशासक आणि सिनिअर कॉलेजला एक प्रशासक नेमण्याशिवाय दुसरा कोठलाही पर्याय शासनाकडे नाही. ..

( यानंतर श्री. सरफरे .... एस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ ...

तेव्हा या मॅनेजमेंटचा असा विचार दिसतो की, ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश ध्यावयाचा नाही आणि ते कॉलेज बंद पाडावयाचे, त्यानंतर सिनियर कॉलेज बंद पाडून या जमिनीची विल्हेवाट लावावयाची. माननीय उच्च न्यायालयाने त्यांची बाजू ऐकून घेण्याबाबत शासनाला सांगितले आहे. त्यामुळे त्या कॉलेजमध्ये लोकल इन्क्वायरी कमिटी जाऊन पहाणी करुन येइपर्यंत आम्ही वाट पहात आहोत. या दरम्यान ज्या शिक्षकांना टर्मिनेट केले होते ते ट्रॅब्युनलमध्ये गेले. त्यांचे समावेशन करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्याचप्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुध्दा टर्मिनेट केले असल्यामुळे ते सुध्दा ट्रॅब्युनलमध्ये गेले आहेत. या दोन्ही कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही याची खबरदारी शासन घेईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, शासनाने त्याठिकाणी प्रशासक नेमल्यानंतर गेली सहा महिने त्या कॉलेजमध्ये गेलेला नाही. ज्या दिवशी विधान परिषदेमध्ये या विषयावर गोंधळ झाला त्याच्या तिसऱ्या दिवशी प्रशासक त्याठिकाणी गेला. माननीय सभापतींनी निदेश दिल्यानंतर त्यासंबंधी कारवाई झाली. आता त्याठिकाणी प्रवेशाची प्रोसेस सुरु आहे ती थांबविली आहे. 11 वी आणि 12 वीचे प्रवेश थांबविले. प्रश्न असा आहे की, शासनाने एवढी कारवाई करुन सुध्दा शासनाच्या प्रत्येक निर्णयाला हरताळ फासणाऱ्या व्यवस्थापकीय मंडळावर आपण काय कारवाई करणार आहात? सभापती महोदय, आपण निदेश देऊन प्रशासक नेमल्यानंतर हायकोर्टामध्ये जाण्यासाठी त्या प्रशासकाने मॅनेजमेंटला मदत केली. तेव्हा हायकोर्टाकडून देण्यात आलेला स्टे व्हेकेट करण्यासाठी आपण काय कारवाई करणार? एका बाजूला या 48 लोकांना कामावर घेण्यासाठी हे लोक कोर्टामध्ये गेले, त्याबाबत शासन काय कारवाई करणार आहे? विद्यार्थ्यांची प्रवेशाची पुर्नव्यवस्था करणार काय? तसेच, शासनाने त्यांना दिलेल्या सवलती रद्द करण्यासाठी निर्णय घेणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय सदस्यांची जी भावना आहे तीच शासनाची देखील आहे. आणि म्हणून माननीय उच्च न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे आपल्याला त्यांची बाजू ऐकून घ्यावी लागेल. आणि त्यांचे म्हणणे ऐकल्यानंतर शासन त्यांना स्थगिती देईल.

ॲड. अनिल परब : आपण त्याठिकाणी प्रशासक मंडळ नेमले पाहिजे...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या ज्या भावना आहेत त्याच शासनाच्या देखील आहेत.. त्याठिकाणी प्रशासक इतके दिवस कां गेला नाही याची चौकशी केली.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ....

याबाबत माननीय उच्च न्यायालयाने त्यांची बाजू ऐकून घेण्यास सांगितले आहे.दिनांक 4.4.2008 रोजी लोकल इन्क्वायरी कमिटीपुढे मॅनेजमेंटची बाजू ऐकून घेतल्यानंतर त्यांच्यावर कारवाई होईल. तोपर्यंत 48 कर्मचाऱ्यांना ताबडतोब निलंबीत करण्याच्या आदेशाला स्थगिती देऊ. ज्या शिक्षकांना प्रवेश दिला जात नाही त्यांना सुध्दा प्रवेश दिला जाईल. तसेच, त्या कॉलेजमध्ये प्रशासक आल्याशिवाय मॅनेजमेंट ऐकले जाणार नाही. दि.4.4.2008 नंतर प्रशासक नियुक्त केल्यानंतर हे कॉलेज पुन्हा नियमितपणे सुरु राहील. आणि त्यांना दिलेल्या सवलती कशा काढून घेता येईल याबाबत निश्चितपणे विचार करु.

(गोंधळ)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, त्या 48 लोकांना ताबडतोब कामावर घेतले पाहिजे...

श्री. हसन मुश्रीफ : पहिल्यांदा आपल्याला मॅनेजमेंटची बाजू ऐकून घ्यावी लागेल...

(गोंधळ)

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला. हे कॉलेज माझ्या मतदारसंघामधील आहे. गेल्या वर्षी अशाप्रकारची अडचण निर्माण झाली त्यावेळी मी स्वत: त्या कॉलेजमध्ये जाऊन पालक व विद्यार्थ्यांची एक बैठक घेतली. त्यावेळी स्थानिक लोकांना बोलावून घेतले, त्यांची मंत्रालयामध्ये सुध्दा बैठक घेतली व त्या ठिकाणी प्रशासक नेमण्याचा निर्णय घेतला. हा प्रश्न शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित आहे. याबाबत शालेय शिक्षण विभागाने सांगितले की, आपण त्याठिकाणी प्रशासक नेमावा. यानंतर मॅनेजमेंट कोर्टामध्ये गेले आणि त्यांनी सांगितले की, आम्हाला आमची बाजू मांडण्याची संधी दिली नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी . . . .

आमचे हिअरींग झाले नाही, आम्हाला आमची बाजू मांडण्यासाठी संधी दिली नाही. म्हणून कोर्टाने असे सांगितले की, संबंधितांची बाजू ऐकून घेण्यात यावी आणि त्यानंतर जी काही कारवाई करावयाची आहे ती करण्यात यावी. आता माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर खरे आहे. त्यानंतर मी शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अधिकारी यांच्याबरोबर यावर्षी तीन बैठका घेतलेल्या आहेत. तसेच विद्यापीठाचे व्हाईस चान्सलर, प्रो-व्हाईस चान्सलर यांच्याबरोबर देखील 15 दिवसापूर्वी बैठक घेतली. त्याचप्रमाणे याबाबतीत चौकशी समिती नेमण्यात आली आणि त्या समितीने देखील भेट दिलेली आहे. त्या समितीचा रिपोर्ट आल्यानंतर जी कारवाई करावयाची आहे, ती करु. याठिकाणी सन्माननीय पाटबंधारे मंत्री श्री.अजित पवार देखील उपस्थित आहेत. मी सदनामध्ये सांगू इच्छितो की, याबाबतीत आम्ही मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये देखील चर्चा केली होती. मुंबईमध्ये ज्या 50-100 वर्षापूर्वीच्या जुन्या शिक्षण संस्था आहेत, त्या त्यांची प्रॉपर्टी विकण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे याबाबतीत काय करावयाचे ? याची मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा केली. यासंबंधात असा निर्णय झाला की, मुंबईमध्ये ज्या जुन्या शिक्षण संस्था असतील, त्या सर्वांना डी.पी.प्लॅन मध्ये एज्युकेशन परपजसाठी रिझर्वेशनमध्ये घालावे. असे केल्यानंतर जर ती जागा विकली किंवा तेथील मॅनेजमेंटमध्ये बदल झाला तरी ते त्या जागेचा वापर कमर्शिअलसाठी करु शकत नाहीत असा मंत्रिमंडळामध्ये निर्णय घेतलेला आहे. परंतु एम.व्ही.ॲण्ड एल.यू.कॉलेज व चिनॉय कॉलेज यांच्या संबंधात नेमलेल्या चौकशी समितीचा, युनिव्हर्सिटीचा व शालेय शिक्षण विभागाचा रिपोर्ट आल्यानंतर आम्ही नक्कीच कारवाई करु.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मला एक प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

**उपसभापती** : एका निवेदनावर एक किंवा दोन प्रश्न विचारणे ठीक आहे. पण अजून किती प्रश्न विचारावयास परवानगी द्यावयाची ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याठिकाणी 48 कर्मचाऱ्यांचा, लाखो विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. नेमके . . . .

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना नेमके कोणते उत्तर पाहिजे ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आमचे असे म्हणणे आहे की, 48 कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात यावे, जेणेकरुन पुढच्या वर्षीपासून कॉलेज सुरु होईल.

. . . .टी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, आता तेथे प्रशासक किंवा प्रशासक मंडळ नियुक्त करता येणार नाही. कारण कोर्टाने असे सांगितलेले आहे की, त्यांची बाजू ऐकून घ्यावी. त्याप्रमाणे दि.4-4-2008 ही तारीख दिलेली आहे. त्यादिवशी आपण हिअरींग घेऊ आणि काय करावयाचे ते ठरवू.

श्री.अनिल परब : सभापती महोदय, याठिकाणी हाय कोर्टाचा काहीही संबंध नाही. तुमच्या कारवाई मध्ये ते हस्तक्षेप करु शकत नाही. त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावयाचे की नाही . . . .

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, गेल्या वेळेला अशीच घाई-गडबड केली होती. त्यामुळेच हाय कोर्टाने स्टे दिलेला आहे.

श्री.अनिल परब : सभापती महोदय, सभागृहापुढे चुकीची माहिती देण्यात येत आहे. . . . .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण हे निवेदन राखून ठेवावे.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधातील कागदपत्रे सन्माननीय सदस्यांना दाखवावी.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी माझ्या दालनामध्ये सन्माननीय सदस्यांना आणि अधिकाऱ्यांना बोलावून, त्यांच्याशी चर्चा करतो.

**उपसभापती** : ठीक आहे.

-----

. . . .टी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पॉईंट ऑफ इंफर्मेशनसंबंधी</u>

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये ठाणे ग्रामीण आणि शहर येथे जवळपास 70 ते 75 ठिकाणी काही लोकांनी ठाणे जिल्हयाचे विभाजन झाले पाहिजे, ठाणे जिल्हयातील एम.एम.आर.डी.ए.चा 1 लाख कोटी रुपयांचा अनुशेष त्वरित दिला पाहिजे, तसेच ठाणे जिल्हयातील पाणी व वीज टंचाई त्वरित दूर झाली पाहिजे इ.मागण्यांसाठी रास्ता रोको केले. अशा वेळी विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य सर्वश्री.संजय केळकर, विनोद तावडे आणि अनेक महिला या आंदोलनामध्ये सहभागी झालेल्या होत्या. या सर्वांनी रस्ता रोको केले आणि पोलिसांनी जबरदस्तीने महिलांना धक्काबुक्की केली आणि सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांच्या पायांना धरुन त्यांना फरफटत गाडीमध्ये बसविले. विधानसभेचे अधिवेशन सुरु असताना आमदारांना पोलिसांकडून अशा प्रकारची वागणूक मिळणे बरोबर नाही. सभापती महोदय, त्याठिकाणी काय परिस्थिती निर्माण झाली, याबाबतीत आपण शासनाला निवेदन करण्यास सांगितले पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांबरोबर अशा प्रकारचा व्यवहार करणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांना अटक करणे ठीक आहे. पण त्यांना रस्त्यावरुन फरफटत नेले, त्याचे कपडे देखील फाटले आहेत. ही पध्दत आहे काय ?

**उपसभापती** : शासनाने या विषयाच्या संबंधात निवेदन करावे अशी मी सूचना देतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदरहू निवेदन कधी केले जाईल ?

**उपसभापती** : आजच संध्याकाळच्या आत निवेदन केले जाईल.

------

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यात रॅबिजच्या कोटयावधी रुपयाच्या अनावश्यक खरेदीमध्ये शासनास झालेले नुकसान.

मु.शी : राज्यात रॅबिजच्या कोटयावधी रुपयाच्या अनावश्यक खरेदीमध्ये शासनास झालेले नुकसान या बाबत डॉ. दीपक सावंत वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत यांनी राज्यात रॅबिजची कोटयावधी रुपयाच्या अनावश्यक खरेदीमध्ये शासनास झालेले नुकसान या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून ,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, रेबिज या रोगावरील इंजेक्शन्स खरेदी करण्यासाठी 30 कोटी रुपये खर्च केलेले नाहीत असे निवेदनात म्हटले आहे. श्वानदंशावरील लस खरेदी करण्याकरिता किती कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत हे या ठिकाणी स्पष्ट करावे. तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, 281 रु. प्रति व्हायल याप्रमाणे खरेदी करण्यात आली आहे असे आपण निवेदनामध्ये म्हटले आहे. परंतु याच अधिवेशनामध्ये साधारण आठ दिवसांपूर्वी एका प्रश्नाला उत्तर देताना आपण असे सांगितले होते की, 230 रुपये प्रति व्हायल याप्रमाणे श्वानदंशावरील लसीची खरेदी करण्यात आलेली आहे. या ठिकाणी माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, 281 रुपये प्रति व्हायल या दराने खरेदी करण्यात आलेली आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, 30 कोटी रुपयांचे व्हायल खरेदी केलेले नाहीत. 16 कोटी 89 लाख, 76 हजार रुपयांची खरेदी केलेली आहे. पूर्वी हे औषध खरेदी करण्याचे रेट कॉन्ट्रॅक्ट मे.ॲव्हेनटीस या कंपनीला देण्यात आलेले होते. या कंपनीकडे मागणी केली होती. परंतु एवढया मोठया प्रमाणात औषधांचा पुरवठा करणे या कंपनीला शक्य नाही असे त्यांनी सांगितले. केंद्र शासनाची पॅशन इंस्टिटयूट या नावाची एक शासकीय संस्था आहे. श्वानदंशावरील लस पुरविण्याकरिता या संस्थेकडे मागणी करण्यात आली होती. त्यानंतर या कंपनीतील डायरेक्टर व विभागाचे सचिव यांनी चर्चा केली. या कंपनीने 100 टक्के रक्कम ॲडव्हान्स मागितली व यामध्ये वेटींग पिरीयड होता तसेच या कंपनीची केवळ 7 लाखचीच कॅपेसिटी आहे असे त्यांनी सांगितले होते. त्यामुळे शासनाने इतर कंपन्यांकडून टेंडर्स मागविण्याकरिता वृत्तपत्रामध्ये जाहीरात दिली. त्या नुसार दोन कंपन्यांनी अर्ज केला होता. ओपन टेंडर्स मागविण्यात आले होते. या कंपन्यानी वेगवेगळे दर दिलेले होते. आता डीएमइआर या कंपनीशी करार झाला असून 230 रु. प्रति व्हायल हा या कंपनीचा दर आहे. हा दर पूर्वी ठरविला नसून आता ठरविलेला आहे. त्यामुळे डीएमईआर च्या रेट कॉन्ट्रॅक्ट प्रमाणे आपणास माहिती देण्यात आली होती.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय,येथे जो प्रश्न विचारण्यात आलेला आहे, त्याचा अनुभव आम्हाला आमच्या जिल्हयामध्ये येतच आहे. जिल्हा रुग्णालयामध्ये रेबिजचा स्टॉक कधीच नसतो. आमच्या जिल्हयामध्ये घाटी वैद्यकीय रुग्णालय आहे. एकूण 1200 इंजेक्शन्सपैकी 800

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी . . .

इंजेक्शन्स या ग्रामीण भागातील रुग्णालयाला पुरवावे लागतात. मराठवाडयातील सर्व जिल्हयांमध्ये रॅबिज इंजेक्शन्सचा स्टॉक नाही असे उत्तर दिले जाते. हे इंजेक्शन काही कालावधीनंतर पुन्हा पुन्हा रुग्णाला द्यावे लागते त्यामुळे ग्रामीण रुग्णालयातील सिव्हील सर्जनकडे याचा स्टॉक असणे आवश्यक आहे. औरंगाबाद येथे रेबिज या रोगामुळे एक व्यक्ती मरण पावली आहे. म्हणून मी आपणास सांगू इच्छितो की, हा अत्यंत महत्वाचा असा विषय आहे. रेबीज वरील इंजेक्शन्सची करोडो रुपयांची खरेदी झालेली आहे. परंतु तरी देखील अद्यापी ग्रामीण भागातील जनतेला यावरील औषधे उपलब्ध होत नाहीत. एखाद्या व्यक्तीला रेबीज हा रोग झाल्यास ती व्यक्ती कुत्र्याप्रमाणे भुकू लागते व कधी कधी डॉक्टर्सला त्या रुग्णाच्या धरी जाऊन इंजेक्शन द्यावे लागते. तसेच हा रोग बळावल्यास ती व्यक्ती इतरांना चावल्यामुळे त्यांनाही हा रोग होण्याची शकयता निर्माण होते. म्हणून मी या ठिकाणी विचारु इच्छितो की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी शासनाकडून करण्यात येणार आहे काय तसेच या संदर्भात कोणती कायम स्वरुपी यंत्रणा करण्यात येणार आहे ?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, यामध्ये आम्ही ॲन्टी रेबीजचा स्टॉक आहे की नाही याबाबत ऑन लाईन सिस्टीम लावू शकत नाही. कारण शेवटी ते औषध आहे. याबाबत पी.आय.एल. झाली होती तसेच विधानसभा सभागृहात माननीय अध्यक्षांनी आदेश दिले होते. त्यानंतर ताबडतोब खरेदी झाली. दरवर्षी याबाबतीत कायम स्वरुपी तरतूद करणार आहोत. दरवर्षी सरासरी डॉग बाईटच्या किती औषधाची गरज आहे हे आपल्याला माहीत आहे त्यामुळे दरवर्षी खरेदी होणार आहे तसेच स्टॉकची कमतरता राहणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

श्री. श्रीकांत जोशी : यासंदर्भात चौकशी करण्याबाबत मी विचारले होते त्याबाबत सांगावे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना पाहिजे असल्यास कोणत्या हॉस्पिटलमध्ये किती औषध होते आणि किती वापरले तसेच स्टॉकमध्ये किती औषध आहे, संचालकांच्या पातळीवर किती औषध घेतले तसेच लोकल सेक्टरमध्ये जिल्हा परिषदेच्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किती औषध घेतले याची माहिती माझ्याकडे आहे. ती माहिती मी पटलावर ठेवतो.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, सदस्य म्हणून मी जी माहिती सांगत आहे ती खरी समजून माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले पाहिजे. घाटी रुग्णालयाचे डीन, महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याबरोबर झालेल्या बैठकीचे इतिवृत्त माझ्याकडे आहे. औरंगाबाद जिल्हा सिव्हिल हॉस्पिटल तसेच ग्रामीण रुग्णालयामध्ये जो स्टॉक दिला त्यातील एकही लस शिल्लक नव्हती. त्यांच्याकडे डॉग बाईट लसींचा 2500 एवढा स्टॉक असावयास पाहिजे परंतु फक्त 800 चा स्टॉक होता. याची आपण चौकशी करावी. आपण एवढी खरेदी केली त्याचे वाटप सर्व जिल्ह्यांना केले का याची चौकशी करावी. कारण डॉग बाईटचे मोठे संकट आलेले आहे. श्रीमती मनेका गांधी यांच्यामुळे कुत्र्यांना मारता येत नाही त्यामुळे कुत्रे चावत सुटले आहेत. त्यामुळे हा जो प्रश्न निर्माण झालेला आहे तो कसा निस्तरणार ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : घाटी हॉस्पिटल हे मेडिकल एज्युकेशन विभागाकडे येते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्र्यांनी परवा सांगितले की, ही सामूहिक जबाबदारी आहे. त्याचे आपण पालन करावे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ग्रामीण रुग्णालय असो, सिव्हिल हॉस्पिटल असो किंवा जिल्हा रुग्णालय असो त्या ठिकाणी पी.एल. अकाऊंट असतो तसेच एनआरएचएम मध्ये प्रत्येक ग्रामीण रुग्णालयामध्ये 5 लाख रुपयांपर्यंत तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये 1 लाख रुपयांपर्यंत अनटाईड फंड ठेवलेला असतो. त्यांना सूचना दिलेल्या आहेत. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कोणत्याही वेळी 10 ॲन्टी रेबीज लस असणे बंधनकारक केलेले आहे. समजा त्यांनी 5 लसी वापरलेल्या असतील तर ताबडतोब आणखी 5 लसी घेऊन स्टॉक मेन्टेन करावा अशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच ग्रामीण रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालयामध्ये सुध्दा कायमस्वरुपी कमीत कमी स्टॉक ठेवणे बंधनकानक आहे. डॉग बाईटच्या लसीचा स्टॉक कमी झाला तर एनआरएचएममध्ये पी.एल.फंडातून, अनटाईड फंडातून ताबडतोब खरेदी करुन स्टॉक मेन्टेन करणे बंधनकारक राहणार आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, दर आठवड्याला किंवा दर पंधरा दिवसाला हा स्टॉक तपासून त्या ठिकाणी जी कमतरता असेल त्याबाबत पूर्तता करण्याविषयी यंत्रणा उभी करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आताच सांगितले. आरोग्य विभागाने असा निर्णय घेतला आहे की, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किमान 10 लसींचा स्टॉक असला पाहिजे. सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्य मॉनिटरींग सिस्टिमबाबत आग्रह करीत आहेत. मॉनिटरींग सिस्टिमबाबत सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करुन त्या सिस्टिमबाबत अंमलबजावणी करण्यात येईल.

-----

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : माननीय मंत्रिमहोदयांनी विनंती केल्यामुळे निवेदन क्रमांक 5 ऐवजी निवेदन क्रमांक 11 आधी घेण्यात येईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : समाजकल्याण विभागाप्रमाणे आदिवासी विभागांतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांना प्रती विद्यार्थी 600 रुपये प्रमाणे परिरक्षण अनुदान न मिळणे

**मु. शी.** : समाजकल्याण विभागाप्रमाणे आदिवासी विभागांतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांना प्रती विद्यार्थी 600 रुपये प्रमाणे परिरक्षण अनुदान न मिळणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. विजयकुमार गावित ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, यांनी "समाजकल्याण विभागाप्रमाणे आदिवासी विभागांतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांना प्रती विद्यार्थी 600 रुपये प्रमाणे परिरक्षण अनुदान न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये थोडी सुधारणा करु इच्छितो. निवेदनाच्या पृष्ठ क्रमांक दोन वरील पहिल्या परिच्छेदाच्या शेवटी "त्याप्रमाणे आदिवासी विकास विभाग आदेश निर्गमित करीत आहे." या वाक्याऐवजी "त्याप्रमाणे आदिवासी विकास विभागाने दिनांक 2.4.2008 पासून आदेश निर्गमित केले आहेत." असे वाचावे.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. खंदारे ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी हा निर्णय घेतला त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देईन. परंतु समाजकल्याण विभाग आणि आदिवासी कल्याण विभाग या दोन्ही विभागांच्या तारखांमध्ये तफावत आहे. समाजकल्याण विभागाने घेतलेल्या निर्णयाच्या तारखेपासून आदिवासी कल्याण विभागाच्या आश्रमशाळांना पूर्वलक्षीप्रभावाने लागू करण्यात येईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : आदिवासी विभागाने वित्त विभागाला तसे पहिलेच लिहिले होते. यासाठी कमिटी नेमली होती. त्या कमिटीने दिनांक 1.4.2007 पासून देण्याची शिफारस केलेली आहे. परंतु वित्त विभागाने ते मान्य न करता दिनांक 1.4.2008 पासून देण्याचे मान्य केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी म्हटल्याप्रमाणे दोन्ही विभागांच्या तारखांमध्ये तफावत राहणार नाही. यासाठीच नियोजन विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली 3 सदस्यांची कमिटी नेमली होती. समाजकल्याण विभागामार्फत, विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागामार्फत महिला व बालकल्याण विभागामार्फत चालविणारे रेसिडेन्स स्कूल आहेत, त्यांच्यामध्ये सुसूत्रता असावी म्हणून एक कमिटी नेमली होती. त्या कमिटीमार्फत सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. तरी वित्त विभागाकडे जाऊन गॅपला परवानगी देण्याची विनंती करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : वित्त विभागाकडे आपण विनंती करणार आहात. परंतु आदिवासी विभागाला एक न्याय, समाजकल्याण विभागाला दुसरा न्याय असा भेदभाव असता कामा नये. दोन्ही विभागाच्या आश्रमशाळा सारख्याच आहेत. त्यामुळे त्यांच्यात भेदभाव राहता कामा नये. माननीय मंत्रिमहोदयांनी स्वेच्छाधिकार वापरल्यामुळे तो निर्णय लागू झाला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. दोन विभागाच्या आश्रमशाळांमध्ये भेदभाव केल्यामुळे अन्याय होतो. म्हणून समाजकल्याण विभागाने ज्या तारखेला निर्णय घेतला आहे त्या तारखेपासून आदिवासी विभागाच्या आश्रमशाळांना निर्णय लागू करण्याची विनंती वित्त विभागाला करण्यात येईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभागृहाची भावना लक्षात घेऊन तशी वित्त विभागाला विनंती करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : या आश्रमशाळा आदिवासी विभाग आणि समाजकल्याण विभागाच्या आहेत. शासकीय आश्रमशाळांमध्ये राहणा-या विद्यार्थ्यांना दिले जाणारे परिरक्षणाचे अनुदान आणि खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना दिले जाणारे परिरक्षणाचे अनुदान यामध्ये तफावत आहे काय, असल्यास, ती तफावत दूर केली जाईल काय ?

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, त्याठिकाणच्या परिस्थितीनुसार काही आश्रमशाळांच्या परिरक्षणाच्या अनुदानात निश्चितच तफावत आहे. परंतु ज्यावेळी स्वयंसेवी संस्थांना, अनुदानित आश्रमशाळा सुरु करण्याची परवनानगी दिली जाते त्यावेळी साधारणपणे अशी अपेक्षा असते की, स्वयंसेवी संस्था सेवाभावीवृत्तीने काम करीत असल्याने त्या संस्था काही फंड उभा करतील आणि बाकीचा फंड शासन देईल. त्यामुळे त्यात तफावत असणे स्वाभाविक आहे. ही तफावत हळूहळू कशी कमी करता येईल यादृष्टीने शासन जरुर प्रयत्न करील.

-------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

**पृ. शी.** : कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याच्या आश्वासनाची पूर्तता न होणे

**मु. शी.** : कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याच्या आश्वासनाची पूर्तता न होणे याबाबत श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.जी.एल.अैनापुरे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.जी.एल.अैनापुरे यांनी "कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याच्या आश्वासनाची पूर्तता न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री.अरविंद सावंत )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजाचा एक कोर्स असतो. नियम 93 चे निवेदन कसे असावे असा एक विषय असतो. मला वाटते की, नियम 93 चे निवेदन कसे असू नये असा देखील एक विषय ठेवावा आणि त्यामध्ये आज वितरित केलेले निवेदन संदर्भासाठी ठेवावे. सभापती महोदय, नियम 93 ची सूचना देताना आम्ही 5 मुद्दे समाविष्ट केले होते, त्यापैकी एकाही मुद्याला मंत्रिमहोदयांनी या निवेदनात उत्तर दिलेले नाही. सूचनेत असा एक मुद्दा होता की, '3 महिन्याच्या आत याबाबतचा निर्णय घेतला जाईल' असे दिनांक 26 नोव्हेंबर, 2007 रोजी माननीय शिक्षण मंत्र्यांनी सभागृहात सांगून सुध्दा याबाबत शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही, या मुद्याबाबत निवेदनात एकाही शब्दाने उत्तर दिलेले नाही. पुढे सूचनेत असे म्हटले होते की, हायकोर्टाने आदेश दिलेले आहेत. या आदेशात असे म्हटले आहे की,.....

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख.....

" Permission on permanent No Grant Basis should be treated for all practical purposes as permission on No Grant Basis."...एका शब्दाचे उत्तर नाही. हायकोर्टामध्ये तुम्ही ॲफिडेव्हीट केले हा तिसरा मुद्दा आहे. या लोकांना आम्ही टप्प्याटप्प्याने देणार आहोत असे सरकारने ॲफिडेव्हिट केले आहे. त्यासंबंधी एका शब्दानेही उत्तर दिलेले नाही. 17 मार्च 2008 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन आमरण उपोषणाचा निर्णय घेतलेला आहे, हा चौथा मुद्दा आहे. त्याही मुद्याच्या बाबतीत एका शब्दाचेही उत्तर नाही. 1.4.2008 पासून शिक्षण संचालकांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केलेले आहे. सभापती महोदय, या सभागृहामध्ये येऊन आम्ही काय करायचे ? शासन त्यांच्या प्रश्नाकडे लक्ष देत नाही. मग शासनाने असे तरी म्हणावे की, ते सुरु झाले पण अजून आमचे काही झाले नाही. ..

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, अशा प्रकारे उत्तर देणे हे सभागृहाची सॅंक्टीटी गमावण्यासारखे आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या 93च्या सूचनेमधील एकही प्रश्नाचे निवेदनामध्ये उत्तर दिलेले नाही. मुद्याला धरुन माननीय मंत्री महोदय भाषण देतात हे ऐकले होते. पण सरकारी अधिकारी हे विषयाला धरुन काहीच उत्तर लिहीत नाहीत. अशा प्रकारे सभागृहाची दिशाभूल करणे योग्य नाही. तेव्हा या 93च्या निवेदनावर कोणतीही चर्चा न करता ते राखून ठेवावे आणि निवेदन दुरुस्त करुन ते पुन्हा वितरित करावे, अशी माझी आपणास विनंती आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी केलेल्या सूचनेस माझा पाठिंबा आहे. माझी देखील अशी विनंती आहे की, हे निवेदन राखून ठेवावे.

**तालिका सभापती** : याबाबतीत माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे काय आहे ते ऐकून घ्यावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : एकाही मुद्याचे उत्तर निवेदनामध्ये नाही. लेखी निवेदन केलेले आहे. ते दुरुस्त करुन पुन्हा लेखी निवेदन करायला पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : हा संपूर्ण विषय कायम विनाअनुदान...(अडथळा)... या शाळांना अनुदान देणे ही धोरणात्मक बाब आहे. त्यानुषंगाने मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करीत आहोत...(अडथळा)... सन्माननीय सदस्यांनी माझे म्हणणे ऐकून घ्यावे. हा प्रश्न राखून ठेवण्यामध्ये स्वारस्य आहे की, लोकांचे प्रश्न सोडविण्यामध्ये स्वारस्य आहे ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : हे निवेदन राखून ठेवून उद्या दुरुस्तीसह निवेदन वितरित करावे.

श्री. हसन मुश्रीफ : राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती म्हणून ....(अडथळा)...त्यानंतर थोडीशी डेव्हलपमेंट झालेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : लेटेस्ट डेव्हलपमेंट कोणती झालेली आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : एवढी प्रतिष्ठा आहे तर हे निवेदन उद्या ठेवा....

श्री. नितीन गडकरी : एकाही मुद्याला उत्तर दिलेले नाही. माननीय मंत्री महोदय, म्हणतात की, एवढी प्रतिष्ठा आहे तर निवेदन उद्या ठेवा, म्हणजे माननीय मंत्री महोदय हे उपकार करीत आहेत. त्यांनी त्यांच्या विभागाला नीट उत्तर देण्यास सांगावे.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आज ही सूचना मी राखून ठेवतो. या सूचनेवरील निवेदन उद्या पुन्हा वितरित करावे.

---

....3...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांचा अनुशेष दूर करण्यासंबंधीचा आराखडा तयार न करणे

**मु. शी.** : अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांचा अनुशेष दूर करण्यासंबंधीचा आराखडा तयार न करणे याबाबत प्रा. बी.टी.देशमुख सर्वश्री.व्ही.यू. डायगव्हाणे व वसंतराव खोटरे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.डॉ सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी देशमुख, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे व वसंतराव खोटरे यांनी "अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांचा अनुशेष दूर करण्यासंबंधीचा आराखडा तयार न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा मागास भागाचा प्रश्न असल्यामुळे एखाद दुस-या प्रश्नाच्या बाबतीत आम्हाला आपण न्याय द्यावा. थोडासा दोन मिनिटांचा वेळ आम्हाला वाढवून द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे. ...

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री. शिगम 14:50

प्रा.बी.टी.देशमुख...

या पाच जिल्हयामध्ये सिंचनाचा सर्वात जास्त अनुशेष आहे, पण पाटबंधारे प्रकल्पाचे अन्वेषण मंडळ देण्यात येईल असे अनेक दिवसापासून या ठिकाणी सांगण्यात येत आहे. परंतु ते मंडळ अद्याप देण्यात आलेले नाही. पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण मंडळ या ठिकाणच्या पाच जिल्हयाचा सर्व्हे करण्यासाठी ताबडतोबीने देण्यात येईल काय ?

डॉ. सुनील देशमुख : एक महिन्याच्या आत देण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : या ठिकाणी 13 प्रकल्प आहेत. या सर्व 13 प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे असा माझा समज झाला होता. पण त्यातील एका प्रकल्पाला अजूनपर्यंत प्रशासकीय मान्यता दिली गेलेली नाही. त्याचे कारण मला माहिती आहे की, सदर प्रकल्पाचे काम प्रशासकीय मान्यतेच्या स्तरावर आल्यानंतर त्या प्रकल्पाच्या ठिकाणाहून मोठी हायटेंशन लाईन जाते म्हणून थोडासा त्यास विलंब झाला आहे. पण पेढी बॅरेज या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे असे निवेदनात म्हटले आहे. परंतु त्या निवेदनात प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात वेळ किंवा टाईम लिमिट देण्यात आलेला नाही. प्रशासकीय मान्यता दिलेल्यापैकी हा एक प्रकल्प राहिलेला आहे. या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याकामी विलंब होण्याची कारणे काय आहेत ? या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली जाईल अशी शासनाने या ठिकाणी माहिती दिली होती. त्या ठिकाणी हायटेन्शन लाईन आली ही गोष्ट मी मान्य करतो. ती दूर करण्यासाठी रिऑर्गनाईज झाले ही गोष्ट देखील मी मान्य करतो. राहिलेल्या एका प्रकल्पाला येत्या आठ ते पंधरा दिवसामध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात येईल काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, पेढी बॅरेज आहे, त्या ठिकाणी उपसा सिंचन योजना आहे. उप सिंचन योजना असेल तर माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांची मान्यता घ्यावी लागते. माननीय उप मुख्यमंत्र्यांकडे दिनांक 7.3.08 रोजी नस्ती मान्यतेसाठी सादर केली गेली आहे. 15 दिवसांच्या आत माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची मान्यता घेऊन या प्रकल्पाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या 13 प्रकल्पांची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आले आहेत. त्या अहवालाची फक्त छाननी होत आहे. अन्वेषण मंडळ दिले असल्यामुळे तो प्रश्न मी पुन्हा विचारीत नाही. यासंदर्भात माझे असे म्हणणे आहे की, या प्रकल्पांचा सविस्तर

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

प्रकल्प अहवाल तयार झालेला आहे. या पाच जिल्हयांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. ज्या एका प्रकल्पास मान्यता दिली गेली नाही म्हणून त्या प्रकल्पास मान्यता देण्यासंबंधीचा प्रश्न मी विचारीत आहे. एखादा प्रकल्प प्रशासकीय मान्यता देण्याच्या लायकीचा नसेल, तर अशा प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्याचे नाकारले तर तो भाग वेगळा आहे. यासंबंधीचा निश्चित असा कार्यक्रम ठरविला पाहिजे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी नागपूर अधिवेशनामध्ये बैठक घेऊन, याबाबतची आदेश दिले, त्यामुळे हे काम पुष्कळ पुढे सरकले आहे हे मी मान्य करतो. 13 प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाले आहेत, त्या 13 प्रकल्पांच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेचे वेळापत्रक माननीय मंत्र्यांनी सभागृहात सांगावे. दुसरे असे की, ज्या 13 प्रकल्पाचे सविस्तर सर्वेक्षण करण्यासंबंधीचे वेळापत्रक माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगावे, असे माझे यासंदर्भातील दोन प्रश्न आहेत. सदरहू दोन्ही बाबीसंबंधीचे वेळापत्रक या ठिकाणी सांगितले जाईल काय ?

श्री. सुनील देशमुख : प्रशासकीय मान्यतेच्या प्रक्रियेमध्ये 13 प्रकल्प आहेत. त्या 13 पैकी 11 प्रकल्पांना सप्टेंबर, 2008 पूर्वी प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. यात काही सर्वेक्षणाधीन प्रकल्प आहेत. त्यासाठी सर्वेक्षण आणि अन्वेषण विभाग चालू करण्यात येणार आहे. त्यामध्ये राहिलेल्या सर्व प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सिंचनाचा अनुशेष अमरावती जिल्हयात सर्वात जास्त आहे. एकीकडे निधी द्यावयाचा आणि दुसरीकडे प्रकल्पांचे सर्वेक्षण करावयाचे नाही. पुन्हा या ठिकाणी सांगितले जाते की, विदर्भासाठी निधी दिला होता. परंतु तो निधी तुम्ही खर्च केला नाही. खरे म्हणजे शासनच याबाबतीत अडचणी निर्माण करीत असते. विदभातील मागासलेल्या विभागास न्याय देण्याची जबाबदारी ही कॅबिनेट मंत्र्यांची आहे. माननीय जलसंपदा मंत्र्यांनी या विभागातील सिंचन प्रकल्पांचा आढावा घेऊन तेथील सर्व गोष्टी क्लिअर करुन घेतल्या पाहिजेत. पश्चिम महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याच्या वेळी कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळाच्या मॅनेजिंग डायरेक्टर यांना पूर्णपणे अधिकार देऊन सगळे प्रकल्प मंजूर करुन घेतले होते. आमच्या काळात आपण दणादण सिंचन प्रकल्प आपण मंजुर करुन घेतले. मागासलेल्या विभागातील सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याची वेळ आली त्यावेळी प्रशासकीय मान्यतेचे अधिकार सरकारने

3...





श्री.नितीन गडकरी...

आपल्याकडे घेतले. सदरचे अधिकार सरकारने आपल्याकडे घेऊनही सिंचन प्रकल्पांच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली जात नाही. त्यामुळे मागासलेल्या भागातील सिंचनासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी या वर्षी खर्च होऊ शकणार नाही. हा निधी खर्च होणार नाही ही दुर्देवी गोष्ट आहे. तेथील निधी वेळेवर खर्च व्हावयास पाहिजे होता. माननीय जलसंपदा मंत्र्यांनी एक बैठक आयोजित करावी आणि या मागासलेल्या विभागातील सर्व सिंचन प्रकल्पाच्या बाबतीतील प्रश्नासंबंधी आढावा घेऊन ते प्रश्न येत्या तीन महिन्यात सुटतील असा प्रयत्न करावा. म्हणून या विभागातील सर्व सिंचन प्रकल्पांचे प्रश्न येत्या तीन महिन्यात क्लिअर करण्यात येतील काय ? या वर्षी सिंचन प्रकल्पांचा निधी शिल्लक राहणार आहे. तो निधी खर्च झाला पाहिजे असे आमचे मत आहे. माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे सिंचन प्रकल्पांच्या बाबतीत निधी उपलब्ध होतो आहे. तो निधी या वर्षी पूर्णपणे खर्च होणार नाही. त्यामुळ हा निधी खर्च करण्यासंबंधी शासनाचे काय धोरण राहणार आहे ? अमरावती विभागात सिंचन प्रकल्पांचा मोठा अनुशेष असल्यामुळे तेथे हा निधी प्राधान्याने खर्च झाला पाहिजे असे माझे मत आहे. परंतु हा निधी खर्च झाला नाही तर पुढे काय करणार आहात यासंबंधीचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ SBT/ 14:55

श्री. अजित पवार : सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, येत्या तीन महिन्यांमध्ये यासंदर्भात बैठक लावून अमरावती विभागातील हे सगळे प्रश्न मार्गी लावले जातील. जो निधी खर्च होणार नाही त्या निधीबाबत माननीय राज्यपालांच्या सूचननेनुसार तो पैसा खर्च करण्याच्या बाबतीत कारवाई केली जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याबाबतीत मी एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, प्रादेशिक असमतोलाचा हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. माननीय राज्यपालांच्या याबाबतीत स्पष्ट सूचना आहेत. अमरावती विभागातील 5 जिल्हयातील निधी हा वळता करण्यासारखी स्थिती करणे ही गोष्ट संपूर्ण राज्याला शोभनीय नाही. अमरावती विभागातील 5 जिल्हयात शासनाने 5 कोटी रुपये दिले परंतु पुढे काही झाले नाही. काही भागामध्ये सरासरीपेक्षा दुप्पट क्षमता निर्माण होत असताना या भागातील प्रकल्पांना मान्यता मिळत नाही ही गोष्ट शोभनीय नाही. या 5 जिल्हयातील प्रकल्पांना अगोदर प्रशासकीय मान्यता दिली पाहिजे आणि कामे तात्काळ सुरु केली पाहिजेत. यावर्षाचा पैसा खर्च होणार नाही अशी स्थिती आहे म्हणून या पाच जिल्हयांच्या बाहेरच्या भागाला तो देणे यात काही चूक आहे असे मला स्वत:ला वाटत नाही. परंतु पैसा खर्च होणारच नाही ही स्थिती राहणे हे मात्र अत्यंत अयोग्य आहे म्हणून या गोष्टीची शासनाने काळजी घ्यावी.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, याबाबतीत शासनातर्फे काळजी घेतली जाईल.

----

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर-बुटीबोरी हैद्राबाद महार्गाचे बांधकाम

**मु. शी.** : नागपूर-बुटीबोरी-हैद्राबाद महामार्गाचे बांधकाम याबाबत श्री . व्हि.यू.डायगव्हाणे,प्रा.बी.टी.देशमुख, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. छगन भुजबळ ( सार्वजनिक बांधकाम मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री व्हि.यू.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, वि.प.स. यांनी नागपूर-बुटीबोरी-हैद्राबाद महामार्गाचे बांधकाम या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री. अरविंद सावंत ) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

... ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-7 हा अतिशय महत्वाचा प्रकल्प आहे. नागपूर-बुटीबोरी-हैद्राबाद असा हा नागपूर शहराला जोडलेला प्रकल्प आहे. या रस्त्यावर फार मोठया प्रमाणावर रहदारी असते. नॅशनल हायवे असल्यामुळे व बुटीबोरी ही औद्योगिक वसाहत असल्यामुळे या रस्त्यावर रहदारी मोठया प्रमाणावर असते. वाहतूक सुरळित राहण्यासाठी पोलीस स्टेशन, ग्रामीण वाहतूक शाखा यांचे कर्मचारी ठेवण्यात आले आहेत. परंतु याठिकाणी 3 किंवा 4 पोलीसच असतात. प्रत्यक्षात 16 ते 17 पोलिसांची आवश्यकता आहे. जे पोलीस कर्मचारी असतात ते खुर्च्या टाकून चौकीत बसलेले असतात. त्यामुळे तास-दीड तास वाहतूक बंद होते. पोलिसांची संख्या वाढवून ती कायम स्वरुपी केली पाहिजे. तसेच ही व्यवस्था लेव्हल क्रॉसिंगजवळ आणि शेवटच्या टोकापर्यंत म्हणजे जवळजवळ एक ते दीड कि.मी.अंतरापर्यंत असली पाहिजे. कारण दुचाकी, पेशंट यांना त्रास होतो. 4.6.2005 रोजी या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. एकूण पावणेदोन कि.मी.लांबीचा हा रस्ता आहे आतापर्यंत 46 टक्के काम झाले आहे. 54 टक्के काम शिल्लक आहे. 30.9.08 पर्यंत 54 टक्के काम पूर्ण करु असे शासन सांगत आहे. परंतु खरोखरच 54 टक्के काम येत्या सहा महिन्यात पूर्ण होईल काय ? होणार असेल तर आनंदाची गोष्ट आहे. काम पूर्ण केल्याशिवाय किंवा पर्यायी व्यवस्था केल्याशिवाय या मार्गावरील अडथळे दूर होणार नाही.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ : महोदय, बुटीबोरी (नागपूर) जवळ असलेला राष्ट्रीय महामार्ग क्र. 7 हा केंद्रशासनाच्या अखत्यारित असून या मार्गावर बुटीबोरी येथे रेल्वे क्रॉसिंगवर चौपदरी उड्डाणपुलाचे काम चालू आहे. या कामाची सुरुवात दि. 4.6.2005 रोजी सुरुवात झाली आणि पूर्ण होण्याचा अपेक्षित दि.30.9.2008 हा असून आतापर्यंत या पुलाचे फक्त 46 टक्के एवढेच काम पूर्ण झाले आहे. या रेल्वे पुलाचे संकल्पचित्र रेल्वेकडून उशिरा मिळाल्यामुळे हे काम कमी झाले आहे. तरी सुध्दा माझ्याकडे प्राप्त झालेल्या माहितीनुसार आणि सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे या कामाला उशिर झालेला आहे. हे काम पूर्ण होण्याचा अपेक्षित दिनांक जरी सप्टेंबर 2008 असला तरी त्या कामाला अजून तीन-चार महिने लागणार आहेत. मला पोलिसांकडून जे उत्तर आले त्यात त्यांनी असे सांगितले की, या ठिकाणी एकूण 16 पोलीस तैनात आहेत. यासंदर्भात मी एक बैठक घेतली आणि त्यांना सांगितले की, येथे पोलिसांची संख्या कमी असल्याचे मला समजले, हे बरोबर नाही. या ठिकाणी 144 गाड्यांची आवक-जावक होते आणि 120 वेळा हे रेल्वे फाटक बंद केले जाते. अशा प्रकारे जवळपास 6 ते 7 तास हे फाटक बंद असते. यावर उपाययोजना अशी की, लवकरात लवकर हे काम पूर्ण करावे. या रस्त्याच्या ठिकाणी दोन पदरी बाह्य वळण रस्त्याच्या ठिकाणी फलक लावण्यात आलेले आहेत. तसेच मी आणखी सूचना दिल्या की, पोलिसांची संख्या येथे वाढवावी तसेच त्यांच्या मदतीला आणखी लोक देऊन त्यांची एक टीम तयार करुन तीन चार महिन्यामध्ये कुठलीही अडचण निर्माण होणार नाही आणि ज्यावेळी फाटक उघडेल त्यावेळी ती वाहतूक झटपट होईल व त्यात अडथळा येणार नाही, याची काळजी घ्यावी, अशा सूचना सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

<u>( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )</u>

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, खरे म्हणजे मी आठवड्यातून चार वेळा या रस्त्यावरुन जातो. आताच माहिती दिल्याप्रमाणे 16 पोलीस तेथे असतात पण मी फक्त दोनच पोलिसांचे चेहरे पाहिले आहेत. माझ्याकडे जी पोलिसांची गाडी असते त्यातून जात असतांना ट्राफिकमुळे गाडी थांबते त्यावेळेस आमच्याकडचा सिक्युरिटी त्या ट्राफिकमधून उतरुन पुढे जातो आणि काय झाले ते पाहतो व त्यानंतर रस्ता मोकळा करण्यात येतो. आताच हे काम सहा महिन्यात पूर्ण होईल असे सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात या कामाबाबत स्लॅब टाकावयाचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

आहे आणि फक्त पिल्लर उभे झालेले आहेत. म्हणून या कामाच्या संदर्भात एनएचएआयकडे तीव्र नापसंती व्यक्त करणारे एक पत्र लिहावे, तसेच पत्र रेल्वेला सुध्दा देण्यात यावे की, 10 वर्षे झाली तरी या कामाला प्रत्यक्षात सुरुवात देखील झालेली नाही. या कामाचे पहिल्यांदा टेंडर निघाले ते एकाला दिले, त्यानंतर हे टेंडर बदलून दुसऱ्या व्यक्तीला देण्यात आले, अशा प्रकारे गलथान कारभार चालला आहे आणि याला एनएचएआय ही ऑथॉरिटीच जबाबदार आहे. अशा आशयाचे नापसंतीचे पत्र पाठवावे तसेच यासंदर्भात तातडीने बैठक बोलावून निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे. त्यानुसार माननीय मंत्री महोदय बैठक लावणार काय ?

यानंतर श्री. सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, तसे पत्र पाठविण्यात येईल.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, या निवेदनावर मला प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल असे तालिका सभापतींनी मला सांगितले होते. म्हणून मी येथे एकच प्रश्न विचारणार आहे. सभापती महोदय, तेथे पोलीस वाढविण्याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले आहे, ते ठीक आहे.पण पोलीस वाढविण्याची ही व्यवस्था एका आठवड्यात आपण करणार काय ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, ताबडतोब ती व्यवस्था होईल असेच प्रयत्न माझ्या वतीने राहतील.

***

..... बीबी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईतील वरळी येथील मागासवर्गीयांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना जेवणात पाल पडल्याने झालेली विषबाधा.

**मु. शी.** : मुंबईतील वरळी येथील मागासवर्गीयांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना जेवणात पाल पडल्याने झालेली विषबाधा याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. चंद्रकांत हांडोरे (सामाजिक न्यायमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "मुंबईतील वरळी येथील मागासवर्गीयांसाठी असलेल्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना जेवणात पाल पडल्याने झालेली विषबाधा " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... बीबी 3 .. ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खाली सामाजिक न्याय मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी आम्ही विचारल्या प्रश्नापेक्षा विचित्र असे उत्तर या निवेदनातून दिलेले आहे. आम्ही दिलेल्या नियम 93 च्या सूचनामध्ये 3 मुलांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते हे खरे आहे काय असे विचारले होते त्यावर विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची विषबाधा झाली नसल्याचे सांगितले आहे. परंतु प्रत्यक्षात तीन विद्यार्थ्यांना विषबाधेमुळे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले होते. सभापती महोदय, मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, पाल पडल्याने विषबाधा झालेले अन्न होते ते पोलीस तेथे चौकशीसाठी आले असता तेथील पर्यवेक्षकाने लपवून ठेवले होते आणि मॅडमनी मला तसे करण्यास सांगितले होते असे त्या पर्यवेक्षकाने नंतर कबूल केले होते. या निवेदनात आपण शेवटी सांगत आहात की, ज्या विद्यार्थ्याच्या ताटामध्ये पाल सापडली आणि त्याचा जेव्हा जबाब घेतला व त्याबाबत एफआयआर दाखल करून पोलीस तपासानंतर संबंधित जबाबदार व्यक्तींस अटक करण्यात येईल. आणि वरच्या परिच्छेदामध्ये आपण सांगत आहात की, सदर विषबाधेबाबत संबंधित आरोग्य खात्याचे अधिकारी यांनी वसतिगृहातील पाल सापडलेले ताट पाहण्यास मागितले असता, विद्यार्थ्याने ते फेकून दिल्याचे सांगण्यात आले. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या वसतिगृहाच्या व्यवस्थापिका श्रीमती सरला ओहोळ म्हणून आहेत, हे वसतिगृह दलित आणि गरीब विद्यार्थ्यांसाठी असताना त्या ठिकाणी नेहमीच विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते म्हणून त्या व्यवस्थापिकांना तेथून त्वरित बदली करून वा रजेवर पाठवून या विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे अन्न दिले जाते आहे किंवा नाही याची पाहणी आपण करणार का ?

श्री. चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे त्याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, तेथील विद्यार्थ्यांना सर्वच प्रकारचा आहार चांगल्या दर्जाचा आणि व्यवस्थित मिळाला पाहिजे याची काळजी शासनाकडून घेण्यात येते. पण काही काही वेळेस ठेकेदाराच्या चुका होतात, काही वेळेस तेथील अधीक्षकांच्याही चुका होतात. म्हणून याबाबतीत आम्ही त्या दृष्टीने निश्चितपणे चौकशी करू. पण तेथील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचा आहार मिळाला पाहिजे हे निश्चितपणे पाहिले जाईल. तसेच या ज्या अधीक्षिका आहेत त्यांची बदली आम्ही पुणे येथे अगोदरच केली आहे.

***

..... बीबी 4 ...

**पृ. शी.** : अकोला महानगरपालिकेने शहरात 17 वाणिज्य संकुलांची बीओटी तत्त्वावर निर्मिती केल्याबाबत.

**मु. शी.** : अकोला महानगरपालिकेने शहरात 17 वाणिज्य संकुलांची बीओटी तत्त्वावर निर्मिती केल्याबाबत याबाबत सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, किशनचंद तनवाणी, डॉ.दीपक सावंत यांनी "अकोला महानगरपालिकेने शहरात 17 वाणिज्य संकुलांची बीओटी तत्त्वावर निर्मिती केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

.... बीबी 5 ...... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खाली मा.नगरविकास राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, अकोला महानगरपालिकेने केलेल्या 17 वाणिज्य संकुल निर्मितीबाबत हे निवेदन आलेले आहे. यामध्ये म्हटले आहे की, अकोला महापालिकेची आर्थिक स्थिती बरोबर नसल्याने उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर जागांचा विकास करण्याची कार्यवाही बरोबरच मनपाचे आर्थिक उत्पन्न जनहितास्तव वाढविण्याकरिता अकोला महापालिकेने प्रयत्न सुरू केले आहेत. सभापती महोदय, ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु या 17 वाणिज्य संकुलांना कलेक्टरनी आणि विभागीय आयुक्तांनी स्थगनादेश का दिला ? कारण महापालिकेच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी योग्य प्रकारे करारनामे केले नव्हते. तेव्हा कलेक्टर तसेच विभागीय आयुक्तांच्या स्थगनादेशाला अनर्हता प्रमाणपत्र घेऊन परवानगी आपण देणार आहात काय ? दुसरे असे की, ही जी 17 संकुले आहेत त्या सर्व जागा शासनाच्या आहेत, कोठे शाळेची जागा आहे तर कोठे हॉस्पिटलची जागा आहे. तेव्हा या कामांसाठी सर्व संबंधितांची परवानगी असणेही आवश्यक आहे त्यानुसार नगररचनाकार यांची परवानगी घेणे आवश्यक होती पण तशी ती घेतलेली नाही. तेव्हा या सर्व परवानग्या घेऊन काम केले जाणार आहे का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अकोला शहरामध्ये 17 व्यापारी संकुलांसाठी बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर महापालिकेने परवानगी दिली होती. त्याबाबत शासनाचे चौकशी करण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांना दिल्या आहेत. प्रत्येक बीओटीचे काम विभागीय आयुक्तांनी तपासून, ते काम योग्य निकषात बसत असेल आणि त्यातून महापालिकेचा जास्तीत जास्त फायदा होईल या दृष्टीने त्याबाबतचे करार झालेले आहेत की नाही हे पाहण्याचे काम विभागीय आयुक्तांकडून करण्यात येईल. ...

( यानंतर श्री. गायकवाड .... सीसी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे...

या संदर्भात विभागीय आयुक्तांच्या वतीने तपासणी करण्यात येईल. त्याचबरोबर बी.ओ.टी.तत्वावर काम करीत असतांना टाऊन प्लॅनिगचे नियम चुकीचे ठरत असतील तर ते सुध्दा विभागीय आयुक्त तपासून पाहतील. नगर रचनेचे सर्व नियम ते तपासून पाहतील. त्याचबरोबर महानगरपालिकांना आणि नगरपालिकांना जास्तीत जास्त फायदा होतो किंवा नाही हे देखील तपासून पाहण्यात येईल.आपण 17 प्रकल्प बी.ओ.टी.तत्वावर सुरु केलेले आहेत किंवा त्यासंबंधीचा ठराव करण्यात आलेला आहे. महानगरपालिकेच्या आयुक्तांनी विभागीय आयुक्तांना सर्व कागदपत्र देण्याच्या सूचना शासनाच्या वतीने देण्यात आल्या आहेत. मी आता सांगितलेल्या सर्व बाबी तपासून पाहिल्यानंतर या कामांना मंजुरी दिली जाईल. सभापती महोदय, या निमित्ताने मी सभागृहाला एक महत्वाची माहिती देऊ इच्छितो. महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या वतीने बी.ओ.टी.तत्वावर कामे हाती घेंतली जात असतांना ही कामे कशा पध्दतीने राबवली पाहिजेत या दृष्टीने शासनाच्या गाईड लाईन्स नसल्यामुळे एक महिन्याच्या आत शासनाच्या वतीने गाईड लाईन्स करुन महानगरपालिका आणि नगरपालिकांना त्याची प्रत वितरित करण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नागपूर येथील इंडोरामा कामगार गृह निर्माण संस्थेला सुरुवातीच्या देकारपत्रातील दराने जागा देणे
मु.शी : नागपूर येथील इंडोरामा कामगार गृहनिर्माण संस्थेला सुरुवातीच्या देकारपत्रातील दराने जागा देण्याबाबत सर्वश्री नितीन गडकरी,विनोद ताावडे, मधुकर चव्हाण, केशवराव मानकर,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना

श्री.अशोक चव्हाण ( उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे,मधुकर चव्हाण, केशवराव मानकर यांनी " नागपूर येथील इंडोरामा कामगार गृह निर्माण संस्थेला सुरुवातीच्या देकारपत्रातील दराने जागा देणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदना नंतर -

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,. हे कामगार गरीब आहेत आणि कामगारांच्या पगारानुसार बॅन्का कर्ज देण्यास तयार नाहीत. त्यांना लहान लहान प्लॉट देण्यात आले आहेत. हे प्लॉटस देत असतांना पी.यु.ची जागा तुम्हीच भरा असे सांगण्यात आलेले आहे. ही सोसायटी नसून इंडिव्हिज्युअल प्लॉटस देण्यात आलेले आहे. पी.यु.चे प्लॉटस काढावयास लावले असून त्याची जबाबदारी एम.आय.डी.सी. घेण्यास तयार नाही. पी.यु.चे पैसे या गरीब कामगारांनी भरले आहेत. त्यावेळी असे कबूल करण्यात आले होते की, सध्या तुम्ही पी.यु.चे पैसे भरावे आणि दुस-या लॉटच्या वेळी पी.यु.ची लॅन्ड बदलून देण्यात येईल. अशा प्रकारचा मार्ग माननीय मंत्री महोदयांनी काढला होता. आता कामगारांना जागा देण्याच्या वेळी असे सांगण्यात येते आहे की , जमिनीचा दर बदलला आहे. त्यामुळे जुन्या दराप्रमाणे जमीन देता येणार नाही. माननीय मंत्री महोदयांनी घेतलेल्या निर्णयानुसार एम.आय.डी.सी. ऐकत नाही अशी परिस्थिती आहे. तेव्हा या कंपनीमध्ये काम करणारे कामगार गरीब आहेत तेव्हा त्यांचा विचार करुन माननीय मंत्री महोदय सहानुभूतीने निर्णय घेणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या कामगारांना जो प्लॉट दिला आहे त्या ठिकाणी रस्ते नाहीत पिण्याच्या पाण्याची सोय नाही, ड्रेनेजची सोय नाही. काही ठिकाणी एम.आय.डी.सी.मध्ये अनधिकृत ले आऊटस तयार होत आहे, तेथे अनधिकृत वस्त्या आणि झोपडपट्टी निर्माण होत आहेत. परंतु या गृहनिर्माण सस्थेतील लोक चांगल्या प्रकारे काम करीत असतांना त्यांना कोणत्याही प्रकारची सुविधा दिल्या जात नाहीत. कर्मशिअल मिटर लावून त्यांना पाणी देण्यात येते तेव्हा हे कामगारांच्या हिताचे धोरण आहे काय ?.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, नागपूर जिल्हयातील बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात इंडोरामा कामगार गृहनिर्माण संस्थेबाबत सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी पुढाकार घेतला होता आणि त्यांनी भूखंड मागितल्यामुळे या कांमगार गृहनिर्माण संस्थेला भूखंड देण्याचा निर्णय एम.आय.डी.सी.ने घेतला होता. सुरुवातीला 65 हजार चौरस मिटर्स एवढा भूखंड या संस्थेला मंजूर करण्यात आला होता परंतु कामगारांकडे तेवढे पैसे नसल्यामुळे 16 हजार 700 चौरस मिटर्स भूखंडाचा ताबा 9 सप्टेंबर 2005 साली देण्यात आला होता. त्यावेळी जमिनीचा दर 150 रुपये प्रती चौरस मिटर एवढा होता. या जमिनीचे पैसे लवकरात लवकर भरुन भूखंडाचा ताब्यात घ्यावा अशी त्यांच्याकडून अपेक्षा होती परंतु त्यांनी पैसे भरण्यास जर पाच सहा वर्षाचा



श्री.अशोक चव्हाण ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कालावधी लावला तर जमिनीचे दर कायम राहणार नाहीत. पाच सहा वर्षे किंवा दहा वर्षापर्यन्त जमिनीचे दर कायम राहू शकत नाही म्हणून या संस्थेने तातडीने पैसे भरुन जमिनीचा ताबा घेतला असता तर दर वाढीचा प्रश्न निर्माण झाला नसता. तरीसुध्दा पैसे भरण्यासाठी त्यांना हप्ते पाडून जसजसे त्यांच्याकडे पैसे जमा होतीत तसतसे संस्थेकडून पैसे जमा करुन घेण्यात आले आहेत. ज्यावेळी त्यांना हा भूखंड देण्यात आला होता तेव्हा 16 हजार 700 चौरस मिटरसाठी जमिनीचा दर 150 रुपये प्रती चौरस मिटर एवढा होता. आज जमिनीची किंमत 450 रुपये प्रती चौरस मिटर एवढी आहे. त्या जागेसाठी 220 रुपये चौरस मिटर दर न आकारता 150 रुपये प्रती चौरस मिटर एवढा दर आकारण्यात यावा असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्या बाबतीत मी त्यांना असे सांगू इच्छितो की, आज 450 रुपये प्रती चौरस मिटर एवढा जमिनीचा दर आहे. मला सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना असे सांगावयाचे आहे की गरीब कामगारांची ही गृह निर्माण संस्था आहे त्या संस्थेला मदत करण्याचा एम.आय.डी.सी.च्या माध्यमातून माझी तयारी आहे हे मला प्रथम स्पष्ट केले पाहिजे. परंतु या संदर्भात या संस्थेने तातडीने पैसे भरण्याची भूमिका घेतली पाहिजे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण....

याचे कारण कोणत्याही जमिनीची किंमत ही कॉंस्टंट राहत नाही. जमिनीचे दर हे रोज वाढत असतात. बुटीबुरी येथील एम.आय.डी.सी. च्या वसाहतीमध्ये विकासाची कामे सुरु आहेत. म्हणून माझ ी माननीय सदस्यांना विनंती आहे की, या प्रकरणामध्ये कामगारांचे हित लक्षात घेऊन आजचा जो 450 रुपये दर आहे, त्याऐवजी तो 220 रुपये लावण्याबाबत बोर्डाला निर्णय घ्यावा लागेल. याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर कामगारांना तातडीने पैसे भरावे लागतील. दुसरी गोष्ट अशी की, एम.आय.डी.सी.मधील रस्ते, गटारे एम.आय.डी.सी. विकसित करते. परंतु संस्थेच्या ले-आऊटमधील अंतर्गत रस्ते...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा मुख्य मुद्दा असा आहे की, या कर्मचाऱ्यांचा पगार कमी असल्यामुळे त्यावर बॅंका त्यांना कर्ज देऊ शकत नाहीत. त्यामुळे ते आपले घर बांधू शकत नाहीत...

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्यांचे यासाठी अभिनंदन केले पाहिजे की, कमी किंमतीमध्ये कामगारांना घर उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत . त्याकरिता याठिकाणी आपण जमिनीची किंमत कॉंस्टंट ठेवली आहे. सोसायटीच्या अंतर्गत रस्त्यांच्या बांधणीचे काम एम.आय.डी.सी. करु शकत नाही. सदरहू अंतर्गत रस्ते आमदारांच्या स्थानिक विकास निधीमधून बांधण्यास एम.आय.डी.सी. ना हरकत प्रमाणपत्र देण्यास तयार आहे. त्यामुळे आमदारांच्या स्थानिक विकास निधीमधून या कामाकरिता निधी उपलब्ध झाला तर हे काम करण्यास एम.आय.डी.सी. तयार आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी जमिनीच्या किंमतीचे दर कमी केल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.परंतु 450 रुपये या दरामध्ये सुध्दा चांगल्या क्वॉलिटीचे घर बांधून दिले आहे. आपण हा भूखंडाचा दर केल्यामुळे 40 लाखाचे नुकसान झाले आहे. आज सिमेंट आणि लोखंडाचे भाव तिप्पट झाले आहेत. ही एक आदर्श वसाहत झालेली आहे. कामगारांच्या प्रश्नाबाबत आपण खोलात जाऊन विचार करा. आज त्यांचा पगार कमी असल्यामुळे बॅंक कर्ज देण्यास तयार नाही. बांधकाम करीत असतांना एम.आय.डी.सी. ने पाण्याचा दर कमर्शिअल लावला तर कामगार त्या वसाहतीमध्ये राहील काय? आज आपण कोका कोला या कंपनीला किंवा बिस्लेरी कंपनीला जो दर आकारता तो कामगारांच्या सोसायटीला लावणार हे योग्य आहे काय?

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण : ही वस्तुस्थिती नाही. एक हजार लिटर पाण्याला साडे बारा रुपये इतका दर आहे. नॉर्मली हा कमर्शिअल दर नाही तर हा रेसिडेन्शिअल दर लावला आहे.

श्री. नितीन गडकरी : आणि जर यापूर्वी कमर्शिअल दर लावला असेल तर आपण तो रद्द करणार काय?

श्री. अशोक चव्हाण : यापूर्वी कमर्शियल दर लावला असेल तर तो रद्द करु.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**पृ.शी.**: अकोला एम.आय.डी.सी. फेज-2 मध्ये सुरु असलेले अवैध बांधकाम

**मु.शी.**: अकोला एम.आय.डी.सी. फेज-2 मध्ये सुरु असलेले अवैध बांधकाम याबाबत श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अशोक चव्हाण (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरीया यांनी "अकोला एम.आय.डी.सी. फेज-2 मध्ये सुरु असलेले अवैध बांधकाम" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. गोपीकिशन बाजोरीया : सभापती महोदय, अकोला एम.आय.डी.सी. ने सोडलेली जागा एका खाजगी जमीन मालकाला भाडेपट्टयाने दिली. त्यामुळे त्या रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या लोकांची वाट त्या संस्थेने बंद केली. ती वाट सुरु करण्याबाबत माननीय राज्यमंत्री श्री. राणा जगजितसिंह पाटील यांच्या दालनामध्ये बैठक घेण्यात आली. त्यावेळी 10 ते 12 मीटर इतकी जमीन लोकांना जाण्या-येण्यासाठी रस्त्याकरिता सोडण्यात येईल असे सांगण्यात आले. आता त्याठिकाणी 5 मीटर इतकी जागा सोडण्यात आली. प्रश्न असा आहे की, त्या रस्त्याकरिता 12 मीटर इतकी जागा सोडण्याची आवश्यकता असून तेवढी जागा सोडण्यात येईल काय?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी एका महत्वाच्या विषयावर प्रश्न उपस्थित केला आहे. त्याकरिता सभागृहाची वेळ घेण्याची आवश्यकता नव्हती. आपण यासंबंधी माझ्याबरोबर बोललात तर मी यामध्ये लक्ष घालून ही समस्या सोडवावयास तयार आहे. प्रश्न असा आहे की, या प्लॉटच्या दक्षिणेला रेल्वे लाईन आहे. ती रेल्वेलाईन ब्रॉडगेज झाल्यामुळे रेल्वेच्या पूलाखालील असलेल्या पाय वाटेवरुन लहान वाहनांची रहदारी सुरु झाली, त्यामुळे तो प्लॉट बाधित होत होता. त्याकरिता त्या रस्त्याची रुंदी वाढवावी लागली. त्यामुळे प्लॉटमालकाचे असे म्हणणे आहे की, यामुळे माझ्या प्लॉटचे नुकसान झाले, एका प्लॉटचे दोन प्लॉट झाले. त्यामुळे प्लॉट मालकांपेक्षा लोकांची सोय महत्वाची असल्यामुळे डेव्हलपमेंट प्लॅनप्रमाणे त्याठिकाणी 5 मीटरचा पाहिजे की, 10 मीटरचा रस्ता पाहिजे ही बाब तपासून घेण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण . . . .

तसेच तेथील ट्रॅफीक लक्षात घेऊन तेथे अपघात होणार नाही यादृष्टीने रस्त्याची अलाईनमेंट किती असावी ? रस्ता किती रुंद असला पाहिजे ? याबाबतीत विचार केला जाईल. जेणेकरुन तेथील लोकांची गैरसोय होणार नाही.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, येथील रस्ता 5 मी. असावा जेणेकरुन . . .

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, रस्ता 5 मी.असावा किंवा 10 मी.असावा हा विषय गौण आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी विषय समजावून घ्यावा. हा रस्ता 5 मी.पर्यंत असला पाहिजे . . . .

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मला मान्य आहे. डेव्हल्पमेंट प्लॅनमध्ये जी रुंदी बसते, त्याप्रमाणे करु.

-----

. . . .2 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्र.13 बाबत

**उपसभापती** : आता नियम 93 अन्वये करण्यात आलेले निवेदन क्र.13 चर्चेसाठी घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनाच्या संदर्भात कोणते माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहेत ?

**उपसभापती** : या नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सुचनेच्या संदर्भात जे माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहे, त्यांना सदनामध्ये बोलावून घेण्यात यावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे असे रोज सुरु आहे आणि ते ठरवून झाले आहे. सदनामध्ये काल देखील संबंधित विभागाचे माननीय मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी उपस्थित नव्हते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी जे कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत, त्यांनी सामुदायिक जबाबदारी म्हणून या 93 च्या सुचनेसंदर्भात उत्तर द्यावे. कारण माननीय सभापतींचे तसे निदेश आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करावी अशी माझी सूचना आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी जे कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत, त्यांनी उत्तर दिले पाहिजे. ही सामुदायिक जबाबदारी आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तीन वेळा असे घडलेले आहे. येथे जी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे, त्यासंदर्भात उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय आतापर्यंत तीन वेळा उपस्थित राहिलेले नाहीत. म्हणजे त्यांना या सूचनेच्या संदर्भात उत्तर द्यावयाचे नाही काय ?

**उपसभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना सदनामध्ये बोलावून घेतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याबाबतीत सामुदायिक जबाबदारी घेणाऱ्या माननीय मंत्री महोदयांना सदनामध्ये बोलविण्यात यावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ही गोष्ट बरोबर नाही. तुमची काही प्रतिष्ठा राहिलेली नाही. हे चांगले नाही.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, यासंदर्भात मला जी अनौपचारिकरित्या माहिती समजली आहे, त्यानुसार माननीय सहकार मंत्र्यांच्या घरी कोणीतरी अचानक आजारी पडल्यामुळे





श्री.अशोक चव्हाण . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना तातडीने पुणे येथे जावे लागले आहे. त्यामुळे ते गैरहजर आहेत. यामध्ये उत्तर देण्याचे टाळावयाचे आहे असे नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदरहू विषयाच्या संदर्भातील निवेदनावरील चर्चा गेल्या आठवडयापासून तीन वेळा पुढे ढकलण्यात आलेली आहे.

**उपसभापती** : आता मी सभागृहाचे कामकाज 4.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 23 मिनिटांनी, दुपारी 4.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ KGS/ 16.00

( स्थगितीनंतर )

**(सभापतीस्थानी : माननीय तालिका सभापती श्री. उल्हास पवार)**

93 चे निवेदन क्रमांक 13 पुढे ढकलण्याबाबत

**तालिका सभापती** : आता 93 चे निवेदन क्रमांक 13 पुढे ढकलण्यात येत आहे. माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या भावाची तब्बेत बिघडल्यामुळे त्यांना तातडीने पुण्याला जावे लागले आहे. आता 93 चे निवेदन क्रमांक 14 घेण्यात येईल.

------------

**पृ.शी.**: जीवनावश्यक वस्तुंच्या दरात होत असलेली प्रचंड वाढ.

**मु.शी** : जीवनावश्यक वस्तुंच्या दरात होत असलेली प्रचंड वाढ याबाबत श्री. अरविंद सावंत, वि.प.स यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. सुनील तटकरे ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ) : सभापती महोदय, श्री. अरविंद सावंत यांनी जीवनावश्यक वस्तुंच्या दरात होत असलेली प्रचंड वाढ या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवता.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, राज्यात सध्या जीवनावश्यक वस्तुंचा तुटवडा भासत आहे. सर्वच जीवनावश्यक वस्तुंचे खुल्या बाजारात भाव कडाडले आहे. कडधान्ये, तेल तूप, साखर, डाळी या सर्वच वस्तुंच्या किमती वाढलेल्या आहेत. यामुळे सर्वसामान्य जनता महागाईने त्रस्त झ ालेली आहे. जनतेला आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक वस्तू बाजारात उपलब्ध होत नाहीत. "आम आदमी की सरकार ,आम आदमी का गला घोट रही है" मी आपणास सांगू इच्छितो की, आमचे सरकार सत्तेवर असताना, 5 जीवनावश्यक वस्तुंचे भाव स्थिर ठेवले होते. त्या वेळी गहू 5 रु किलो दराने मिळत होता. तीन प्रकारच्या तांदूळापैकी एक प्रकारचा तांदूळ 6.60 रुपयांना मिळत होता. तसेच साखर 9 रु किलो व तूरडाळ 12 रु किलो या भावाने बाजारात उपलब्ध होती. कितीही महागाई झाली तरी देखील या पाच जीवनावश्यक वस्तुंचे भाव आमच्या सरकारने स्थिर ठेवलेले होते. जीवनावश्यक वस्तुंचे भाव आज जे वाढलेले आहेत, त्यांचे भाव
स्थिर ठेवून, शासनाकडून जनतेला दिलासा दिला जाणार आहे काय ? तसेच या सर्व जीवनावश्यक वस्तू जनतेला उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ?

सभापती महोदय,तसेच या विषया संदर्भात यवतमाळ जिल्हयातील एक उदाहरण मी आपणास सांगू इच्छितो. या जिल्हयामध्ये शासकीय धान्य पुरवठा योजनेमध्ये एक महिन्यापासून 1139 मेट्रीक टन धान्याची कपात केलेली आहे. दारिद्रय रेषेखालील गरीब कुटुंबियांना या योजनेअन्वये स्वस्त धान्याचा पुरवठा केला जातो. 1 लाख 39 हजार रेशन कार्ड धारकांना दर महा 35 किलो धान्य शासनाकडून दिले जाते. परंतु आता या धान्य पुरवठयामध्ये कपात करण्यात आली आहे. 1634 मेट्रीक टन बाजरी व 486 मेट्रीक टन मका या धान्याचे नियतन मंजूर करण्यात आले आहे. तसेच 1139 मेट्रीक टन धान्याची कपात करण्यात आलेली आहे. गहू, तांदूळ हे धान्य या जनतेला न देता बाजरी, मका हे धान्य देण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. या महत्वाच्या विषयास 93च्या सूचनेअन्वये न्याय मिळू शकणार नाही. म्हणून आपण या सूचनेचे रुपांतर लक्षवेधी सूचनेमध्ये करावे. या विषयावर आपण उद्या लक्षवेधी सूचना ठेवली तर त्यासंदर्भात शासनाकडून उत्तर मिळू शकेल. म्हणून हा विषय नियम 93 च्या सूचनेअंतर्गत न घेता लक्षवेधी सूचनेच्या मार्फत घ्यावा अशी मी आपणास विनंती करतो.

यानंतर श्री. बरवड..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हे निवेदन आताच चर्चेमध्ये कन्व्हर्ट करावे आणि त्याला माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबत मला बोलावयाचे आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी नियम 93 अन्वयेच्या सूचनेबाबत निवेदन वितरित झालेले आहे. आपण अर्धा-तास चर्चा देऊ शकतो परंतु लक्षवेधी सूचनेमध्ये कन्व्हर्ट करता येणार नाही. नियम 93 ची जी सूचना होती त्यासंदर्भात हे निवेदन केलेले आहे. लक्षवेधी म्हणून हे घेता येणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : नियम 93 ची सूचना अर्धा तास चर्चेमध्ये कन्व्हर्ट करता येत नाही. परंतु महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. यावर सर्व सन्माननीय सदस्यांचे विचार पुढे यावयास पाहिजेत. नियम 93 च्या निवेदनातून याला न्याय मिळणार नाही. आपण हा विषय किमान लक्षवेधी सूचनेमध्ये तरी रुपांतरित करावा माननीय सभापतींनी अनेकदा लक्षवेधी सूचनेमध्ये रुपांतरित केलेले आहे.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही तर आपण विचार करु.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी सूचना मांडलेली आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, हा विषय केवळ विरोधी पक्षाच्याच चिंतेचा नसून सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचा चिंतेचा विषय आहे. ही पक्षविरहित बाब आहे. केंद्रिय मंत्रिमंडळ सुध्दा चिंतेमध्ये आहे. यू.पी.ए.च्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी यासंदर्भात बैठक बोलवली तसेच केंद्राच्या कॅबिनेटची खास बैठक बोलविण्यात आली. एकही चॅनेल असे नाही की, ज्यावर गेले तीन दिवस महागाईच्या संदर्भात बातमी येत नाही. सन्माननीय केंद्रीय पुरवठा मंत्री तसेच सन्माननीय अर्थमंत्री श्री. पी. चिदम्बरम तसेच श्रीमती सोनिया गांधी महागाई कशी कमी करावयाची याबाबत आपले मत मांडत आहेत. महागाईचा निर्देशांक 6 च्या वर गेलेला आहे. हा निर्देशांक कसा कमी करावयाचा याची चिंता केंद्र सरकारला लागलेली आहे. दूरदर्शनवर लोकांच्या

...2...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

प्रतिक्रिया येतात. कालच्या बातम्यांमध्ये गृहिणींनी अशा प्रतिक्रिया दिल्या की, महागाई वाढल्यामुळे सर्व आमच्या हाताबाहेर गेलेले आहे. एका गृहिणीने मौलिक उत्तर दिले. आपण महागाईला कसे तोंड देता असा प्रश्न विचारल्यावर तिने सांगितले की, आम्ही जी वस्तू महिन्यातून चारवेळा बनवतो ती आता महिन्यातून एकदा बनवतो आणि समाधान करुन घेतो. जनता महागाईने त्रस्त झालेली आहे. अशा परिस्थितीत कसे व्यवस्थापन करावयाचे यासंदर्भात दोन्ही ठिकाणची सरकारे चिंतेत आहेत. आमचीही चिंता आहे. हा टीकेचा विषय नाही. याबाबतीत सर्वंकष चर्चा झाली पाहिजे. केंद्राची आणि देशाची काय परिस्थिती आहे, त्यांच्या धोरणांचा महाराष्ट्रातील महागाईवर काय परिणाम झालेला आहे हा विषय यामध्ये आहे. मुंबई आणि महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न इतर राज्यांच्या मानाने जास्त असल्यामुळे तो निर्देशांक जास्त आहे. सहावा वेतन आयोग लागू झाल्यामुळे महागाई वाढत आहे काय अशीही चर्चा सुरु झाली आहे. असे वेगवेगळे कंगोरे यामध्ये असल्यामुळे याबाबत चर्चा झाली पाहिजे. माननीय कृषीमंत्र्यांना विचारण्यात आले की, सहाव्या वेतन आयोगामुळे महागाई आणखी वाढणार काय ? त्यावर त्यांनी असे सांगितले की, मी ज्योतिषी नाही. याचा अर्थ महागाई कोठे जाईल याचा अंदाज केंद्रीय मंत्रिमंडळाला येत नाही. आपले अधिवेशन सुरु आहे. दिल्लीपासून गल्लीपर्यंतचे लोक चिंतेत आहेत. राजकारणी, सत्ताधारी चिंतेत आहेत. महागाई कशी कमी करता येईल याबाबत या सदनातून आपल्याला केंद्राला मार्गदर्शन करता आले पाहिजे. या निवेदनामध्ये असे उत्तर आले आहे की, 24 जीवनावश्यक वस्तूंचा किरकोळ विक्री दर तसेच घाऊक विक्री दर यांचा तपशील नागपूर येथील बाजारातून तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंबई येथून दर दिवशी बाजार भावांचा तपशील घेऊन त्याबाबतचा अहवाल दररोज तसेच दर आठवड्यास केंद्र शासनास पाठविण्यात येतो. त्यायोगे कोणत्या वस्तूंच्या किमतीमध्ये किती टक्के वाढ अथवा घट झाली याचा आढावा घेणे शक्य होते. देशातील भावांच्या संदर्भात महाराष्ट्र हा केंद्रबिंदू आहे. आपल्या विधिमंडळाचे अधिवेशन चालू आहे. त्यामुळे याबाबत गांभीर्याने चर्चा झ ाली पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

श्री. अरविंद सावंत यांनाही माझी विनंती आहे की, विशेष अधिवेशन घेऊन यावर अडीच तासाची चर्चा घेतली तर बरे होईल.

**तालिका सभापती** : माननीय सभापती तसेच माननीय संसदीय कार्य मंत्री यांच्याशी चर्चा करुन याबाबत निर्णय घेण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय माफक अपेक्षा व्यक्त केलेली आहे. कारण महागाईमुळे सर्वसामान्य जनता पिचून निघालेली आहे. केंद्रातील सत्ताधारी आघाडीच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी देखील या प्रश्नात हस्तक्षेप करण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे अशा महत्वाच्या विषयावरील नियम 93 च्या निवेदनावर केवळ 1-2 प्रश्न विचारले तर सामान्य जनतेवर अन्याय केल्यासारखे होईल. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे नियम 93 चे निवेदन पंधरा क्रमांकावर आहे. त्यामध्ये 'दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या 65.34 लक्ष इतकी निश्चित केली असून त्या सर्व कुटुंबांना शासन पुरेसे रेशन देऊ शकत नाही. केंद्र सरकारने इष्टांक वाढवून दिल्यास आम्ही व्यवस्था करु असे म्हटले आहे.' या राज्यात असंघटित क्षेत्रात काम करणा-या सर्व संघटनांनी श्री.बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली महागाईच्या विरोधात दिनांक 11 एप्रिल, 2008 रोजी महाराष्ट्र बंद करण्याचा इशारा दिलेला आहे. त्यामुळे या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा झाली पाहिजे. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सुध्दा आवाहन करतो. या प्रश्नावर विस्ताराने चर्चा करण्यासाठी आपणही परवानगी द्यावी. सभापती महोदय, ही चर्चा उद्या घ्यावा किंवा परवा घ्यावी हे ठरविण्याचा आपला अधिकार आहे. पण या चर्चेला मान्यता दिली नाही तर महागाईने पिचून गेलेल्या जनतेला न्याय दिल्यासारखे होणार नाही.

**तालिका सभापती** : माननीय सभापतींशी चर्चा करुन त्यांच्या संमतीने दीड तासाची चर्चा घेता येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही चर्चा आता घ्यावी. आजच्या कामकाजपत्रिकेवर नियम 260 अन्वये प्रस्ताव दाखविलेला आहे, तो प्रस्ताव उद्या सकाळी घेण्यात यावा.

**तालिका सभापती** : अद्याप लक्षवेधी सूचना व्हावयाच्या आहेत. तसेच आता ही चर्चा घ्यावयाचे ठरविले तर अनेक सन्माननीय सदस्यांना त्यात भाग घेण्यासाठी अवधी मिळाला पाहिजे. त्यामुळे माननीय सभापतींशी बोलून चर्चेबाबतचा निर्णय घेतला जाईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, चर्चा घेण्यास काहीच हरकत नाही. परंतु ती उद्या घ्यावी की सोमवारी घ्यावी याबाबत आपण जो निर्णय घ्याल तो मला मान्य आहे. आपल्याला ही चर्चा उद्या सुध्दा करता येईल.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाची देखील विनंती आहे की, या विषयावर दोन तासाची चर्चा घेण्यात यावी.

**तालिका सभापती** : या चर्चेसाठी उद्याची वेळ निश्चित करु.

------

2....

03-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) HH-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ. शी.** : रोहा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील लोकांना पिवळी रेशन कार्ड न मिळणे

**मु. शी.**: रोहा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील लोकांना पिवळी रेशन कार्ड न मिळणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी " रोहा तालुक्यातील दारिद्रय रेषेखालील लोकांना पिवळी रेशन कार्ड न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आताच चौदा क्रमांकाचे निवेदन सभागृहासमोर आले होते, त्याला अनुसरुनच हे पंधरा क्रमांकाचे निवेदन आहे. यामध्ये सुध्दा शासनाने तसेच उत्तर दिलेले आहे. रोहा तालुक्यात 6,398 लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे असे या निवेदनात नमूद केलेले आहे. गेल्या 5 वर्षामध्ये तेथील दारिद्रय रेषेखालील लोकांना पिवळे रेशनकार्ड दिले नसल्याने ही नियम 93 ची सूचना दिलेली आहे. सन 2002 मध्ये सर्वेक्षण झाले होते. आता आपण 2008 मध्ये आहोत. माझ्याकडे शासनाकडून आलेले एक पत्र आहे. त्यात असे नमूद केले आहे की, वरील संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, 'दारिद्रय रेषेखालील 2002-03 मध्ये झ ाालेल्या सर्वेक्षणानुसार तालुक्यातील ग्रामपंचातीवर यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीनुसार पिवळया शिधापत्रिका देण्याबाबत शासनाकडून अद्याप आदेश प्राप्त झालेले नाहीत.' सभापती महोदय, ही शोकांतिका आहे. त्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, 'त्यामुळे सदर यादीतील लोकांना पिवळी शिधापत्रिका देता येत नाही. सन 2002-03 मधील बी.पी.एल.च्या यादीनुसार पिवळी शिधापत्रिका देण्याबाबत शासनाकडून आदेश प्राप्त होईपर्यंत शिधापत्रिका देण्याबाबतची कार्यवाही कार्यालयाकडून करण्यात येणार नाही.' मघाशी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करताना असे म्हटले होते की, केंद्र सरकारने 65.34 लाख इतका इष्टांक राज्य सरकारला दिला होता.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

त्यामुळे रोहा तालुक्यातील लोकांना पिवळी रेशनकार्डे मिळत नाहीत. त्याबद्दल आपण काय पावले उचलणार आहात ? किती दिवसात लोकांना पिवळया शिधापत्रिका मिळतील ?

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आता सदनाला जी माहिती दिली ती चुकीची आहे.

डॉ. दीपक सावंत : माझ्याकडे तहसीलदारांचे पत्र आहे. त्या आधारे मी माहिती दिलेली आहे.

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे. रोहा तालुक्यातील 1997 सालच्या दारिद्र रेषखालच्या यादीतील सर्व लोकांना पिवळी रेशनकार्डे दिलेली आहेत आणि त्या सर्वांना धान्य उपलब्ध होत आहे. 2002 सालामध्ये सर्वेक्षण झाले. त्याची यादी ग्राम विकास विभागाने तयार केलेली आहे. ती यादी आमच्याकडे येईल. मी अनौपचारिकपणे सांगू इच्छितो की, आता जर नव्याने सर्वेक्षण करावयाचे ठरविले तर आता दारिद्र रेषे खालील लोकांची संख्या जी 45 लाखाच्या आसपास आहे ती संख्या 30 लाखावर येईल. म्हणजे पिवळया कार्डधारकांची संख्या कमी होईल. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर तोटा होणार आहे. रोहा तालुक्याच्या रेकार्डवर असलेल्या सर्व पिवळया कार्डधारकांना धान्य पूर्णपणे, वेळेवर आणि नियमितपणे मिळत आहे.

डॉ. दीपक सावंत : माझ्याकडे रोहा तहसीलदारांचे दिनांक 24.3.2008चे पत्र आहे. ते पत्र मी माननीय मंत्री महोदयांना देतो...

श्री. सुनील तटकरे : 2002च्या सर्वेक्षणानुसार दारिद्रय रेषेखालील लोकांची संख्या लक्षणीय कमी झालेली आहे. त्या यादीप्रमाणे कार्यवाही करावयाची झाली तर लोकांचे नुकसान होईल हे मी अनौपचारिकपणे सांगत आहे आणि ही वस्तुस्थिती आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 2002ची यादी मान्य केली तर लोकांचे नुसान होईल. नुकसान होईल याचा अर्थ काय ? बीपीएलची संख्या कमी झालेली असेल तर ते प्रगतीचे लक्षण आहे.

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो प्रश्न विचारला त्यानुषंगाने मी "लोकांचे नुकसान होईल" असे सांगितले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : ही गोष्ट खरी आहे की, नवीन यादी मान्य करावयाची झाली तर त्यामुळे पिवळ्या रेशनकार्डधारकांची संख्या कमी होईल. जे सर्वेक्षण झाले त्यानुसार ज्यांच्या घरामध्ये टयूब लाईट आहे, सिलिंग फॅन आहे त्यांना बीपीएलमधून वगळलेले आहे. खरे म्हणजे वाढती महागाई लक्षात घेता 2002ची संपूर्ण यादी रद्द करुन आणि पुन्हा सर्वेक्षण करुन यादी तयार करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा त्या लोकांवर अन्याय होईल. तेव्हा वाढती महागाई लक्षात घेता जी यादी तयार केलेली आहे ती रद्द करुन पुन्हा व्यवस्थित अशी यादी करण्याचा माननीय मंत्री महोदय प्रयत्न करणार आहेत काय ?

श्री. सुनील तटकरे : याबाबतीतील निकष हे केन्द्र सरकारकडून ठरविले जातात. केन्द्र सरकारने निकष ठरविल्यानंतर ग्राम विकास विभागामार्फत याबाबतीत सर्वेक्षण केले जाते. नगरपालिका क्षेत्रामध्ये नगरपालिकेच्या यंत्रणेकडून सर्वेक्षण केले जाते. नियोजन आयोगाने 15 हजाराची रक्कम 25 हजारापर्यन्त करण्याच्या संदर्भात त्या वेळी जी यादी प्रसिध्द झाली होती त्या यादीच्या अनुषंगाने लोकांना तहसिलदार आणि प्रांत अधिकारी यांच्याकडे अपिल करण्याची मुभा दिली होती. त्यानंतर ग्रामपंचायतींकडे यादी पाठविण्यात आली. काही ग्रामपंचायतींनी यादी मान्य केलेली आहे. अजूनही आपण त्या यादीचा प्रभाव आपल्या योजनेंतर्गत घेतलेला नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : बीपीएलची यादी बनविताना खूप गडबड झालेली आहे. जे लोक बीपीएलमध्ये आहे अशा लोकांची नावे यादीमध्ये समाविष्ट केलेली नाहीत. परंतु जे बीपीएलमध्ये नाहीत, जे दारिद्र्य रेषेच्या वर आहेत अशा लोकांची नावे बीपीएल यादीत समाविष्ट केलेली आहेत. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतीत पुन्हा एकदा सर्वेक्षण करुन जे दारिद्र्य रेषेखालील लोक वंचित राहिलेले आहेत अशा लोकांची नावे बीपीएल यादीत समाविष्ट करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे काय ?

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : दारिद्रय रेषेसंदर्भात केंद्र शासनाच्या पातळीवर तयार करण्यात आले आहेत. तेही निकषण बदलण्याचा संदर्भात विचार सुरु आहे. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे यासंदर्भात नव्याने सर्वेक्षण करण्यासंबंधी केंद्र शासनाला लेखी पत्र पाठवून विनंती करण्यात येईल.

डॉ.दीपक सावत : माननीय मंत्री महोदयांनी मघाशी उत्तर देताना सांगितले की, 2002 या वर्षाच्या यादीप्रमाणे दारिद्ररेषेखालील कुटुंबे दारिद्रय रेषेच्यावर जाणा-या कुटुंबाची संख्या लक्षणीय वाढणार आहे. त्यामुळे दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची संख्या कमी होणार आहे. अनेक कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहेत, त्यांचे नाव दारिद्रय रेषेखालच्या कुटुंबियांच्या यादीत आहे. परंतु त्या कुटुंबाना अद्यापपर्यंत पिवळे रेशनकार्ड दिले गेलेले नाही. माननीय मंत्री महोदयांना यासंबंधी अनेक केसेस मी देण्यास तयार आहे. दारिद्र रेषेखालील यादीत ज्या कुटुंबाची नावे आहेत, परंतु त्यांना अद्यापर्यंत पिवळी रेशनकार्डे दिली गेली नाहीत. त्या कुटुंबाना तात्काळ पिवळी रेशनकार्ड उपलब्ध करुन दिले जातील काय ?

श्री. सुनील देशमुख : सन्माननीय सदस्यांनी अशा केसेससंबंधीची माहिती मला उपलब्ध करुन द्यावी. दारिद्रय रेषेच्या यादीत ज्यांचा समावेश आहेत, परंतु त्यांना पिवळी रेशनकार्डे दिली गेली नसतील, त्यांना ती उपलब्ध करुन देण्यात येतील.

---------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : केळगांव (आळंदी) ता.खेड येथे ज्ञानेश्वराचे भव्य स्मारक बांधून संरक्षित राज्य स्मारके म्हणून घोषित करणे

**मु. शी.** : केळगांव (आळंदी) ता.खेड येथे ज्ञानेश्वराचे भव्य स्मारक बांधून संरक्षित राज्य स्मारके म्हणून घोषित करणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.राजेंद्र शिंगणे ( महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपिकिशन बाजोरिया यांनी केळगाव (आळंदी) ता.खेड येथे ज्ञानेश्वराचे भव्य स्मारक बांधून संरक्षित राज्य स्मारके म्हणून घोषित करणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : ( श्री. उल्हास पवार ) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपिकिशन बाजोरिया : सभापती महोदय, हा प्रश्न महाराष्ट्रातील 25 लाख वारक-यांचा आहे. संपूर्ण विश्वाची माऊली असणारे श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची जन्मभूमी आणि लीला भूमी असणारे सिध्दबेट आळंदी हे अतिप्राचीन जागतिक पर्यटन क्षेत्र आहे. सन 1988 मध्ये या सिध्दबेटची ही जागा तपोवन नामक संस्थेला शासनाने दिली होती. तपोवन संस्थेने त्या ठिकाणी अस्तित्वात असलेली सर्व प्राचीन स्मारके तोडून ती जागा मोकळी करुन घेतली आहे. महाराष्ट्रातील वारक-यांची भावना लक्षात घेता शासनाने ती जागा तपोवन संस्थेकडून परत घेतली. ही जागा शासनाने दिनांक 6.7.05 रोजी परत ताब्यात घेतली आहे. दिनांक 19.7.2005 रोजी या संस्थेने सदर जमीन शासनाने ताब्यात घेतली त्या निर्णयाच्या संदर्भात स्थगनादेश उच्च न्यायालयाकडून आणला. गेल्या तीन वर्षापासून या संस्थेने या जागेच्या संदर्भात अडथळा निर्माण केला आहे. हायकोर्टाने 19.3.2008 रोजी तो स्टे व्हेकेट करुन ते प्रकरण खारीज केले. निवेदनात असेही म्हटले आहे की, सदरचे प्रकरण हे गुणवत्तेच्या आधारे निकाली काढण्यात आलेले नसल्याने सरकारी वकील यांनी दिनांक 31.3.2008 रोजी दिलेल्या पत्रात नमूद केलेले आहे. सरकारी वकील हे तपोवन संस्थेचे आहेत की शासनाचे आहेत ? या बाबतीत मी फक्त दोन प्रश्न विचारणार आहे. या जमिनीवर माऊलीचे स्मारक उभारण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन दिले आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे त्या जागेवर स्मारक कधी उभारले जाईल ? या जमिनीच्या संदर्भात पुन्हा तपोवन या संस्थेने अडथळा आणू नये म्हणून शासनातर्फे कोर्टात कॅव्हेट दाखल केली जाईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : मी सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया साहेबांचे मनापासून अभिनंदन करतो की, आज वेगळया प्रश्नाला त्यांनी चालना दिली आहे. नेहमी ते वेगळया विषयाच्या संदर्भात प्रश्न विचारातात, परंतु त्यांनी आज वेगळाच परंतु अतिशय चांगला प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. महाराष्ट्रातील लाखो-करोडो वारक-यांचे श्रध्दास्थान असलेल्या आनंदी येथील सिध्दबेटचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. त्यांनी जी काही माहिती दिली ती खरी आहे. सभापती महोदय, आपल्याला देखील या जमिनीसंबंधीची पूर्णपणे माहिती आहे. सिध्दबेट तपोवन ज्ञानयोग प्रतिष्ठान या संस्थेला जागा शासनाने उपलब्ध करुन दिली होती. या संस्थेला ज्या प्रयोजनासाठी शासनाने जमीन उपलब्ध करुन दिली होती, त्या प्रयोजनासाठी या जमिनीचा उपयोग

4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे...

त्यांनी केला नाही त्यामुळे शासनाने ती जमीन परत घेतलेली आहे. त्यानंतर ती संस्था उच्च न्यायालयात गेली होती. त्यांनी याप्रकरणी स्टे घेतला होता. त्या ठिकाणी स्टेटस्को सुध्दा घेतलेला होता. दिनांक 19.3.2008 रोजी उच्च न्यायालयाने ही केस खारीज केली आहे. ही केस न्यायालयाने खारीज केल्यानंतर शासन त्या केसच्या पाठिमागे आहे. यासंबंधीची अधिकृत प्रत एक, दोन दिवसात शासनाला मिळणार आहे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे या केसच्या बाबतीत ताबडतोबीने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केली जाईल. माननीय वित्तमंत्र्यांनी पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी या वर्षाच्या अर्थसंकल्पात 400 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यातील 25 कोटी रुपये खर्च करुन या ठिकाणच्या शासनाच्या ताब्यात असलेल्या जमिनीचा विकास करण्याचे शासनाने ठरविले आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांना धन्यवाद देतो. हायकोर्टाने रिट निकाली काढल्यानंतर म्हणजे 19.3.08 नंतर या जागेवर सरकारचा ताबा आहे. परंतु सरकारी वकिलांनी 31.3.08 च्या पत्रात लिहिले आहे की, ही याचिका गुणवत्तेच्या आधारावर निकाली काढण्यात आलेली नाही. माझी शासनाला विनंती आहे की, केवळ सुप्रीम कोर्टात जाऊन चालणार नाही तर जिल्हा सेशन कोर्टात सुध्दा रिट दाखल करावे लागणार आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की जिल्हा सेशन कोर्टात अशा प्रकारे रिट याचिका शासन दाखल करणार आहे काय ? ती केली पाहिजे अशी माझी मागणी आहे. आताच मंत्रिमहोदयांनी या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी 400 कोटी रुपयांची तरतूद केली आहे असे सांगितले. माझी शासनाला हात जोडून विनंती आहे की, येत्या 3/4 दिवसात या जागेला किमान संरक्षण म्हणून तारेचे कुंपण करुन तेथे शासनाच्या ताब्यात जमीन आहे असा बोर्ड लावावा. तशा प्रकारचा बोर्ड शासन या जागेवर लावणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या स्वागतार्ह आहेत. सदनाला मी सांगू इच्छितो की, जरी सर्वोच्च न्यायालयाने 19.3.08 रोजी केस डिसमिस केली असली तरी 18.7.05 पासून ही जागा शासनाने ताब्यात घेतली आहे. 7/12 वर शासनाचे नांव लागलेले आहे. सर्वोच्च न्यायालयात ज्याप्रमाणे शासन जाणार आहे त्याप्रमाणे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुचविल्याप्रमाणे जिल्हा सत्र न्यायालयात सुध्दा शासन जाईल आणि याबाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेतला जाईल. ही जागा शासनाच्या ताब्यात कशी राहील यासंबंधीची सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करु. 25 कोटी रुपये या स्मारकाच्या विकासासाठी खर्च करणार आहोत. जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकारी यासाठी जी समिती आहे त्याचे प्रमुख आहेत. त्यांना स्मारकाच्या जागेभोवती तारेचे कुंपण उभे करण्याबाबत सूचना देण्यात येतील. ही जागा सरकारची आहे आणि सिध्दपीठ स्मारकाचा विकास शासनाच्या वतीने करण्यात येणार आहे अशा तऱ्हेचा बोर्ड सुध्दा याठिकाणी लावण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माऊलीची सुटका झाली आणि आपण सभापतीस्थानी आसनस्थ आहात हा योगायोगच म्हटला पाहिजे. शासनाने जो निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया यांनी हा प्रश्न का विचारला याचा विचार केला तर 400-500 भाविक त्यांच्या घरी गेले ते सरकारकडे आले नाहीत याचा विचार सरकारने करावा. यामध्ये कमीपणा कोणाचा आहे याचा शासनाने विचार करावा.

03-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) KK-2

SSK/ KTG/ SBT/ 16:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री. उल्हास पवार) : सन्माननीय सदस्यांच्या नांवात गोपीकिशन आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी बोर्ड लावला जाईल, कुंपण देखील घातले जाईल. हा वेगळया पध्दतीचा आणि भावनांचा प्रश्न आहे. वकिलाने जे पत्र लिहिले आहे त्याचा अर्थ काय ? मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे न्यायालयाने यासंबंधीची याचिका फेटाळली. परंतु सरकारी वकिलांनी असे लिहिले की, गुणवत्तेच्या आधारावर निकाल देण्यात आलेला नाही. वकिलांचे हे पत्र काय इंडिकेट करते ? वकील सरकारचे आहेत की संस्थेचे आहेत ?

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

जो सरकारला लिहून कळवितो की, गुणवत्तेच्या आधारे प्रकरण निकाली काढण्यात आलेले नाही. या सरकारी वकिलांना संबंधित विभागाच्या सचिवांनी कारणे दाखवा नोटीस दिली पाहिजे आणि त्यांना सरकारी वकील या पदावरुन दूर केले पाहिजे. माऊलीच्या धार्मिक स्थळाबाबत या सरकारी वकिलाने आपल्या लेखणीने पाचर मारुन ठेवली हे निषेधार्ह आहे. या सरकारी वकिलांना सध्याच्या पदावरुन ताबडतोब दूर केले जाणार का? हजारो वारकरी शासनाकडे दाद मागण्याऐवजी सन्माननीय सदस्य श्री.बाजोरिया यांच्याकडे का केले याचा मंत्रीमहोदयांनी विचार करावा. तपोवन या संस्थेला शासनाने जागा देऊनही त्या संस्थेने 16 वर्षात त्या जागेवर काहीही केले नाही. लाखो वारकऱ्यांच्या भावना या माऊलीच्या प्रती एकवटल्या आहेत. 400 कोटी रुपयांचा निधी तीर्थक्षेत्र विकासासाठी उपलब्ध होणार आहे, त्या कार्यक्रमात या तीर्थक्षेत्राचा अंतर्भाव आहे म्हणून सांगितले. तपोवन संस्थेने ही जमीन ताब्यात ठेवून 16 वर्षात त्या जागेवर काहीही काम केले नाही. या संस्थेचे रजिस्ट्रेशन तातडीने रद्द केले असते तर ती संस्था कोर्टात दाद मागू शकली नसती. या संस्थेने 16 वर्षे शासनाची फसवणूक केली आणि लाखो भाविकांच्या भावना पायदळी तुडविल्या आहेत. या संस्थेची मान्यता रद्द करण्याकरिता सरकार पावले उचलणार आहे का? सरकारी वकिलांना ताबडतोब त्या पदावरुन दूर करण्याची मागणी केली ती मान्य करणार का?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे सरकारी वकिलांनी हे मत कशाच्या आधारे नोंदविले याची तपासणी निश्चितपणे केली जाईल. विधी व न्याय विभागाकडून सरकारी वकिलांनी असे मत का व्यक्त केले याची माहिती घेण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : चौकशी करण्याचे काही कारण नाही. सरकारी वकिलांनी गुणवत्तेच्या आधारावर हा निर्णय लागला नाही असे म्हटले आहे याचा अर्थ असा होतो की, त्यांनी संस्थेला अपील करण्याची मोकळीक करुन दिली. ही पळवाट आहे. हे वकील कोण आहेत? कशासाठी त्यांना नेमले आहे? त्यांची त्या पदावरुन तातडीने हकालपट्टी करण्यात यावी.

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. निकाल लागल्यानंतर सरकारी वकिलांनी असे म्हणण्याची काही आवश्यकता नाही. त्यामुळे समोरच्या पक्षाला पुढे जायची संधी मिळते ही गंभीर बाब असून याची दखल घेण्यात यावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : निश्चितपणे त्यांनी असे का मेन्शन केले याची शासन दखल घेईल आणि आवश्यकता असल्यास कारवाई सुध्दा केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सरकारी वकिलांनी न्यायाधीशांच्या निर्णयाला चॅलेंज केले आहे. न्यायाधीशांनी याचिका खारीज केली, ती गुणवत्तेच्या आधारे केली नाही असे म्हटले आहे. हे सरकारी वकील आहेत की न्यायाधीश आहेत? या प्रकरणातून या सरकारी वकिलांना दूर केले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : तपोवन संस्थेने 16 वर्षे शासनाची जमीन ताब्यात ठेवून वारकऱ्यांचा अपमान केला आहे. या संस्थेचे रजिस्ट्रेशन रद्द करणार आहात काय?

डॉ.राजेंद्र शिंगणे : संस्थेचे रजिस्ट्रेशन रद्द करणे किंवा कायम ठेवणे हा विषय धर्मादाय आयुक्तांच्या अखत्यारितील आहे. धर्मादाय आयुक्तांना या संदर्भात लिहिले जाईल आणि धर्मादाय आयुक्त या संदर्भात योग्य तो निर्णय घेतील.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणीकरिता नेमलेल्या तदर्थ समितीची व्याप्ती वाढविणे

**मु.शी.**: धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणीकरिता नेमलेल्या तदर्थ समितीची व्याप्ती वाढविण्याबाबत विधी व न्याय राज्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"मुंबईतील धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणी संदर्भात दिनांक 2 ऑगस्ट, 2007 रोजी विधानपरिषदेने नियुक्त केलेल्या तदर्थ समितीला तिची तपासणीची व्याप्ती पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच राज्यातील उर्वरित मोठ्या शहरातील सर्व धर्मादाय रुग्णालयांसाठी वाढविण्यात यावी."

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी तदर्थ समितीची कार्यकक्ष वाढविण्याबाबत हा जो प्रस्ताव आणला आहे त्यासंबंधीची माहिती ॲडव्होकेट जनरल यांनाही देण्यात यावी. तसेच या समितीच्या कार्यकक्षेच्या संदर्भात त्यांनी यासंदर्भात न्यायालयात परवा स्टेटमेंट केले होते ते देखील त्यांनी मागे घ्यावे व त्यासंबंधीचे निवेदन सभागृहात करावे.

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, मी आजच ॲडव्होकेट जनरल यांना बोलाविलेले आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--------------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मोहोळ,माढा व बाशी (जि.सोलापूर) तालुक्यातील सीना-भोगावती जोड कालव्याचे काम तात्काळ सुरु करणे

**मु. शी.** : मोहोळ,माढा व बाशी (जि.सोलापूर) तालुक्यातील सीना-भोगावती जोड कालव्याचे काम तात्काळ सुरु करणे यासंबंधी श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ, माढा व बार्शी तालुक्यात सीना-भोगावती जोड कालवा योजना तात्काळ सुरु करण्याचे लोकप्रतिनिधी व स्थानिक शेतकऱ्यांनी वारंवार शासनाकडे निवदेनाद्वारे केलेली विनंती परंतु ही योजना सुरु करण्याबाबत शासनाचे असलेले उदासीन धोरण, यामुळे शेती व पर्यायाने शेतकरी सिंचनाच्या सुविधांपासून वंचित होणे, दुष्काळी असणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये या शासनाच्या निष्क्रीय धोरणामुळे पसरलेले नाराजीचे व असंतोषाचे वातावरण, यावर सीना-भोगावती जोड कालवा ही योजना लवकर सुरु करुन सिंचनाची सोय निर्माण करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह माहिते-पाटील : महोदय, सीना-भोगावती जोड कालव्यासंधीचा प्रस्ताव अव्यवहार्य असल्याचे निवेदनात म्हटलेले आहे. मला आपल्यामार्फत शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, उजनी धरण आणि त्यातील पाण्याचा साठा व सांडपाणी हे कॅनॉल, ओढा व नाल्यातून सोडण्यात येणारे व वाहून जाणारे पाणी यासंबंधी शासनाने कृष्णा-भीमा स्तरीकरण योजना केली आहे. या योजनेच्या माध्यमातून जवळपास 90 टीएमसी पाणी उजनी धरणात टाकून त्याद्वारे मराठवाड्याला वितरित केले जाणार आहे. 9-10 टीएमसी पाणी उजनी धरणात येणार आहे. आज असलेले उजनीतील पाणी मी म्हटल्याप्रमाणे ओढा व नाल्यातून जाते आणि पावसाळ्यात हे पाणी सोडून द्यावे लागते. पर्यायाने शेवटी ते पाणी दुसऱ्या राज्यात जाते. सीना-भीमा प्रकल्प राबविला त्यावेळी देखील हा प्रकल्प अव्यवहार्य असल्याचे उत्तर शासनाकडून आले होते. पण प्रत्यक्षात आतापर्यंत त्याचा पुन्हा सर्व्हे झालेला असून ही योजना पुन्हा विचार करुन अंमलात आणली आणि ती यशस्वी झालेली पहायला मिळते. या योजनेतून 5-6 साखर कारखाने उभे राहिले व एवढया भागासाठी पाणी उपलब्ध झाले. म्हणून एकदा योजना कार्यान्वित करावयाची म्हटल्यानंतर यशस्वी होते म्हणून अव्यवहार्य असे जे उत्तर दिले आहे त्याचा पुनर्विचार झाला पाहिजे. तसेच निवेदनात रिधोरे-भोयरे असे 24 किलोमीटरचे अंतर म्हटले आहे. वास्तविक हे रिधोरे-तडवळे असे असून ते 16 किलोमीटरचे अंतर आहे आणि रिधोरे-तडवळे अशा 16 किलोमीटरवरुन आणण्यासंबंधीचा प्रस्ताव आहे. तसेच निवेदनात असेही दिलेले आहे की, यासंबंधीचा प्राथमिक अभ्यास करण्यात येत आहे. परंतु हा प्राथमिक अहवाल असा असेल की, हा प्रकल्प झाला तर जवळपास 11250 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आणि 25 गावांना त्यामुळे पिण्याचे पाणी मिळणार. म्हणून जर 25 गावांना पिण्याचे पाणी द्यावयाचे असेल तर ही योजना शासनाला करावी लागेल, अन्यथा एवढे मोठे क्षेत्र ओलिताखाली येणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील...

या 25 गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न त्यामुळे कायमस्वरुपी राहणार आहे. प्रत्यक्ष उजनी नदीतील पाणी वाहून जाते व पावसाळयात आपल्याला जे पाणी सोडावे लागते ते पाणी अडविण्याची सोय न केल्यामुळे ते पाणी दुस-या राज्यात जाणार आहे. आज अव्यवहार्य योजना म्हणून उत्तर आलेले असले तरी पुन्हा या योजनेच्या संदर्भात विचार झाला पाहिजे. आपल्याला फक्त 5 अब्ज घन फुट पाणी उपलब्ध आहे अशा प्रकारचे उत्तर या ठिकाणी देण्यात आलेले आहे परंतु माझ्या माहिती प्रमाणे निवेदनाच्या संदर्भात जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे असून प्रत्यक्षात कैक टीएमसी पाणी उपलब्ध आहे त्यामुळे या योजनेचा पुन्हा नव्याने विचार व्हावा. सोलापूर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा आहे त्यामुळे या ठिकाणी जर अशा प्रकारच्या दोन तीन योजना झाल्या तर या ठिकाणच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहेत. महाराष्ट्रात काही दिवसापूर्वी अवकाळी पाऊस पडला त्यामुळे या जिल्हयाचे जवळपास 60 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे या ठिकाणच्या शेतक-यांना कायमस्वरुपी हमी मिळावी अशी मी शासनाला विनंती करीत आहे.

श्री. रामराजे नाईक निंबाळकर : सभापती महोदय, सीना-भोगावतील नदीजोड कालवा होण्याबाबत श्री. साठे यांनी तीन वर्षापूर्वी मागणी केली होती. सीना-भोगावती नदीजोड प्रकल्प कसा अव्यवहार्य आहे यासंदर्भात जिल्हा अन्वेशन विभागाचा डिटेल्ड रिपोर्ट रेकॉर्डवर आहे. हा प्रकल्प अव्यवहार्य का आहे याची कारणे या रिपोर्टमध्ये दिलेली आहेत. एक तर उजनीचे पाणीवाटप पहिल्यांदाच झालेले आहे. भिमेचे पाणी ज्या जोड कालव्याद्वारे मोहोळ व बार्शी तालुक्यात आणले गेले आहे त्या पाण्याचे वाटप निश्चित झालेले आहे. कृष्णा-भिमा नदीवे जे पाणी उजनीला येते त्या पाण्याचे सुध्दा निश्चित वाटप झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जे म्हटले आहे की, उजनीचे दरवाजे उघडल्यानंतर ते पाणी कर्नाटक व आंध्रप्रदेशला जाते, त्यांच्या प्रश्नाचा जो रोख आहे त्यासंदर्भात निश्चित विचार करेल. परंतु एखादी योजना व्यवहार्य आहे की नाही, पाणी नक्की मिळेल की नाही, जर 50 टक्के 75 टक्के शाश्वती असेल तरच आपण प्रोजेक्ट करण्याबाबत विचार करतो. केवळ दोन वर्षे पाणी आले, पूर आला म्हणून कोयना, भीमा, कृष्णा नदीत पाणी आले व महाराष्ट्राच्या वाटयाचे 600 टीएमसी पाणी कर्नाटकमध्ये गेले ही बाब जरी खरी असली तरी दोन वर्षाच्या पाण्याचा आयसोलेटेड विचार करुन प्रोजेक्टला प्रशासकीय मान्यता

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामराजे नाईक निंबाळकर....

देता येईल काय हा खरा शंकेचा भाग आहे. 24 कि.मी., 16 कि.मी. चा जी बाब आहे ती तपासून घेण्यात येईल. एकंदरीतच सन्माननीय सदस्यांचा आग्रह लक्षात घेऊन, पाण्याच्या नियोजनासाठी फेर तपासणी करण्यास शासनाची तयारी आहे. लवकरच पुढच्या महिन्यात येणा-या आयपीआयचा रिपार्टची प्राथमिक तपासणी करुन त्यातून परत एकदा सर्व्हेकरुन पाण्याचे नियोजन वाढले, पाण्याची उपलब्धता वाढली तर तशा संदर्भात बैठक घेऊन विचार करण्यात येईल.

---------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर मधील कंत्राटी कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेणे

**मु. शी.** : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर मधील कंत्राटी कर्मचा-यांना शासकीय सेवेत सामावून घेणे यासंबंधी प्रा. शरद पाटील, जयंत प्र.पाटील,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर मधील वर्ग ३ व ४ मधील सर्व कर्मचारी गेल्या पाच ते सहा वर्षांपासून (सन २००२ ते २००३) करार पध्दतीने शासकीय सेवेत असणे, अनेक कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणेऐवजी अनुभव नसलेल्या लोकांना समाविष्ट करुन घेण्याची घडलेली घटना, सदरच्या नेमणूका शासन निर्णयानुसार विहित पध्दतीने झालेल्या असून भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानांकानुसार नियमित असतानाही त्यांना अत्यल्प वेतन देण्यात आल्यामुळे त्यांचेवर व त्यांच्या कुटूंबियांवर आलेली उपासमारीची पाळी त्यामुळे त्यांनी दिनांक १७ मार्च, २००८ पासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यासंबंधी शासनास दिलेले निवेदन, शासनाने या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेणेसंबंधी करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, कोल्हापूरच्या राजश्री श्रत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून गेल्या 5 वर्षापासून वर्ग 3 आणि वर्ग 4 चे 90 कर्मचारी कंत्राटी पध्दतीवर काम करीत आहेत म्हणून ही बाब मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मांडत आहे. सन 2003 साली शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात 90 कर्मचारी कंत्राटी पध्दतीवर नियुक्त झाले होते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील ..

त्या पदाला ते उमेदवार पात्र होते म्हणूनच त्यांची त्यावेळी शासनाने नियुक्ती केली होती नव्याने रिक्त झालेल्या किंवा नव्याने तयार झालेल्या जागांवर नवीन उमेदवार नियुक्त करीत असतांना तीच अर्हता धारण करणा-या कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा विचार शासन का करीत नाही ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, न्यायालयाच्या निर्णयानुसार विहित पध्दतीनेच नियुक्त्या करण्यात याव्यात असे शासनाने ठरविले असेल तर ज्यांना काम करण्याचा अनुभव आहे, जे अर्हता धारण करणारे आहेत त्यांना विहित पध्दतीने नियुक्त्या करण्याच्या माध्यमातून शासकीय सेवेमध्ये सामावून का घेण्यात येत नाही ? या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे अशी माझ ी मागणी आहे.

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय,.सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाचे उत्तर देखील त्यांनी स्वत:च दिलेले आहे. कोल्हापूर येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय शासनाने 2000 साली घेतला होता तेव्हा कॅबिनेटने असा निर्णय घेतला होता की, या महाविद्यालयामध्ये नॉन टिचींग स्टाफची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने करण्यात यावी. त्यानुसार 113 पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली होती त्यामध्ये 10 लेक्चररर्सना आणि 103 नॉन टिचीग स्टाफला नेमण्यात आले होते. पाच वर्षे एकत्रित पगारावर हे कर्मचारी काम `करीत होते. आता सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले आहे की, जी नवीन पदे निर्माण होत आहेत त्या ठिकाणी उमेदवाराची निवड करीत असतांना या कर्मचा-यांना देखील संधी देण्यात यावी. मी त्यांना सांगू इच्छितो की, या कर्मचा-यांना देखील संधी देण्यात येते.. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे हे कर्मचारी जर नियमाप्रमाणे मेरिटमध्ये येत असतील तर त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येते. या कर्मचा-यांना प्राधान्य देण्यापासून कोणालाही थांबवण्यात आलेले नाही. या पैकी जे उमेदवार मुलाखतीसाठी आले होते आणि जे कर्मचारी मेरिटमध्ये आले त्यांना प्रथम प्राधान्य दिलेले आहेच.

प्रा.शरद पाटील : या कर्मचाऱ्यांनी त्या पदावर अगोदर काम केलेले असल्यामुळे त्यांना कामाचा अनुभव आहे तसेच ते अर्हताधारक आहेत त्यामुळे प्राधान्याने विहित पध्दतीच्या माध्यमातून सरकारी सेवेमध्ये त्यांना घेण्यात आले पाहिजे. या कर्मचाऱ्यांनी गेली पाच वर्षे काम केलेले आहे तेव्हा त्यांच्या अनुभवाचा विचार शासन करणार आहे काय ?

2..

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयानुसार बॅक डोअर एन्ट्रीला परवानगी नाही. या कर्मचाऱ्यांनी काम केलेले असले तरी त्यांचा मेरिटवरच विचार करावयाचा आहे. ज्यावेळी जाहिरात दिली जाते त्यावेळी शैक्षणिक अर्हता आणि इतर क्रायटेरिया निश्चित केलेला असतो त्या शैक्षणिक अर्हतेमध्ये ते पात्र होत असतील तर त्यांचा आपोआपच समावेश करण्यात येतो परंतु ते चार पाच वर्षापासून काम करीत असल्यामुळे त्याना सेवेत सामावून घेतलेच पाहिजे असे नाही. मेरिट प्रमाणे त्यांचा विचार करावयाचा असतो.

प्रा.शरद पाटील : गेल्या पाच वर्षापासून हे कर्मचारी कंत्राटी पध्दतीने ठराविक वेतनावर काम करीत आहेत. पाच वर्षामध्ये त्यांच्या वेतनामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्यांचे कंत्राट वर्षानुवर्षे चालणारे आहे त्यांच्या वेतनात वाढ करण्यात आलेली नसल्यामुळे त्यांच्या वेतनामध्ये रितसर वाढ करावी. सध्या त्यांना अत्यंत तुटपुंजे वेतन दिले जात आहे तेव्हा सध्याच्या महागाईचा विचार करता त्यांच्या वेतनात भरीव वाढ करण्याचा शासन विचार करणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 2003 मध्ये या कर्मचा-यांना एकत्रित पगारावर नियुक्त करण्यात आले होते हे खरे आहे. 2003 ते 2008 या कालावधीमध्ये भाववाढ झालेली आहे. तेव्हा त्यांच्या पगारात वाढ करण्यासंबंधी सहानुभूतीने लक्ष देण्यात येईल, असे मी सन्माननीय सदस्याना आश्वासन देतो

-----

\

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : ठाणे जिल्हा परिषदेतून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे वर्ग केलेल्या बालवाडी शिक्षिकाना कायम स्वरुपी वेतनश्रेणी देणे

मु.शी :ठाणे जिल्हा परिषदेतून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडे वर्ग केलेल्या बालवाडी शिक्षिकांना कायम स्वरुपी वेतन श्रेणी देण्याबाबत सर्वश्री अरविंद सावंत जितेंद्र आव्हाड,लक्ष्मण जगताप, भास्कर जाधव,रणजितसिंह मोहिते -पाटील, वसंत पवार,राजेंद्र जैन,रमेश शेंडगे,सदाशिवराव पोळ,प्रा.फौजिया खान सर्वश्री संजय दत्त,गोविंदराव आदिक,सुभाष चव्हाण,.सय्यद जामा,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्य शासनाने मुलींच्या शिक्षणाकरिता एकीकडे वेगवेगळया सवलती जाहीर करणे, मात्र दुसरीकडे शिकलेल्या बालवाडी शिक्षिकांच्या नोकरीचा हक्क नाकारला जाणे, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडील 145 बालवाडी शिक्षिका कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेत वर्ग करण्यात येणे,त्यांना सुरुवातीला 500 रुपये मानधन देऊन नंतर कायम स्वरुपी सेवेत समाविष्ट करण्याचे दिलेले आश्वासन, यानंतर त्यांच्या कायम स्वरुपी वेतनश्रेणीवर काम करण्यासाठी मुलाखती व वैद्यकीय तपासणी घेण्यात येणे, जून, 1996 मध्ये या शिक्षिकांना कायम करुन वेतनश्रेणी देण्याबाबतचा ठराव मंजूर केला जाणे, परंतु त्यावर कोणतीच कार्यवाही न होणे, यानतर यासंबंधी सबंधित मंत्र्यासोबत बैठका होऊन त्यावर योग्य कार्यवाही करण्याकरिता ठराव पाठविण्याचे निर्देश देऊन तसा ठराव नगरविकास खात्याकडे माहे ऑगस्ट,2006 रोजी पाठविण्यात येणे, परंतु त्यावर अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी या शिक्षिकांमध्ये निर्माण झालेला असंतोष,याबाबत बेमुदत उपोषण करण्याचा त्यांनी दिलेला इशारा, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/KTG. श्री. गायकवाड नंतर --- 16:50

( लक्षवेधी सुचनेवरील मा.नगरविकास राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर...)

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, अतिशय वेदना देणारा हा प्रश्न आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका स्थापन झाली. 1 नोव्हेंबर 1994 रोजी जिल्हा परिषद ठाणे मधून 145 बालवाडी शिक्षिकांना या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये घेण्यात आले आणि केवळ 500 रूपये मासिक वेतनावर नव्हे मानधनावर त्यांना काम करण्यास सांगितले. त्यांना नंतर महापालिकेच्या कायम सेवेत घेऊ असेही सांगण्यात आले होते. त्या दृष्टीने त्यांच्या 24 जुलै 1995, 25 जुलै 1995 रोजी मुलाखती देखील घेण्यात आल्या. इतकेच नव्हे तर 16 नोव्हेंबर 1995 रोजी त्यांची वैद्यकीय तपासणीसुद्धा झाली. परंतु 16 नोव्हेंबर 1995 पासून आजपर्यंत त्यांना कायम सेवेत किंवा वेतनश्रेणीवर घेण्यात आलेले नाही. दरम्यानच्या काळात त्यापैकी 10 शिक्षिकांचे निधन झाले. आता नव्याने आलेल्या पालकमंत्र्यांनी 10 जानेवारी 2007, 20 जानेवारी 2007 अशा वेगवेगळ्या दिवशी पालकमंत्री म्हणून महापालिकेबरोबर बैठका घेतल्या. दरम्यानच्या काळात कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने या सर्व बालवाडी शिक्षिकांना महापालिकेच्या सेवेत कायम तत्त्वावर घेऊन वेतनश्रेणी द्यावी असा ठराव देखील पारित केला आणि शासनाकडे पाठविला आहे. सध्या तो ठराव नगरविकास विभागाकडे प्रलंबित आहे. आता आणखी किती दिवस, किती महिने या बालवाडी शिक्षिकांनी वाट पहावयाची ? आता त्या या प्रश्नावर उपोषणाला बसणार आहेत. सभापती महोदय,शासनाकडून जे निवेदन येते त्यात एक तर आम्ही विचारलेल्या प्रश्नांबाबत उत्तरच नसते, असलेच तर जे विचारले नाही त्याबाबत उत्तर असते. आता या निवेदनात पहिल्याच परिच्छेदात आपण सांगितले आहे की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या स्थापनेच्या वेळी महापालिकेत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीच्या कर्मचारी वर्गाबरोबर 15 बालवाडी सेविका व 5 दाई महापालिकेच्या सेवेत समाविष्ट झाल्या. मग त्या या 145 पैकी आहेत काय ? हे काहीच यातून कळत नाही. तसेच दुसऱ्या परिच्छेदात माहिती देताना सांगितले आहे की, 1 नोव्हेंबर 1994 पासून जिल्हा परिषदेतील महापालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळा महापालिकेकडे हस्तांतरित झाल्या व त्या शाळांना जोडून असलेल्या बालवाड्यांतील 215 बालवाडी सेविका व दाई यांना महापालिकेत दरमहा रूपये 500/- व रूपये 150 मानधनावर, म्हणजे मासिक पगारावर नाही, सामावून घेण्यात आले आहे. तर या 215 मध्ये मी उल्लेख केलेल्या 145 बालवाडी सेविका आहेत काय हेही या

..... पीपी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

उत्तरातून समजू शकत नाही. तेव्हा विचारलेला प्रश्न सोडून बाकी सगळी उत्तरे यात दिली आहेत. सभापती महोदय, मघाशी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख म्हणाले की, नियम 93 खालील निवेदनातून प्रश्नाला उत्तर कसे देऊ नये याचा नमुना शिकायला मिळतो. तसेच लक्षवेधी सूचनेतून देण्यात आलेल्या विषयाला, प्रश्नाला उत्तर कसे देऊ नये याचा हे निवेदन म्हणजे उत्तम नमुना आहे. म्हणून माझा नेमका प्रश्न आहे की, उर्वरित 130 बालवाडी शिक्षिका आहेत त्यांना कल्याण-डोंबिवली महापालिकेत कायम सेवेत व वेतनश्रेणीवर समाविष्ट करून घेण्याचा महापालिकेचा ठराव आपल्याकडे केव्हा आला ? आणि त्यावर आपण केव्हा निर्णय घेणार आहोत ? तसेच त्यांना आपण केव्हा कायम सेवेत व वेतनश्रेणीवर घेणार आहात ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत असतील वा सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त असतील, त्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केलेला विषय वा प्रश्न हा निश्चितच महत्त्वाचा आहे, त्यांच्या त्या विषयीच्या भावनेशी मी देखील सहमत आहे. परंतु नगरविकास विभागाच्या एकूण मार्गदर्शक तत्त्वांनुसार व नियमांनुसार पाहू गेल्यास महापालिकचा आस्थापना खर्च हा 35 टक्क्यांपर्यंत सीमित असावा असे आहे. सभापती महोदय, ज्या महापालिकेचा आस्थापना खर्च 35 टक्के असेल आणि त्यांनी अशा प्रकारची पदे मागितली तर त्यांना ती मंजूर केली जातात, त्यात काही अडचण येत नाही. परंतु कल्याण-डोंबिवली महापालिकेचा आस्थापना खर्च हा आज 38 टक्के आहे त्यामुळे 52 लाख 18 हजार 668 रूपयांचा खर्च यामुळे दरवर्षी वाढणार आहे, टक्केवारीनुसार पाहिले तर हा खर्च 2 टक्क्यांनी वाढणार आहे. म्हणजे आज 35 टक्के असलेला आस्थापना खर्च 2 टक्क्यांनी वाढणार आहे. महापालिकांचे प्रमुख काय हे नागरी सुविधा देणे हे आहे. तसेच महापालिकेच्या कायद्यानुसार महापालिकांनी प्राथमिक शिक्षण देणे हे बंधनकारक आहे मात्र बालवाडी चालविणे कंपल्सरी नाही. परंतु तरीही काही महापालिकांमध्ये काही बालवाड्या आहेत आणि त्यातील ताईंना कायम सेवेत घ्यावयाचे झाले तर त्या त्या महापालिकांनी आपले स्वत:चे उत्पन्न वाढविणेदेखील आवश्यक आहे. म्हणूनच मी सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी पूर्णपणे सहमत असूनही सांगेन की, आपण म्हणता आहात त्याप्रमाणे होणे आवश्यक आहे, त्यांना सध्या जो पगार नव्हे मानधन दिले जात आहे तेही अपुरे आहे, ते काही प्रमाणात वाढविले पाहिजे यात शंका नाही. ..

( यानंतर श्री. सरफरे ....क्यूक्यू 1 ..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

सभापती महोदय, त्याचप्रमाणे जिल्हा बाल विकास शहरी प्रकल्प मंजूर झाला असून सदर बाल विकास प्रकल्पांतर्गत अंगणवाडी ताईंना सामावून घेता येईल. त्याकरिता त्यांना 1500 रुपये मानधन आहे. त्याठिकाणी जाऊन त्या प्रकल्पाच्या माध्यमातून त्या बालवाडी चालू ठेवू शकतात. त्यामुळे सद्याच्या 500 रुपयांवरुन 1500 रुपये इतकी त्यांच्या मानधनामध्ये वाढ होईल. तेव्हा हा सुध्दा पर्याय खुला आहे. या ऊप्परही माननीय सदस्यांची भावना लक्षात घेऊन मागील दहा वर्षातील त्यांचे कमी मानधन लक्षात घेऊन हे मानधन कसे वाढेल या संदर्भात बैठक घेऊन त्यासंदर्भात महानगरपालिकेला जरुर सूचना देण्याच्या दृष्टीने कारवाई केली जाईल्.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आस्थापनेवरील खर्च 35 टक्क्यापेक्षा जास्त असल्यामुळे सद्यस्थितीत प्रस्ताव नामंजूर केला आहे. आपणामार्फत माझी शासनास विनंती आहे की, फायरमन आणि डॉक्टर या कॅटॅगरींना अपवादात्मक परिस्थितीत रिलॅक्सेशन देण्याची तरतूद आहे. तेव्हा याबाबतीत सिंपेथॅटीक ग्राऊंडवर किंवा हयुमेनिटेरीयन ग्राऊंडवर विचार करुन त्यांना रिलॅक्सेशन देऊन सेवेत समावेश करण्याबाबत पुर्नविचार करण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सिंपेथॅटीक ग्राऊंडवर किंवा हयुमेनिटेरीयन ग्राऊंडवर विचार करण्याबाबत शासनामध्ये वाद नाही. परंतु महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे याबाबत लोकप्रतिनिधी आणि तिथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे सुध्दा कर्तव्य आहे. त्यांनी जर उत्पन्न वाढविले आणि आस्थापना खर्च 35 टक्क्याच्या दरम्यान ठेवू शकले तर त्या अंतर्गत निर्णय घेता येईल. माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात जरुर माझ्या दालनामध्ये बैठक घेण्यात येईल. या लक्षवेधी सूचनेमध्ये समाविष्ट असलेल्या माननीय सदस्यांना सुध्दा त्या बैठकीला बोलाविण्यात येईल. त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे महापौर आणि आयुक्त यांना सुध्दा बोलाविण्यात येईल. त्याचबरोबर ठाणे, डोंबिवली व कल्याण येथील सर्व लोकप्रतिनिधींना बोलाविण्यात येईल. शक्यतो या अधिवेशनामध्येच ही बैठक घेण्यात येईल. आणि याबाबत सहानुभूतीपूर्वक पॉझिटीव्ह निर्णय घेऊन बालक ताईंचे मानधन कसे वाढेल आणि त्यांचे जीवन अधिक सुखकर कसे होईल यादृष्टीने निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांचे मी स्वागत करतो. ठाणे जिल्हयातील भिवंडी, मीरा-भाईंदर, ठाणे महानगरपालिकेमधील बालवाडी शिक्षिकांनी महानगरपालिकेच्या इतर सेवेत नोकरीसाठी प्रवेश केला तर त्यांना बालवाडी शिक्षिका म्हणून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

एंटरटेन केले जात नाही. जर त्यांना बालवाडी सेवेमध्ये घेता येत नसेल तर महानगरपालिकेच्या अखत्यारीतील इतर सेवेमध्ये सामावून घेण्याबाबत आपण विचार करणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, इतर पदांच्या बाबतीत त्यांचे सेवा-शर्तीचे नियम वेगवेगळे आहेत. तसेच, सर्व बालक ताईंची शैक्षणिक पात्रता ही चौथीपासून दहावीपर्यंत आहे. त्यामुळे शिक्षणाशी संबंधित असलेल्या इतर सेवांमध्ये बालक ताईंची पात्रता पूर्ण होत असेल आणि त्या संदर्भात जागा रिक्त असेल तर त्याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : सभागृहाच्या कामकाजाची वेळ 5 वाजेपर्यंत होती. आता सभागृहाची वेळ 6 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

पृ.शी. : औरंगाबाद एम.आय.डी.सी.अंतर्गत सुशिक्षित बेकारांना रोजगार न मिळणे

मु.शी. : औरंगाबाद एम.आय.डी.सी.अंतर्गत सुशिक्षित बेकारांना रोजगार न मिळणे या संबंधी सर्वश्री. श्रीकांत जोशी, सय्यद पाशा पटेल, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"औरंगाबाद एम.आय.डी.सी. अंतर्गत अनेक भूखंड शिल्लक असूनही जागांचे वाटप न होणे, एस.ई.झेड ची घोषणा होऊनही प्रत्यक्षात काम सुरु झालेले नसणे, वाळुंज, शेंद्रा एम.आय.डी.सी. मध्ये चांगले हॉटेल इत्यादी सुविधा नसणे, नवीन उद्योग येणे बंद असणे, त्यामुळे एम.आय.डी.सी. असूनही सुशिक्षित बेकारांना रोजगार उपलब्ध नसणे, त्यामुळे मराठवाडयातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, शासनाने त्यावर तातडीची कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अशोक चव्हाण (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, खरे म्हणजे हा औरंगाबाद शहरातील उद्योजकांच्या बाबतीत, विशेषत: लघु उद्योजकांची जी अडचण आहे, त्याबाबत व्यथा मांडण्यासाठी ही लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे. शेंद्रा एम.आय.डी.सी.स्थापन व्हावी आणि ती फाईव्ह स्टार एम.आय.डी.सी.व्हावी यासाठी युती शासनाच्या काळामध्ये जाणीवपूर्वक लॅण्ड ॲक्वीझिशन व्हावे म्हणून मी एक कार्यकर्ता म्हणून प्रयत्न करीत होतो. त्या भागातील तत्कालीन माजी मंत्री श्री.हरीभाऊ बागडे यांच्या मतदार संघामध्ये लॅण्ड ॲक्वीझिशन करुन 50 हजार रुपये प्रती एकर याप्रमाणे शेंद्रा एम.आय.डी.सी.साठी राज्य शासनाला जागा मिळवून दिली. जर खऱ्या अर्थाने मागासलेल्या भागामध्ये उद्योग यावयाचे असतील तर या संदर्भातील ज्या अडचणी आहेत, त्या मी येथे सांगू इच्छितो. माझी माननीय उद्योग मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी तातडीने यामध्ये लक्ष घालावे आणि याबाबतीत एक बैठक घेणे गरजेचे आहे. आज शेंद्रा एम.आय.डी.सी.ला जावयाचे असेल तर चिखलठाणा एअरपोर्टवरुन बाहेर पडल्यानंतर पहिल्यांदा अरुंद रस्त्याची अडचण दिसून येते. या रस्त्याचे रुंदीकरण करणे हा सार्वजनिक बांधकाम विभागाचा विषय आहे. त्याठिकाणी 12 मोठमोठे उद्योगपती आले आणि तेथील ट्रॅफीक जाम मध्ये अडकल्यानंतर ते म्हणाले की, आम्ही या फाईव्ह स्टार एम.आय.डी.सी.च्या ठिकाणी अशा प्रकारचे रस्ते अपेक्षित ठेवलेले नव्हते. मग 12 पैकी 9 उद्योगपती परत निघून गेले आणि त्यांनी सांगितले की, आम्हाला अशा प्रकारचा रस्ता चालणार नाही. याबाबतीत गेले 12 वर्षे सातत्याने मागणी करुन सुध्दा तेथील कॉम्पनसेशन बरोबर दिले जात नाही म्हणून तेथील रस्ता रुंद होत नाही. माननीय मंत्री महोदय, आपणही त्या रस्त्यावरुन नेहमी जात असल्यामुळे आपल्याला याची कल्पना आहे. याठिकाणी जसा रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न आहे, त्याप्रमाणे मी गेली पाच वर्षे सातत्याने मागणी करीत आहे की, शेंद्रा एम.आय.डी.सी.ला जोडणारा नारेगाव ते चिखलठाणा असा एक समांतर रस्ता करण्यात यावा. याबाबतीत माननीय उद्योग मंत्री महोदयांनी देखील एम.आय.डी.सी.ला सांगितले, पण त्यांनी अजूनपर्यंत हा रस्ता करण्यात आलेला नाही. तसेच वाळूंज एम.आय.डी.सी.च्या ठिकाणी सुध्दा म्हणजे ए.एस.क्लब पासून जवळचे काही रस्ते करण्याबाबत सांगितले होते, पण दुर्दैवाने ते रस्ते देखील तयार झाले नाहीत. आपल्या सुदैवाने सभागृहामध्ये माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटीलसाहेब आलेले आहेत. शेंद्रा फाईव्ह स्टार एम.आय.डी.सी.एरिया आहे. तेथे फक्त 33 के.व्ही. सब स्टेशन असल्याने विजेचा तुटवडा आहे. तेथे वीज नाही म्हणून त्या भागातील मोठमोठे उद्योग

. . . .2आर-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी . . . .

दुसरीकडे जात आहेत. त्यामुळे इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये रस्ता आणि वीज . . . .

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, याठिकाणी मी जो विषय मांडत आहे, ते प्रश्नच आहेत. जर मराठवाडयातील राजधानी असलेल्या मागास भागामध्ये बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन दिले नाही तर तेथे आलेले मोठमोठे उद्योग टिकत नाहीत. तसेच उद्योगपतींची सारखी-सारखी फिरण्याची आवश्यकता नसते. ते एक-दोन चकरा मारल्यानंतर दुसऱ्या डेस्टीनेशनला निघून जातात. मी सगळया मराठवाडयाच्या बाबतीत प्रश्न विचारलेला नव्हता, तर औरंगाबाद शहरापुरता हा प्रश्न होता. त्याठिकाणी सर्व प्लॉटचे ॲलोकेशन झालेले आहे. पण मागच्या अधिवेशनामध्ये याबाबतीत प्रश्न विचारल्यानंतर असे उत्तर देण्यात आले की, अजून प्लॉट द्यावयाचे शिल्लक आहेत. पण वस्तुस्थिती अशी आहे की, सध्या तेथे फक्त 10 प्लॉट शिल्लक होते, तेही वाटण्यात आले आहेत. त्यामुळे शेंद्रा एम.आय.डी.सी.मध्ये एकही प्लॉट शिल्लक नाही. वाळूंज एम.आय.डी.सी.मध्ये देखील एकही प्लाट शिल्लक नाही अशी परिस्थिती आहे. पण एका बाजूला असे उत्तर मिळते की, प्लॉट शिल्लक आहेत, पण प्रत्यक्षात एम.आय.डी.सी.मध्ये सर्व उद्योजक प्लॉट मिळावा म्हणून चकरा मारुन-मारुन थकलेले आहेत. पण आज एकही प्लॉट मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. आपण नेहमी मोठया उद्योजकांसाठी सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करतो, पण लघु उद्योजकांसाठी तेथे कोणत्याही सोयी-सुविधा उपलब्ध नाहीत. या उद्योजकांना शेंद्रा, वाळूंज एम.आय.डी.सी.च्या जवळपास जागा मिळणार नसेल तरीपण संभाजीनगर शहराच्या अजुबाजूला भरपूर जागा उपलब्ध आहे. अशा वेळी तेथील दोन-तीन हजार हेक्टर जमिनीचे तातडीने ॲक्वीझिशन केले पाहिजे आणि येथील उद्योजकांना मुलभूत सुविध उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. मी चार लघु उद्योजकांचे प्रश्न सांगतो . . . .

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, शेंद्रा एम.आय.डी.सी.मध्ये कोणतेही इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध नाही. साधी एक टपरी सुध्दा नाही. तेथे चार उद्योजक गेले. जॉईंट व्हेंचरमध्ये काही उद्योजक तेथे आणले होते, पण ते परत गेले.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी भाषण करु नये. प्रश्न विचारावा.

. . . .2आर-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, त्याठिकाणी ज्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत, त्यामध्ये वीज, रस्ते आणि फाईव्ह स्टार इन्फ्रास्ट्रक्चरच्या सोयी किती दिवसामध्ये निर्माण करण्यात येतील ? त्याचबरोबर एम.आय.डी.सी. करता ॲडिशनल जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही किती दिवसामध्ये करण्यात येईल ? हे माझे दोन स्पेसिफीक प्रश्न आहेत. जर माझे माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामुळे समाधान झाले नाही तर आणखी एक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात यावी.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे मला आठवावे लागेल की, त्यांनी नेमके कोणकोणते प्रश्न विचारलेले आहेत. त्यांनी उत्तम भाषण केले आणि त्या माध्यमातून बरेच प्रश्न उपस्थित केले. पण मला जे आठवते, त्याप्रमाणे एम.आय.डी.सी. मधील अंतर्गत रस्ते आणि बाहेरचे रस्ते याबाबत सांगताना चिखलठाणा आणि शेंद्रा या परिसरातील रस्त्यांचा उल्लेख केला. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप वळसे-पाटील सदनामध्ये आल्यानंतर त्यांनी विजेच्या प्रश्नाकडे आपले लक्ष केंद्रीत केले. तसेच विशेषत: लघु उद्योजकांच्या बाबतीत, प्लॉट उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत, असे तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.गायकवाड . . . .

श्री. अशोक चव्हाण ....

औरंगाबाद एमआयडीसी अंतर्गत शेंद्रा व चिखलठाणा येथे पायाभूत सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. चिखलठाणा विमानतळा पासून एमआयडीसी येथे जाणारा जो रस्ता आहे त्या बाबत बॉटलनेक निर्माण झालेला आहे. पैठण एमआयडीसी रस्त्यासंदर्भात देखील काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. औरंगाबाद एमआयडीसीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी अतिशय चांगले प्रश्न उपस्थित केलेले आहेत. जे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहेत त्यांची सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्या संदर्भात एमआयडीसी व पीडब्ल्यूडी यांची एक बैठक घेण्यात येईल. रस्ते रुंदीकरणाचे काम करणे आवश्यक आहे हे मला मान्य आहे. औरंगाबाद येथे अधिकाधिक उद्योगधंदे आकर्षित करण्याकरिता रस्ते रुंदीकरण व्हावे व चांगल्या पायाभून सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात या करिता प्रयत्न करणे आवश्यक आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, या संदर्भात एक महिन्याच्या आत बैठक घेण्यात येणार आहे.

सभापती महोदय, औरंगाबाद, चिकलठाणा,पैठण, खुल्ताबाद, वाळूज,पैठण,वैजापूर,शेंद्रा, या सात ठिकाणी एमआयडीसी आहे. सन्माननीय सदस्यांनी मघाशी वाळूज व शेंद्रा या एमआयडीसीचा उल्लेख केला होता. शेंद्रा मध्ये देखील काही औद्योगिक व व्यापारी भूखंड उपलब्ध आहेत. तेथे फार कमी प्रमाणात आता भूखंड शिल्लक आहेत. मराठवाडयामध्ये आज चांगली गुंमतवणूक होण्यास सुरुवात झालेली आहे. औरंगाबाद येथे अनेक उद्योग येत आहेत. तेथे गुंतवणूक वाढत आहे तसेच मोठमोठे प्रकल्प देखील सुरु केले जात आहेत. यामध्ये अनेक मोठे उद्योग आहेत. मे. साऊथ एशिया ब्रेव्हरीज प्रा.लि, मे. एन्ड्रेस प्लस हाऊझर, ॲटोमेशन इंस्ट्रुमेंट्स प्रा.लि., में. बॉल पॅकेजिंग इंडिया प्रा. लि., मे कॅनपॅक इंडिया प्रा.लि. मे. शेतकरी बळीराजा शुगर्स लि. व गॅप्स पॉवर ॲंड इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त विशेष आर्थिक क्षेत्र प्रयोजनार्थ में. वोखर्ड लि., मे. अजंता प्रोजेक्टस व ॲल्युमिनियम व संलग्न विशेष आर्थिक क्षेत्रासाठी अधिसूचित क्षेत्रामधून मे. हिंदाल्को इंडस्ट्रीज लि. मे. बजाज व मे. ग्लेनमार्क फार्मा लि. या उद्योगांना भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. या सर्व विशेष आर्थिक क्षेत्रामधील प्रकल्पांचे काम प्रगतीपथावर आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, नवीन प्रकल्पामुळे साधारण 5 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून एक हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

..2।



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण.....

सभापती महोदय, औरंगाबाद जिल्हयामध्ये जमिनीची कमतरता भासू लागली आहे. त्यामुळे नवीन प्रकल्पाकरिता वाळूंज येथे 343 हेक्टर्स जमिनीचे संपादन केले जाणार आहे. शेंद्र येथे 813 हेक्टर जमीन भूसंपादित करण्याचे काम सुरु आहे. शेंद्रा येथील लोकप्रतिनिधी यांना मी विनंती करु इच्छितो की, औद्योगिक क्षेत्राचा विकास करीत असताना काही प्रश्न निर्माण होत असतात. त्यामुळे हे प्रश्न सोडविण्याकरिता माननीय आमदार किंवा माननीय खासदार यांनी सहकार्य करावे, मदत करावी. यामुळे प्रकल्पांकरिता भू संपादन करण्याकरिता गती मिळू शकेल. या संदर्भात आपला दृष्टीकोन सकारात्मक आहे हे मला माहीत आहे. या कामात आपली मदत झाली तर अतिरिक्त जमीन उपलब्ध होऊ शकेल. यामुळे या भागामध्य उद्योग स्थापनेस प्रगती मिळू शकेल.

सभापती महोदय इतर भागात आज ज्याप्रमाणात विजेची टंचाई भासत आहे त्या प्रमाणात एमआयडीसी मध्ये विजेची टंचाई नाही. परंतु तेथे फीडरचा प्रश्न निर्माण झालेला आहे, त्या प्रश्नासंदर्भात माननीय मंत्री महोदय, श्री. दिलीप वळसे पाटील यांची व उर्जा विभागाची मदत घेतली जाईल.

--------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**..: ओबीसी विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती मिळण्याची प्रलंबित असलेली मागणी

**मु.शी** : ओबीसी विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती मिळण्याची प्रलंबित असलेली मागणी या संबंधी सर्वश्री.सुधाकर गणगणे,संजय दत्त वि.प.स यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुधाकर गणगणे ( विधानसभेने निवडलेले ) : अध्यक्ष महाराज, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (इतर मागावसर्गीयांचे कल्याण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधी वितरित केल्या असल्यामुळे, मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील ओबीसी प्रवर्गातील साधारण 5 लाख विद्यार्थ्यांचा प्रश्न मी लक्षवेधी सूचनेच्या मार्फत उपस्थित करीत आहे. या लक्षवेधी सूचनेसंदर्भात शासनाने दिशाभूल करणारे असे निवेदन दिलेले आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, ज्या कारणाने....

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, आपण लक्ष देत नाही.

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : सन्माननीय सदस्य प्रश्न विचारत असताना मी चार वेळा बेल वाजवली. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारताना फार मोठे भाषण केले. लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारण्याची ही पध्दत नाही. आता आपण पुढे गेलेलो आहोत.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, हा मराठवाड्यावर अन्याय आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मी सन्माननीय सदस्यांच्या चारवेळा लक्षात आणून दिले. प्रश्न विचारताना सन्माननीय सदस्यांनी फार मोठे भाषण केले. माननीय मंत्रिमहोदयांनी अतिशय उत्तम उत्तर दिलेले आहे. आता सभागृहाचा अधिक वेळ घेणे बरोबर होणार नाही. लक्षवेधी सूचनेवर अशा पध्दतीने बोलण्याची पध्दत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी हे निवृत्त होणार आहेत. त्यांना आपण एक प्रश्न विचारु द्यावा.

**तालिका सभापती** : आपण पुढच्या लक्षवेधी सूचनेवर गेलो आहोत. त्यामध्ये ओ.बी.सी.चा महत्वाचा प्रश्न आहे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, हा आमच्यावर अन्याय आहे.

श्री. चरणसिंग सप्रा : आपण ओ.बी.सीं.च्या विरोधात आहात काय ?

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, ओ.बी.सी.चाही महत्वाचा प्रश्न आहे

**तालिका सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, चार वेळा बेल वाजवून मी सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून दिले की, आपण प्रश्न विचारावा. लक्षवेधी सूचनेवर अशा पध्दतीने प्रदीर्घ प्रश्न विचारण्याची पध्दत नाही. मी चार वेळा त्यांच्या लक्षात आणून दिले. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सुध्दा आपल्या उत्तरात सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी इतके प्रश्न विचारले की ते माझ्या लक्षात येत नाहीत आणि त्यांनी काय विचारले ते आठवून उत्तर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ......**

देतो असे त्यांनी सांगितले. आपण ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहात. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आपण पुढे गेलेलो आहोत. सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी आपला प्रश्न विचारावा.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, ओ.बी.सी. विद्यार्थ्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे याकरिता आम्ही ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे. या निवेदनामध्ये शासनाने स्पष्टपणे असे म्हटले आहे की .....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य सरदारजी यांनी आम्ही ओ.बी.सी.च्या विरोधात आहोत असा उल्लेख केला. आम्ही ओ.बी.सी.च्या विरोधात नाही. सन्माननीय सदस्य श्री. चरणसिंग सप्रा यांचे वाक्य कामकाजातून काढले पाहिजे. आम्हीही ओ. बी. सी. आहोत. आम्ही ओ. बी. सी. च्या विरोधात आहोत असे शेरे सन्माननीय सदस्यांकडून उभे राहून मारले जातात ते बरोबर नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ श्री.बरवडनंतर 17:15

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा हे परवानगी घेऊन बोलले नसल्यामुळे त्यांचे वक्तव्य रेकॉर्डवर येणार नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी एक प्रश्न विचारण्याची संधी मागितली होती. आतापर्यंत तो प्रश्न होऊन गेला असता.

श्री.अशोक चव्हाण : सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांच्या बोलण्याचा उद्देश असा होता की, सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे हे निवृत्त होत असल्यामुळे त्यांना ओ.बी.सीं.च्या संदर्भात प्रश्न विचारण्याची पुन्हा संधी मिळणार नाही. त्यामुळे त्यांना बोलण्याची संधी द्यावी. ही भावना त्या मागे होती.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांचे हे शेवटचे अधिवेशन आहे. ते निवडणूक लढवून पुन्हा या सभागृहात येतील किंवा येणार नाहीत. त्यामुळे त्यांनाही एक प्रश्न विचारण्याची संधी द्यावयास हरकत नव्हती.

**तालिका सभापती** : हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे....

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना मी विनंती करतो. आपण ज्येष्ठ सभासद आहात. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली असताना ते प्रदीर्घ भाषण करीत होते. त्यामुळे मी 3 वेळा घंटा वाजविली होती, तरी सुध्दा त्यांनी प्रश्न विचारला नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. लक्षवेधी सूचनेला वैधानिक आयुध मानले जाते आणि त्यावर किती प्रश्न विचारले जावेत याबद्दल संकेत आहेत, नियम आहेत. आपण म्हणता त्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी भाषण केले. आपण 2-3 वेळा घंटा वाजवून त्यांना सूचित केले होते, तरी सुध्दा त्यांनी भाषण केले. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी अतिशय विस्ताराने व चांगले उत्तर दिले. तथापि, त्या उत्तरानंतरही एखाद्या सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारावयाचा असेल तर तो विचारु द्यावा. लक्षवेधी सूचनेवर 4-5 प्रश्न विचारण्याचे संकेत आहेत. आपली परंपरा आहे. त्यामुळे अशी लक्षवेधी सूचना एकदम फेटाळून लावता येत नाही.

2....

03-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) UU-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्या मताशी मी सहमत आहे. मी आपल्या लक्षात आणून देतो की, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी बोलत असताना मी 3 वेळा घंटा वाजविली होती. त्यावेळी आपण सुध्दा ते चुकत असल्याबद्दल त्यांना खुणवून सांगत होतात. आपल्या बॉडी लॅग्वेजवरुन माझ्याही लक्षात आले होते. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सविस्तरपणे उत्तर दिल्यामुळे सन्माननीय सदस्यांना न्याय सुध्दा मिळालेला आहे. त्यामुळे आपण उपस्थित केलेला मुद्दा हरकतीचा होत नाही.

श्री.कपिल पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी मला बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी हे प्रश्न न विचारता भाषण करीत होते. लक्षवेधी सूचनेवर त्यांनी प्रश्न विचारावयास पाहिजे होता. मंत्रिमहोदयांनी सविस्तर उत्तर दिल्यानंतर आपण पुढील लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांनी लक्षवेधी सूचना मांडल्यानंतर मंत्रिमहोदयांनी निवेदन वितरित केल्याप्रमाणे असे म्हटलेले आहे.

नंतर श्री.शिगम

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:20

(श्री. कपिल पाटील....)

कामकाज पुढे गेलेले आहे. आता आपल्याला मागे जाता येणार नाही. दुसरा मुद्दा असा आहे की, हा राज्यातील ओ.बी.सी. विद्यार्थ्यांचा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे या विषयावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी फार चांगले उत्तर दिलेले आहे. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचा अधिक्षेप करीत नाही, मला त्यांच्या विषयी आदर आहे. परंतु त्यांनी सन्माननीय सदस्य श्री. चरणसिंग सप्रा यांचा उल्लेख सरदारजी असा केलेला आहे. अशा प्रकारे कुणाच्या धर्माचा उल्लेख या ठिकाणी करता येणार नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांचा हरकतीचा मुद्दा बरोबर आहे.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, हा ओ.बी.सी. विद्यार्थ्यांचा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील जवळ जवळ 5 लाख ओ.बी.सी. विद्यार्थ्यांना या वर्षापासून झळ लागणार आहे. महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ 4 ते 5 कोटी म्हणजे 52 टक्के जनता ही ओ.बी.सी. आहे. ओ.बी.सी. विद्यार्थ्यांसाठी जी 50 टक्के शिष्यवृत्ती दिली जाते ती 100 टक्के द्यावी असा माझ्या लक्षवेधीचा विषय आहे. या लक्षवेधीच्या संदर्भात शासनाने केलेले निवेदन दिशाभूल करणारे आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "शासनाने यासंदर्भात ऑक्टोबर 2007 ला मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली असून त्या समितीमध्ये असनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग आणि आर्थिकदृष्टया मागास वर्गासाठी विविध पर्याय तपासून निर्णय घेण्यात येईल." तेव्हा शासनाने जी समिती नेमलेली आहे त्या समितीकडे इतर मागास वर्गाचा विषय सोपविलेला नाही. इतर मागास वर्गाला वगळण्यात आलेले आहे. या लक्षवेधीवरील निवेदन सभागृहाचे दिशाभूल करणारे आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : ओ.बी.सी.चा निर्णय घ्यावयाचे राहून गेलेले आहे. त्यांचा समावेश करु.

**तालिका सभापती** : राहून गेले असे म्हणणे बरोबर नाही. ती बाब आधीच समाविष्ट असली पाहिजे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धर्मरावबाबा आत्राम : या लक्षवेधीवरील सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याची माझी तयारी आहे.

श्री. दिवाकर रावते : सरकारची भूमिका बरोबर नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी सांगितले की, 3 ऑक्टोबर 2007ला नियुक्त करण्यात आलेल्या समितीकडे ओबीसीचा विषय सोपविलेला नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

ही लक्षवेधी सूचना ओ.बी.सी.प्रवर्गासंबंधीची आहे. ओ.बी.सी.प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी व्यावसायिक शिक्षणाकरिता मिळावी म्हणून राज्यातील ओ.बी.सी.संघटना संघर्ष करीत आहे. परंतु त्या संदर्भात शासनाकडून गेल्या चार वर्षापासून फक्त आश्वासने दिली जात आहेत. परंतु त्या आश्वासनांची पूर्तता मात्र शासनाकडून आजपर्यंत झालेली नाही. म्हणून या विषयाच्या बाबतीत लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली आहे. परंतु त्या लक्षवेधी सूचनेला देखील शासनाकडून पूर्णपणे उत्तर दिलेले नाही. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात शासनाकडून सविस्तरपणे उत्तर यावे म्हणून ही लक्षवेधी सूचना आज राखून ठेवावी अशी माझी विनंती आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड (बसून) : यासंदर्भात शासनाने भूमिका स्पष्ट करावी...

श्री. कपिल पाटील : सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांनी ओ.बी.सी.प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी व्यावसायिक शिक्षणाकरिता दिनांक 13 मार्च, 2007 च्या शासन निर्णयाप्रमाणे देण्यात यावी अशा प्रकारचा प्रश्न लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून विचारण्यात आला आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय राज्यमंत्र्यांनी ओ.बी.सी.प्रवर्गाचा उल्लेख करणे राहून गेला अशी कबुली दिली आहे. अशा सवलतीच्या बाबतीत उल्लेख करणे राहून जाणे ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. राज्यातील 52 टक्के ओ.बी.सी. प्रवर्ग अशा प्रकारचा अन्याय खपवून घेणार नाही. दुस-या परिच्छेदामध्ये जे उत्तर दिले आहे ते देखील दिशाभूल करणार आहे...

श्री. पांडुरंग फुंडकर : या सूचनेच्या संदर्भात शासनाकडून सविस्तर उत्तर प्राप्त व्हावे म्हणून ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आहे. सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आता या सूचनेवर कोणीही चर्चा करु नये.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझे म्हणणे कृपया पूर्णपणे ऐकून घ्यावे. ओ.बी.सी.प्रवर्गाचा समावेश करण्याचे राहून गेले अशी कबुली माननीय राज्यमंत्र्यांनी दिली आहे. राज्यात 52 टक्के ओ.बी.सी.प्रवर्ग आहे. या लक्षवेधी सूचनेच्या दुस-या परिच्छेदामध्ये असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लिमिटेड या महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये 50 कोटी इतके असून सन 2008-09 या वर्षासाठी या महामंडळासाठी रुपये 4.00 कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद महामंडळातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

श्री. कपिल पाटील....

अधिकारी आणि कर्मचारी यांच्या पगारावर खर्च होणार आहे. त्यामुळे ओ.बी.सी.प्रवर्गास दिल्या जाणा-या सोयी सवलतीसाठी शासनाने या निवेदनातून कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली दिसून येत नाही. तिसरा मुद्दा अतिशय गंभीर आहे. तो मुद्दा सभागृहाची दिशाभूल करणार आहे. राज्य शासकीय सेवेतील कर्मचा-यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात केंद्र शासनाने पदोन्नतीमध्ये इतर मागासवर्गीयांना आरक्षण ठेवलेले नाही त्याच आधारावर राज्यशासनाने राज्यातील शासकीय सेवेतील इतर मागासवर्गीय कर्मचा-यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण ठेवलेले नाही. पदोन्नतीच्या बाबतीत सुप्रिम कोर्टाने निकाल दिलेला आहे. असे असतानाही या ठिकाणी पदोन्नतीसाठी आरक्षण लागू करण्यात आलेले नाही. यासंबंधी जी माहिती दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

( गोंधळ )

श्री.धर्मारावबाबा आत्राम : मी मघाशीच सांगितले की, यामध्ये ओ.बी.सी.प्रवर्ग इन्क्लुड आहे.

**तालिका सभापती** : सदनातील सदस्यांच्या भावना लक्षात घेता ही लक्षवेधी सूचना मी राखून ठेवीत आहे. या लक्षवेधी सूचनेवर उद्या चर्चा करण्यात येईल. या सूचनेच्या अनुषंगाने माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत सविस्तर असे वेगळे उत्तर वितरित करण्यात यावे.

श्री. धर्मारावबाबा आत्राम : ठीक आहे.

---------------

3...



ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 17:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात सिकलसेल रोगाच्या रुग्णांची वाढत असलेली संख्या

**मु. शी.** : राज्यात सिकलसेल रोगाच्या रुग्णांची वाढत असलेली संख्या

यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी,रणजितसिंह माहिते पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अरुण गुजराथी ( महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये राज्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" राज्यामध्ये सिकलसेल हा रोग असलेल्या रुग्णांची वाढत असलेली संख्या चंद्रपूर, गोंदिया, नंदुरबार, नागपूर इत्यादी आदिवासी बहुल जिल्हयांमध्ये याप्रकारचे बहुसंख्य रोगी आढळणे, सिकलसेलच्या रुग्णांना वेळेवर शासकीय रुग्णालयात उपचार न मिळणे, सिकलसेलवर कोणते उपचार करावयाचे याबाबत आरोग्य सेवेतील तज्ज्ञ डॉक्टरांचे एकमत नसणे तसेच सिकलसेल रोग लहान मुलांमध्येही आढळत असल्याने पुढची पिढी अशक्त व रोगी होण्याची वाढलेली भीती, एकूणच या रोग्यांना औषधोपचार करण्यात आलेले अपयश, त्यामुळे रुग्णांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीनेकेलेली वा करावयाची कारवाई."

श्री. सुरेश शेट्टी ( वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** ( श्री.उल्हास पवार ) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, राज्यात सिकलसेल हा रोग मोठया प्रमाणात वाढत आहे. हा रोग केवळ आदिवासी बहुल जिल्हयामध्ये वाढत नसून तो नगरपालिका, महानगरपालिका आणि झोपडपट्टी विभागातही या रोगाची मोठया प्रमाणात लागण झाली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात शासनाने असे म्हटले आहे की, राज्यात या रोगाचे प्रमाण कमी करण्यात शासनाला यश मिळाले आहे. परंतु शासनाकडून दिलेले उत्तर योग्य नाही असे माझे मत आहे. कारण शासनाने सिकलसेल या रोगावर उपचार करण्यासाठी फक्त एकाच ठिकाणी व्यवस्था केलेली आहे. म्हणून नंदुरबार, नाशिक या जिल्हयात सिकलसेल क्लिनिक उघडण्याच्या संदर्भात शासन विचार करील काय ?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ 17:30

लक्षवेधी सूचना पुढे सुरु ....

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सर्वप्रथम मी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांचे अभिनंदन करतो की त्यांनी एक महत्वपूर्ण विषय सभागृहात उपस्थित केला आहे. माझे व्यक्तिगत मत असे आहे की, लक्षवेधी आली असल्यामुळे या विषयाचे महत्व कमी होणार आहे. मी त्यावर उत्तर देणारच आहे परंतु या विषयावर अर्धा-तास ठेवणे आवश्यक आहे. गेल्या 2/3 वर्षापासून हा विषय सातत्याने सभागृहात उपस्थित होत आहे. सिकलसेल या रोगाबाबत शासनाने एक कार्यक्रम हाती घेतला आहे. यासंबंधात खरे म्हणजे सविस्तर चर्चा आपण करु शकतो. यासंबंधातील पायलट प्रोजेक्ट शासनाने सुरु केला तेव्हा फक्त नागपूर आणि धुळे मेडिकल कॉलेजमध्ये पायलट प्रोजेक्ट सुरु केला होता. त्यानंतर 2006 मध्ये या विषयावर ज्यावेळी दोन्ही सभागृहात चर्चा झाली त्यानंतर डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशन यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमून समितीने सिकलसेल रोगाच्या निमुर्लनासंबंधी नियोजन तयार करावे असा निर्णय घेतला. 2006 मध्ये डॉ. बी.सी.मेहता जे या क्षेत्रातील वरिष्ठ आणि नामवंत डॉक्टर आहेत त्यांची नेमणूक करण्यात आली. सन्माननीय सदस्यांना डॉ. मेहता हे माहीत आहेत कारण ब्रम्हकुमारीज हॉस्पीटलच्या उद्‌घाटनासाठी ते आले होते त्यावेळी श्री. गुजराथी साहेब तेथे उपस्थित होते. डॉ.मेहता यांच्या समितीने रिपोर्ट दिल्यानंतर सिकलसेल रोगासंबंधी प्रधान सचिव(वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली हाय पॉवर समिती नेमून या समितीने ठोस कार्यक्रम तयार केलेला आहे. सुरुवातीला हा प्रोजेक्ट डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशन यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जाता होता आता हा प्रोजेक्ट आरोग्य विभागाकडे हस्तांतरित केलेला आहे. सिकलसेल कंट्रोल प्रोग्रॅम दोन पार्टमध्ये केलेला आहे. पहिल्या भागामध्ये क्रिएटींग पब्लीक अवेअरनेस, स्क्रिनिंग ऑफ जनरल पॉप्युलेशन, स्क्रिनिंग फॅसिलिटी पीएचसी सेंटरपर्यंत करणार आणि तिसरा भाग म्हणजे कौन्सिलिंगचा आहे. त्याचप्रमाणे रुरल हॉस्पीटलमध्ये ट्रीटमेंटची सुविधा प्रोव्हाईड करणार आहोत. सभापती महोदय, सिकलसेल निर्मुलनाचा कार्यक्रम 2007-08 मध्ये नाशिक, नंदुरबार, अमरावती, ठाणे, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्हयात हा कार्यक्रम सुरु केला. 2008-09 मध्ये पुणे, रायगड, धुळे, जळगांव, अ.नगर, नांदेड, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर आणि भंडारा आणि थर्ड फेजमध्ये म्हणजे 2010-2011 या वर्षात संपूर्ण राज्य कव्हर करणार आहोत. थर्ड फेजचा कार्यक्रम निश्चित केलेला आहे. या वर्षी 1 कोटी 65 लाखांची तरतूद केलेली आहे.

.......2

श्री. सुरेश शेट्टी ....

ज्याच्यामध्ये एनजीओंचा देखील सहभाग आहे. सिकलसेल निर्मुलन कार्यक्रमामध्ये इन्व्हेस्टीगेशन, कौन्सिलिंग, ट्रेनिंग प्रोग्रॅम याचा समावेश आहे. प्रत्येक हॉस्पीटलमधील 5 डॉक्टरांना ट्रेनिंग देण्याचा प्रोग्रॅम पूर्ण झालेला आहे. या कार्यक्रमाचे मॅसिव्ह लॉंच केले असून ट्रेनिंग सुरु केलेले आहे. या रोगाच्या निर्मुलनाचा कार्यक्रम संपूर्ण राज्यभर राबवीत असून या कार्यक्रमासाठी 3 कोटी रुपये वैद्यकीय शिक्षण विभागाने आणि 1 कोटी 65 लाख रुपये सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेले आहेत.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, मोठया झोपडपट्ट्यांमध्ये आणि शहरांमध्ये या कार्यक्रमाचा मास्टर प्लॅन तयार केला जाणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 'होय'.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सिकलसेल हा रोग प्रामुख्याने आदिवासी क्षेत्रामध्ये आढळून येतो. तेथील रुढी, लग्नपध्दती याचा भाग मोठया प्रमाणावर येतो.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 17:35

डॉ.दीपक सावंत......... लक्षवेधी सूचना क्र.5.....

निवेदनामध्ये म्हटले आहे की, माडीया, गोंड आणि कोलाम या आदिवासी जमातीतील लोकांवर रोगनिदान व उपचार करण्यात आले. या आदिवासी समाजाची पर्टिक्युलर भाषा असते. त्यांच्या भाषेतूनच समुपदेशन देण्याचे प्रयोजन करणार आहात का? जेणेकरुन त्यांना या रोगाबद्दल जी काळजी घ्यायची त्याबाबत व्यवस्थित माहिती मिळू शकते. 70 हजार रुग्णांची चाचणी करण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे. या आजाराने नेमके किती लोक बाधित आहेत? मृत्यू दर दिलेला नाही. त्याची माहिती दिली जाईल काय? सोल्युबिलीटी आणि इलेक्ट्रोफोरेसिस टेस्ट सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित करण्यात येतात. अतिसंवेदनशील 15 जिल्हयापैकी किती जिल्हयात सोल्युबिलीटी आणि इलेक्ट्रोफोरेसिस टेस्टची सुविधा उपलब्ध आहे?

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, आदिवासी समाजाची जी भाषा आहे त्या भाषेतून समुपदेशन करण्यात यावे. दोन वर्षापूर्वी या संदर्भात सभागृहात चर्चा झाली होती. स्वयंसेवी संस्थांचा या कार्यक्रमामध्ये किती महत्वाचा रोल आहे हे मी सांगितले आहे. स्वयंसेवी संस्था या कार्यक्रमामध्ये खास बाब म्हणून लक्ष घालणार आहेत. स्वयंसेवी संस्थांचे जे स्वयंसेवक आहेत त्यांना आदिवासी समाजाची भाषा येते की नाही यादृष्टीने काळजी घेतली जाणार आहे. सिकलसेल अफेक्टेड पेशंटची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. एचआयव्ही बाधित रुग्णांची नोंद होते त्याप्रमाणे या रुग्णांची नोंद होत नाही. जो सर्व्हे करण्यात आला त्यानुसार महाराष्ट्रामध्ये 90 लाख आदिवासी लोकसंख्या आहे. या लोकसंख्येच्या 10 टक्के म्हणजे 9 लाख आदिवासी सिकलसेल अफेक्टेड आहेत असे गृहित धरले आहे. त्याची जिल्हानिहाय आकडेवारी आवश्यक असेल तर मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. सिकलसेल रोगासंबंधी विस्तृत पुस्तिका काढली आहे. ती सर्व माननीय आमदारांना देण्यात येईल. डिटेल रिपोर्ट तयार केलेला आहे. माननीय सदस्यांनी या संदर्भात अभ्यास केल्यानंतर पुन्हा यासंबंधी सभागृहात चर्चा करु.

डॉ.दीपक सावंत : सोल्युबिलीटी आणि इलेक्ट्रोफोरेसिस टेस्टची सुविधा किती ठिकाणी उपलब्ध आहे?

श्री.सुरेश शेट्टी : याबाबतची निश्चित माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाकडून उपलब्ध करुन घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.5.......

श्री.मधुकर चव्हाण : 1.65 कोटी रुपये इतका निधी ठेवण्यात आला आहे. निवेदनात दिलेल्या आकडेवारीची बेरीज केली तर 1.46 कोटी रुपये इतकी होते. ही तफावत का आहे? 57 लाख रुपयांचे अनुदान स्वयंसेवी संस्थांना देणार आहात. 11.40 लाख रुपये औषधांसाठी, 78 लाख रुपये चाचणीकरिता लागणाऱ्या उपकरणे व रसायनासाठी देणार आहात. असे असताना 57 लाख रुपये स्वयंसेवी संस्थांना कशासाठी देणार आहात? औषधांचे नियोजन केले आहे, चाचणीसाठी रसायन आणि उपकरणांचे नियोजन केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाकडे ही व्यवस्था दिली असल्यामुळे स्वयंसेवी संस्थांना अनुदान का दिले जाणार आहे? यामध्ये भ्रष्टाचार होणार नाही का?

श्री.सुरेश शेट्टी : आताच कार्यक्रम सुरु झाला आहे. त्यापूर्वीच भ्रष्टाचार होईल असे बोलणे योग्य नाही. स्वयंसेवी संस्थांची भूमिका काय आहे हे मी सांगितले आहे. कार्यक्रम निश्चित केला आहे त्यात स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार आहे. प्रत्येक गावात जाऊन, आदिवासी पाड्यात जाऊन जागृती करावयाची आहे. आदिवासी समाजाशी त्यांच्या भाषेत बोलावे लागणार आहे. प्रत्येक आदिवासी कुटुंबाला भेट देऊन त्यांना सिकलसेलसंबंधी महत्व पटवून द्यावे लागणार आहे. त्यांना कौन्सिलिंग द्यावे लागणार आहे. सिकलसेल अफेक्टेड लहान मुले आहेत त्यांना कौन्सिलिंग द्यावे लागणार आहे. हे काम प्रा.आ.केंद्रातील डॉक्टर्स करु शकत नाहीत. शासकीय रुग्णालयांमध्ये मुळातच डॉक्टरांची वानवा आहे याची वारंवार सभागृहात चर्चा होते. रुग्णालयातील डॉक्टर केवळ रुग्णालयात अवेरनेस करु शकतील, गावात जाऊ शकत नाहीत. बेसिकली प्रत्येक गावात जाऊन अवेरनेस आणि कौन्सिलिंग करणे, प्रत्येक कुटुंबाला भेटून त्यांना सिकलसेल रोगाविषयीचे महत्व सांगणे, जे अफेक्टेड आहेत त्यांनी कोणती काळजी घ्यायला पाहिजे हे सांगावयाचे आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. सुरेश शेट्टी .........

आणि ज्यांना या रोगावरील उपचार करणे आवश्यक आहे यासंबंधीचे काम आपण एनजीओ ना द्यावयाचे आणि सन्माननीय सदस्यांनी सुध्दा अशा प्रकारे काम करणाऱ्या एनजीओ असतील तर त्याची माहिती शासनाला द्यावी, त्यांचीही शिफारस करण्यात येईल.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, महाराष्ट्र शासन की ओर से दोनों माननीय मंत्री महोदय यहां पर उपस्थित हैं. हमारे राज्य मंत्री महोदय ने बहुत ही प्रोग्रेसिव उत्तर दिया है और उससे मालूम होता है कि सिकलसेल बीमारी को सरकार ने बहुत गंभीरता से लिया है. यह विषय मैंने भी लक्षवेधी सूचना के रुप में उठाया है और वह आपके सामने आएगा. मैंने मंत्री महोदय को 400 मरीजों के बारे में एक पत्र लिखा है. शासन का वर्ष 2001 का जी.आर. है कि सिकलसेल के मरीजों को फ्री ट्रीटमेंट देंगे. नागपुर के आई.जी.एम.सी. के डीन से मैंने बात की है. उनका कहना है कि सिकलसेल की बीमारी के लिए हम निदान फ्री करेंगे और दवाई भी फ्री देंगे, लेकिन मरीज का हिप-जॉइन्ट का रि-प्लेसमेंट फ्री में करने के लिए शासन के आदेश नहीं है. इसके लिए कुछ अतिरिक्त सामान लगता है और मेडीकल कॉलेज उसके लिए फंड नहीं दे सकता है. इस बारे में मैंने शासन को पत्र लिखा है. एक बात यह स्पष्ट है कि यह बीमारी सिर्फ आदिवासी क्षेत्र तक ही सीमित नहीं है, बल्कि विदर्भ में कई जगह पर जहां माइनिंग क्षेत्र है, वहां पर भी सिकलसेल के मरीज पाए जाते हैं. मैंने 5-6 नाम दिए हैं. कुछ मरीज हॉस्पीटल में पड़े हुए हैं और आई.जी.एम.सी. ने उनका केस डी.एम.ई.आर. के पास भेजा है. श्री. सुनील शेंडे के हिप-जॉइन्ट के रिप्लेसमेंट के लिए डी.एम.ई.आर. से मंजूरी नहीं मिली है. इस प्रकार के जो मरीजों का जब तक जॉइन्ट्स रिप्लेसमेंट नहीं करेंगे, तब तक वे अपने पैरों पर खड़े नहीं हो सकते हैं. इसलिए मेरा शासन से अनुरोध है कि चाहे आप आकस्मिकता निधि से फंड दें या मुख्य मंत्री निधि से फंड दें, उनका इलाज होना चाहिए.

श्री. सुरेश शेट्टी : सभापति महोदय, माननीय सदस्य ने जो प्रश्न उपस्थित किया है, इसमें मुख्य रुप से "एक्यूट चेस्ट सिन्ड्रोम", "गॅलस्टोन" और "पैर में अल्सर" की समस्या है. सिकलसेल में इस प्रकार की बीमारी होती है. आपके जो भी मरीज नागपुर में एडमिट हैं, उनको

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सुरेश शेट्टी

जीवनदायी योजना में शामिल करके उनका इलाज मुफ्त में करेंगे. फर्स्ट फेज में हमने यह कार्यक्रम लिया है और मैं सभी माननीय सदस्यों से विनंती करना चाहता हूँ कि अपने विभाग में इस बीमारी को दूर करने की दृष्टि से आप लोग इसमें शामिल हो जाइए. माझी सन्माननीय सदस्यांना अशी विनंती आहे की, जो फर्स्ट फेजचा कार्यक्रम आपण लागू केला त्यासंबंधी जे जे आमदार त्या भागात आहेत त्यांनी या कार्यक्रमासाठी शासनाला मदत करावी. अशा प्रकारे आपण सर्व मिळून ही अडचण सोडविण्याचा प्रयत्न करु.

**सभापती** : लक्षवेधी सूचना संपलेल्या आहेत. आता कामकाजाच्या क्रमानुसार विशेष उल्लेखाच्या सूचना घ्यावयाच्या आहेत. तत्पूर्वी मला असे सुचवावयाचे आहे की, भाववाढीच्या संदर्भातील प्रस्तावावर उद्या सकाळी 10.00 ते 12.30 अशी सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल व या दरम्यान आपण भाववाढीच्या प्रस्तावावर चर्चा घेऊ. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता सुरु होईल. तसेच आजच्या कामकाज पत्रिकेवर नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दाखविलेला आहे तो देखील उद्या सभागृहाच्या नियमित बैठकीत घेण्यात येईल. तसेच कामकाज पत्रिकेत दाखविलेली शासकीय विधेयके सुध्दा उद्याच घ्यावी लागणार आहेत. त्यानंतर शुक्रवारला घेण्यात येणारे अशासकीय ठराव उद्याच्या कामकाज पत्रिकेवर जरी दाखविलेले असले तरी ते ठराव सोमवार दि. 7 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 1.30 च्या दरम्यान म्हणजेच सभागृहाची विशेष बैठक घेऊन चर्चेला घेण्यात येतील. त्यानुसार सोमवारला सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.45 वाजता सुरु होईल. असा कामकाजाचा क्रम मी सभागृहाच्या मान्यतेनुसार सभागृहासमोर ठेवत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**विशेष उल्लेखाच्या सूचना**</u>

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे. त्यांनी ती मांडावी

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सोवा गट-अ व महाराष्ट्र अभियांत्रिकी व प्रशासकीय सेवा गट-अ असे केलेले अनावश्यक विभाजन

**मु. शी.** : महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सोवा गट-अ व महाराष्ट्र अभियांत्रिकी व प्रशासकीय सेवा गट-अ असे केलेले अनावश्यक विभाजन याबाबत प्रा. शरद पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : मा□□य सदस्य प्रा. शरद पाटील यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक व प्रशाकीय सेवा गट -अ सवंर्गाचे विभाजन करण्याचा निर्णय सन 2004 मध्ये शासनाने घेतल्यामुळे राज्यातील 1500 अभिव्याख्येते विभाग प्रमुख व प्राचार्य प्रभागावरील झालेला अन्याय हा माझा आजच्या विशेष उल्लेखातील विषय आहे. तंत्र शिक्षणामध्ये 1976 सालापासून महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक सेवा गट -अ व महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक व प्रशासकीय सेवा गट-अ असे दोन संवर्ग अस्तित्वात होते. यापैकी महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक व प्रशासकीय सेवा गट-अ या संवर्गातील शिक्षकांना विभाग प्रमुख,प्राचार्य उपसंचालक, सहसंचालक व संचालक अशी पदोन्नती उपलब्ध होती. सन 2004 साली महाराष्ट्र अभियांत्रिकी शिक्षक व प्रशासकीय सेवा गट -अ या संवर्गाचे विभाजन करण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतला. सदर निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र अभियांत्रिकी व प्रशासकीय सेवा गट -अ आणि महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ असे अनावश्यक विभाजन करण्यात आले. या निर्णयामुळे तंत्रनिकेतनातील शिक्षकांच्या सेवा प्राचार्य पदापर्यंत सपविण्यात आल्याने तंत्रनिकेतनातील शिक्षक अस्वस्थ झालेले आहेत. त्यांच्या संघटनेने याबाबत माननीय न्याधिकरणाकडे दाद मागितली व न्यायाधिकरणाने संवर्ग विभाजन हा शासनाचा अधिकार असल्याचा व विभाजनातील त्रुटी शासन दुरुस्त करु शकते असा निर्णय दिलेला आहे. तथापि शासनाने यासंबंधी अद्यापि निर्णय घेतलेला नाही. या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय पदावर काम करीत असलेल्या अधिका-यांकडून विकल्प

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील....

घेण्यात आलेले आहेत. सदर विकल्पाची मुदत सुध्दा 15 दिवसाची देण्यात आली होती. वस्तुत: महाराष्ट्र शासनाच्या "Rules of Business and instructions issued there under", दिनांक 6 मार्च,1990च्या तरतुदीतील कलम 1 प्रमाणे संवर्ग विभाजनाचा निर्णय माननीय मुख्यमंत्री, मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार खालील प्रमाणे घ्यावयाचा आहे. "Proposals involving any important alterations in the conditions of services of member of All India Services or State Service or in the method of recruitment to the services or to the posts to which appointment is made by the Government." सदर तंत्रनिकेतनातील सर्व शिक्षकांना या निर्णयामुळे अंधाराच्या गर्तेत ढकलण्यात आलेले आहे त्यामुळे हा निर्णय रद्द करावा अशी या निमित्ताने मी शासनाला विनंती करु इच्छितो.

---------------------

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ग्रंथालय चळवळ प्रभावीपणे राबविली जाणे

**मु. शी.**: ग्रंथालय चळवळ प्रभावीपणे राबविली जाणे बाबत श्री. प्रतापराव सोनावणे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनावणे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. प्रतापराव सोनावणे ( नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ग्रंथालय चळवळीसंदर्भात पुढील प्रमाणे विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

वाचन संस्कृती ही तळागाळापर्यंत रुजवली गेली पाहिजे ही काळाची गरज आहे त्यासाठी ग्रंथालय चळवळ प्रभावीपणे राबवली जाणे आवश्यक आहे. शासनाकडून याबाबत वेळोवेळी घोषणा केल्या जातात. परंतु प्रत्यक्षात यासंदर्भात योग्य ती अंमलबजावणी होत नाही हे कटूसत्य आहे. शासनाने याबाबत विविध समित्या नेमल्या. व्यकंप्पा पत्की समिति, पागे समिती, प्रभाराव समिती अशा विविध समित्यांनी शासनाला अहवाल सादर केलेले आहेत. शासनाने अहवाल स्वीकारले परंतु प्रत्यक्षात कार्यवाही करीत नाही त्यामुळे कर्मचा-यांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम होणे आणि ग्रंथालय चळवळीची गुणवत्ता ढासळणे असे गंभीर परिणाम होत आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ 17=50

श्री.प्रतापराव सोनवणे..

व्यंकाप्पा पत्की समितीचा अहवाल शासनाने स्वीकारलेला आहे. त्या अहवालातील शिफारशीप्रमाणें शासनाकडून त्वरित अंमलबजावणी व्हावी असे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे. ग्रंथपालन वर्गाचे प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण संचालनालयातर्फे व्हावे, ग्रंथालय मान्यतेच्या अटी सोप्या व व्यवहार्य कराव्यात, निवृत्त कर्मचा-यांना निर्वाह वेतन मिळावे, ग्रंथमित्र पुरस्कार पात्र व्यक्तिंना इतर शासकीय सुविधा मिळाव्यात, विविध पातळीवर होणा-या ग्रथालय संमेलनाच्या अनुदानात वाढ करावी ही या चळवळीत कार्य करणा-या सर्व घटकांची मागणी आहे. शासनाने त्वरित या मागण्या मान्य करुन ग्रंथालय चळवळीला संरक्षण देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, या संपूर्ण चळवळीत ग्रंथालय सेवकांचे, ग्रंथपालांचे योगदान सर्वात महत्वाचे आहे. मात्र या घटकांना शासनाने अजून न्याय दिलेला नाही. ग्रंथालय सेवकांचे मानधन अत्यत तुटपुंजे आहे. इंग्लड - अमेरिके सारख्या देशात " सार्वजनिक ग्रंथालय कायदा " आहे तेथे ही ग्रंथालये संपूर्ण शासकीय आधारावर चालविली जातात. ग्रंथालयीन कर्मचा-यांना तेथे शासकीय वेतनश्रेणी दिली जाते. भारतातही तामिळनाडू, आंध्र प्रदेश,कर्नाटक, हरियाना, गोवा या राज्यात ग्रंथालये संपूर्ण शासकीय आधारावर चालविली जातात. यासाठी तेथील शासनाने ग्रंथालय कर लावला असून या चळवळीसाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तसेच सर्व कर्मचा-यांना शासकीय वेतनश्रेणी दिलेली आहे.

सभापती महोदय, या सर्व पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने ग्रंथालय सेवकांना शासकीय वेतनश्रेणीप्रमाणे वेतन त्वरित मंजूर करावे ग्रंथालय सेवकांना सेवा शाश्वती द्यावी, तीन वर्षापेक्षा जास्त काळ ग्रंथालय सेवा करणा-या सेवकांना प्रथम प्राधान्य देऊन कायम करावे इतर शासकीय कर्मचा-यांप्रमाणे सवलती द्याव्यात आणि किमान 25 वर्षे ग्रंथालय सेवेचे योगदान देणा-याना वृध्दापकाळाच्या आधारासाठी निवृत्तीवेतन सुरु करावे अशी ग्रंथालय चळवळीत कार्यरत असलेल्या सर्व कार्यकर्त्यांची आग्रही मागणी आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांनी या संदर्भात ग्रंथालय चळवळीतील प्रमुख मंडळींची त्वरित बैठक बोलावून संबंधितांना न्याय द्यावा अशी आग्रही मागणी या विशेष उल्लेखाव्दारे मी करीत आहे.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

03-04-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3B 2

पृ.शी : मुबई शहरातील ऑटेझमग्रस्त मुलांना द्यावयाच्या सुविधा

मु.शी : मुंबई शहरातील ऑटेझमग्रस्त मुलांना द्यावयाच्या सुविधाबाबत
श्री.सजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष् उल्लेखाची सूचना

**सभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय दत्त (विधान सभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :

"कालच जागतिक ऑटेझम दिन जगभर साजरा करण्यात आला. या पार्श्वभूमीवर केवळ मुंबई शहरात ऑटेझमग्रस्त असलेली सुमारे 80,000 मुले आढळून आलेली आहेत. या मुलांचे हक्क आणि कल्याणासाठी मुंबईतील केवळ 8 शाळा आणि 32 इतर सामाजिक संस्था कार्यरत आहेत. मात्र या संस्थांची पोहोच केवळ 1,000 हजार मुलांपर्यंत गेलेली आहे. ऑटेझम ही एक अत्यंत गहन मानसिक आरोग्याबाबतची समस्या आहे. या मुलांची विशेष काळजी घेऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्याकरिता विशेष शाळा स्थापन करण्याची आवश्यकता आहे. मात्र अजूनही त्याबाबत निश्चित अशी योजना शासनाकडे नाही. शासन मुलांसाठी कित्येक कोटी रुपये खर्च करीत आहे. मात्र ऑटेझमग्रस्त मुले ही कायम दुर्लक्षित राहिली आहेत. राज्य प्रशासनात अशा मुलांसाठी वेगळते् खाते असण्याची आवश्यकता असतांना ते आपल्याकडे नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे. या मुलांच्या भविष्यासाठी विशेष निधी उपलब्ध करुन त्यांच्याकरिता आवश्यक त्या सर्व सुविधा देण्याची आवश्यकता आहे आणि या मुलांच्या पालकांना देखील आधार व प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. अत्यंत गंभीर अशा सामाजिक समस्येवर वेळीच तोडगा काढण्याची गरज आहे. सार्वजनिक दृष्टया महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना मी मांडलेली आहे.

सभापती महोदय, या विषयावरील विशेष उल्लेख मांडण्याची आपण मला संधी दिली याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो तसेच मी आपणाला अशीही विनंती करतो की या विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करण्याची आपण मला ंसधी द्यावी.

--

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, ऑटेझमग्रस्त मुलांसाठी इंग्रजी माध्यमातील शाळा मुंबईत आहेत परंतु मराठी माध्यमाच्या शाळा नाहीत . ऑटेझमग्रस्त मुलांना नर्व्हसनेस , डिप्रेशन येत असते.या मुलांसाठी शासनाने मराठी माध्यमाच्या शाळा सुरु कराव्यात अशी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

-----

नतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, शुक्रवार, दिनांक 4 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 10.00 वाजता भरेल.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यंत होईल. या बैठकीमध्ये "जीवनावश्यक वस्तुंची कमतरता" या विषयावर चर्चा होईल.

त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.30 वाजता पुन्हा भरेल. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे उद्याच्या नियमित बैठकीमध्ये नियम 260 चा विरोधी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा होईल. त्यानंतर शासकीय विधेयक घेण्यात येईल. तसेच उद्याच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये लक्षवेधी सूचना दाखविल्या असल्या तरी मी त्या तहकूब करीन.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 56 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 4 एप्रिल, 2008 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही